चला स्विमिंग ला...



स्विमिंग सुट, गॉगल,
स्विमिंग कॅप, बरमुडा
स्विमिंग लेगींग्ज टॉप,
व बरेच काही

जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



श्री लक्ष्मी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि., अ.नगर
मुख्य कार्यालय : अकोलकर हॉस्पीटल जवळ, बुरुडगांव रोड, अ.नगर फोन : (०२४१) ३५८६६५९
शाखा : बंधन बँकेशेजारी, नेप्ती रोड, केडगांव (देवी), अ.नगर. मो. ७४९९२३५९७५

* ठेवीचे व्याजदर *
* ४६ ते ९० दिवस ८%
* ९१ ते ३६५ दिवस ९%
* १ वर्ष व त्यापुढे १०%
* शुभलक्ष्मी दाम दुप्पट ठेव योजना ८४ महिने
* धनलक्ष्मी दैनंदिन बचत ठेव ५ महिने मुदत
* अमृत मासिक ठेव १.१५ लाखास १००० रु. दरमहा व्याज.
* कन्या लक्ष्मी १ लाखास ५ लाख रु १८ व्या वर्षी प्राप्त

दैनिक बचत (डेली कलेक्शन)
रिकरिंग (आर.डी.)
मुदत ठेव (एफ.डी.)
कमिशन एजंट नेमणे आहेत

संस्थापक - अनिल मोहिते
अध्यक्ष - अजय मोहिते



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २४.०३.२०२५ | अंक नं. ३२३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



# जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारं

## कार्यक्षम व कणखर नेतृत्व

## मा.श्री. अरुणकाका जगताप



आपणांस वाढदिवसाच्या
खुप खुप शुभेच्छा!

MAHAVIR GROUP
YOUR VISION, OUR REALTY

श्री. राजेश संतोष भंडारी

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय..
कापड बाजार, अहिल्यानगर.



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

लग्न, शुभकार्यासाठी
इंद्रज्योत लॉन्स
पॅकेज सुविधा उपलब्ध
* लग्नकार्य * साखरपुडा
* स्वागत समारोह
* बर्थ डे पार्टीज
* कॉन्फरन्स हॉल
* मुंजसाठी उपलब्ध
स्वाद केटर्स
स्वादिष्ट जेवणाची खास मेजवानी
सर्वप्रकारच्या जेवणाच्या आर्डर स्विकारल्या जातील.
मो. 9673097575/9970162727
जीत बजाज शोरुम शेजारी, नगर-छत्रपती संभाजीनगर रोड, शेंडी-पोखर्डी, अहिल्यानगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २४.०३.२०२५ | अंक नं. ३२३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

फक्त फायद्याच फायदा!
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

वॉटर ओव्हरफ्लो अलार्म लावा
पाणी आणि वीज दोन्ही वाचवा!
• साऊंड अलर्ट (हिंदी/इंग्रजी)
• चालू/बंद करण्यासाठी सूचक
• पाण्याची व विजेची बचत होते
• दोन पिन प्लग असलेली एक-मीटर केबल
फक्त ₹500/- मध्ये
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011



क्षेत्र असो कुठलेही,
प्रत्येक ठिकाणी आपली धमक..
सामाजिक सेवेत कर्तृत्वाची वेगळीच चमक
मा. आ. आमदार अरुणकाका जगताप
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक :
श्री. माधवराव लामखडे
उद्योजक तथा जि.प.सदस्य, अ.नगर
श्री. माधवराव लामखडे मित्र मंडळ
नगर-पारनेर
श्री. केतन माधवराव लामखडे मित्र मंडळ
निंबळक, ता. नगर



श्री. अर्जुनराव मल्हारी बोरुडे
चेअरमन
श्री. विकास दादासाहेब जगताप
व्हा. चेअरमन
वाढदिवस शुभेच्छा
यशस्वी भव!
मा. आ. श्री. अरुणकाका जगताप
आपणांस
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
- शुभेच्छुक -
अहमदनगर जिल्हा मजुर सहकारी संस्थांचा संघ मर्यादित, अहमदनगर
श्रमसहकार, सहकार सभागृह रोड, मार्केटयार्ड पाठीमागे, सारसनगर रोड, अ.नगर.
फोन : ०२४१ - २४५०८९४
- संचालक मंडळ -
श्री. प्रशांत सबाजीराव गायकवाड
सौ. लिलावती युवराज लाळगे
श्री. उत्तमराव वामनराव घोगरे
श्री. तान्हाजी बाबुराव गायकवाड
श्री. शंकरराव बाबुराव गायकवाड
श्री. विजय कचरु गायकवाड
श्री. सुशांत शांताराम गजे
श्री. प्रकाश पांडुरंग बोरुडे
सौ. विद्या विनायक काळे
श्री. प्रकाश भिमराज कराळे (व्यवस्थापक)
श्री. अनिलराव देवराम पाचपुते
श्री. नामदेव पांडुरंग ढोकणे
श्री. बाळासाहेब बाजीराव सोनवणे
श्री. रामचंद्र बापुराव राळेभात
श्री. राजु मलंगभाई फकीर
श्री. नानासाहेब माधव कानवडे
श्री. प्रकाश महादेव सदाफुले
श्री. किशोर सुर्यभान गायकवाड
सौ. रुक्मिणी गुलाबराव कराळे
श्री. व्ही.ओ. सांगळे (मानद सचिव)
सर्व सभासद व कर्मचारी वृंद..

SONI
Since 1965
TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

पाहिजेत
फ्लेक्स प्रिंटिंग ऑफिसमध्ये कामासाठी मुलगा पाहिजे.
• मशिन ऑपरेटर (जागा-२)
• ऑफिस बॉय (जागा-२)
कॉम्प्युटरचे बेसिक ज्ञान आवश्यक.
नमोह प्रिंटर्स
संपर्क-९४०३२३२३२३

घर कामासाठी/पेंशट सांभाळण्यासाठी
बाई मिळेल
* घर कामासाठी सकाळी ७.३० ते ९.३० पर्यत काही काम असतील तर सांगा. * स्वयंपाक पण करत आहे किंवा पेशंट सांभाळण्यासाठी नाईटला पण काम करेल. सकाळ-संध्याकाळ स्वयंपाकासाठी पण सांगा असेल तर..
7378706893

लाडके आमदार संग्रामभैय्या जगताप
आनंददायी अरुणोदय
नगरीत होतोय नव आरोग्यमंदिराचाही अभ्युदय...



मा. आ. अरुणकाका जगताप
वाढदिवसा निमित्त हार्दिक
अभिष्टचिंतन
* शुभेच्छुक *
चंपालाल, पंडीतलाल, विजयकुमार, दिलीपकुमार, सुभाषलाल,
वैभव, पवन, परेश, शुभम, सौरभ, अक्षय
एवम् गांधी परिवार - शिरुर (घोडनदी)
SS Gandhi Construction Pvt. Ltd.
Gandhi Construction
शिरुर - अहमदनगर - पुणे
Dishan

MAHA DISCOUNT offer
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Any Course Just in 1800/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD,
BD CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN,
C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## कल्पना-निर्मिती-अंमलबजावणी-यश

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात जगातील सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या यशाचे रहस्य त्यांच्या 'क्रियाशील कल्पनाशक्तीत' दडले आहे. यामुळेच सापेक्षवाद सिद्धांताचा जनक अल्बर्ट आईनस्टाईन नेहमी म्हणायचा, 'Imagination is more powerful than knowledge.'

तुम्ही कल्पना करा आणि त्या कल्पनेला मूर्त रूप देण्यास नियोजनबद्ध प्रयत्न करा. तुमची कल्पना प्रत्यक्ष वस्तुस्थितीत परावर्तीत होईल.

कल्पनाविलास व शास्त्रीय दृष्टिकोनाची जोड एखाद्या व्यक्तीला क्रियाशील बनवून विविध शोध, रचनांची निर्मिती करते. झाडावरून फळ खाली पडतांना न्यूटनच्या आधी कित्येक लोकांनी पाहिले असेल. जेम्स वॅटप्रमाणे लाखोंनी किटलीचे झाकण उडतांना पाहिले असेल. म्हणजेच कल्पनाशक्ती ही एकप्रकारची देणगी आहे. मन सक्रीय असेल तर कल्पनाशक्तीचा वापर करून नाविन्याचा, नवनिर्मितीचा आनंद आपल्या घेता येऊ शकतो व त्याचा सदुपयोग समाजालाही होऊ शकतो.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

जॉर्ज बर्नाड शॉ म्हणत असे की, 'जर तुम्हाला हवेत मजले बांधण्याची सवय असेल तर हरकत नाही. पण त्याच्याखाली पाया बांधण्यास विसरू नका.'

तात्पर्य, डोळे उघडे ठेवून सभोवारचे निरीक्षण करतांना नाविन्यपूर्ण कल्पना करता येणे हा आयुष्याचा आनंददायी अनुभव असतो.

सुदैवाने मला त्याची अनुभूती घेता तर येत आहेच, पण त्या कल्पनांनी व्यवसायात प्रॉडक्टचा प्रचार करता करता सामाजिक संदेश, सकारात्मकता देण्याचीही संधी मिळून आर्थिकतेसह प्रतिष्ठेचीही कमाई झाली.

आपल्या ध्येयात वेडे होऊन कल्पनेत रमल्यास ते वास्तवात येऊ शकते.

## केडगाव येथून मोटारसायकलची चोरी

नगर - केडगाव येथे नगर - पुणे महामार्गाच्या कडेला दुकानासमोर लावलेली मोटारसायकल (क्र.एम.एच.१४ ए एस ६२९२) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २१ मार्च रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास घडली. याबाबत संदीप मच्छिंद्र खोदे (वय ४३ रा. आदर्शनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी चोरट्याविरुद्ध बीएनएस २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## बुऱ्हाणनगर येथे दोन सख्ख्या बहिणींचा एकापाठोपाठ दुर्दैवी मृत्यू

नगर - नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथे दीड वर्षाच्या आणि ९ वर्ष वयाच्या दोघ्या सख्ख्या बहिणींचा एका पाठोपाठ एक दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अनुष्का नामदेव कर्डिले (वय दीड वर्ष) व वेदिका नामदेव कर्डिले (वय ९ वर्ष) अशी त्यांची नावे आहेत. त्यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याचा उलगडा शवविच्छेदन अहवाल आल्यावरच होणार आहे.



मयत अनुष्का नामदेव कर्डिले (वय दीड वर्ष) व वेदिका नामदेव कर्डिले (वय ९ वर्ष)

या दोघी बहिणी अचानक आजारी पडल्या, त्यांना ताप आला तसेच त्यांच्या पोटात व छातीत दुखत असल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना नगरच्या खाजगी दवाखान्यात उपचारासाठी नेले होते. त्यातील दीड वर्षाची अनुष्का हिला डॉक्टरांनी औषध देवून तिला घरी घेवून जायला सांगितले होते तर ९ वर्षाची वेदिका हिच्यावर दवाखान्यात उपचार सुरु होते. शुक्रवारी २१ मार्च रोजी अचानक अनुष्का हिच्या सर्व हालचाली मंदावून ती मयत झाली. तर शनिवारी २२ मार्चला मोठी मुलगी वेदिका हिचाही मृत्यू झाला. अचानक एकापाठोपाठ दोघी बहिणींचा मृत्यू झाल्याने कर्डिले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. दोघींच्या अचानक मृत्यूचा उलगडा होण्यासाठी वेदिका हिचे जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले असून त्याचा अहवाल आल्यावरच याबाबतचे कारण स्पष्ट होणार आहे.

## रतनबाई बरकसे यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - सिव्हील हडकोतील गणेश चौक परिसरातील रहिवासी सौ. रतनबाई अर्जुन (आप्पा) बरकसे (वय ६०) यांचे २३ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अर्जुन उर्फ आप्पा बरकसे यांच्या त्या पत्नी होत.

# ६ महिन्यापासुन चोऱ्या, घरफोड्यांचे सत्र सुरु, पोलिसांना तपास लागेना

## नागरिकांचे पोलिस अधीक्षकांना निवेदन, रात्रीची गस्त वाढविण्याची केली मागणी

नगर - बुरूडगाव रोड परिसरात तसेच साईनगर भागात गेल्या ६ महिन्यांपासून चोऱ्या, घरफोड्यांचे सत्र सुरु असून यातील एकाही गुन्ह्याचा तपास पोलिसांना लागलेला नाही, त्यामुळे परिसरातील नागरिक चोरट्यांच्या भीतीच्या छायेखाली वावरत असून या भागात रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी अशी मागणी या परिसरातील रहिवासी नागरिकांनी केली आहे.

याबाबत जिल्हा पोलिस अधिक्षक राकेश ओला यांची शिष्टमंडळाने २४ मार्चला दुपारी भेट घेवून निवेदन दिले. यावेळी आ.संग्राम जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, डॉ.महेश वीर, राजेश भंडारी, आदेश चंगेडिया, योगेश चंगेडिया, राजेंद्र बलदोटा, सतीश देसरडा, राजेंद्र मुथा, बाबुशेठ बोरा, संजय राका, डॉ.मुकुंद फासे, संदेश कटारिया, पंकज पटेल, समीर मुथा, रवींद्र शेलोत, अभय लुनिया आदी सह नागरिक उपस्थित होते.



बुरूडगाव रोड परिसरात तसेच साईनगर भागात गेल्या ६ महिन्यांपासून चोऱ्या, घरफोड्यांचे सत्र सुरु असून ते रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी निवेदनाद्वारे पोलिस अधिक्षकांकडे करताना आ.संग्राम जगताप व नागरिक, व्यापाऱ्यांचे शिष्ट मंडळ. (छाया - लहू दळवी)

या निवेदवनात म्हटले आहे की, साईनगर बुरुडगांवरोड परिसर हा अनेक रहिवाशांनी गजबजलेला आहे तेथे अनेक बंगले व फ्लॅटधारक रहिवास वास्तव्य करीत आहेत. गेली ६ ते ८ महिन्यापासून सदर परिसरामध्ये चोरट्यांनी खुप मोठ्या प्रमाणात धुमाकुळ घातलेला आहे त्याबाबत कोतवाली पोलिस स्टेशन, येथे एफ.आय.आर. दाखल आहे. याबाबतीत अनेक वेळेस पोलिसांना सांगुन देखील याचा योग्य तो तपास होत नाही व त्याबाबत निष्काळजीपणा होत आहे. यातुन खुप मोठा शारिरीक व आर्थिक धोका निर्माण होऊन मनुष्य होनी होण्याची खुप मोठी शक्यता निर्माण झालेली आहे.

६ महिन्यापुर्वी रवि शिलोत यांच्या बंगल्यामध्ये मोठा दरोडा करुन खुप मोठी आर्थिक नुकसान झाली, त्याचा कुठलाही तपास अद्याप पावेतो झालेला नाही. रस्त्याने जाताना बऱ्याच छोट्या-मोठ्या चोऱ्या होत आहेत, त्यामध्ये मंगळसुत्र हिसकावुन घेणे, सोनेनाणे पैसे आडके हिसकावुन घेणे अशा अनेक चौऱ्या होत आहे. त्यामुळे येथे कायदा व सुव्यवस्थेचा खुप मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदर परिसरामध्ये उद्योजक, प्रतिष्ठीत व्यापारी यांचे राहत आहेत. नुकतेच २ दिवसापुर्वी योगेश चंगेडिया यांच्या येथे पहाटे ३ वाजता दरवाजा फोडण्याचा प्रयत्न चालु असतांना घरातील लोक उठुन त्यांनी शेजारी पाजारी मित्रांना फोन केले व चोर-चोर अशी मोठ्याने आरडा ओरड झाल्यामुळे सदर ५ चोर त्यांनी चोरलेली मारुती व्हॅन तेथेच सोडुन पोबारा केला व सदर मारुती व्हॅनमध्ये खुप मोठ-मोठी हत्यारे होती. त्या मध्ये नशिबाने मनुष्यहानी व आर्थिक हानी सतर्कतेमुळे वाचली, परंतू सदर परिसरामध्ये अशा चोरांचा खुप मोठा सुळसळाट होऊन त्यांचा तेथे वावर रात्री बेरात्री चालु आहे. पोलिस स्टेशन यांना सदर घटनेच्या वेळी फोन केला असता त्यांनी त्याची वेळीच दखल घेतली नाही! सदर दखल वेळीच घेतली असती तर सदर दरोडेखोर सापडुन आले असते व त्यांचेवर मोठा वचक बसला असता याची पण आपणामार्फत योग्य ती चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच या भागात रात्रीची पोलिस गस्त वाढवावी अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

### गुन्हेगारांवर पोलिसांचा धाकच राहिला नाही : आ. जगताप

नगर शहरातील कोतवाली व तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीमध्ये चोऱ्या दरोडे महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढले आहे पूर्वीच्या काळामध्ये पोलीस गस्त घालायचे नागरिकांना भेटायचे चौकात असणाऱ्या वहीवर नोंद करायचे, काही अनुचित घटना घडल्यानंतर तातडीने बीट मार्शल घटनास्थळी जायचे. मात्र आता पोलिसांची कुठली यंत्रणा राहिली नाही त्यामुळे नागरिकांच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे तरी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी तातडीने लक्ष घालून घडलेल्या घटनांचा तपास तातडीने लावून गुन्हेगार व चोरांवर पोलिसांचा धाक निर्माण करावा अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी केली.

आ.संग्राम जगताप पुढे म्हणाले की शहर पूर्वी ११ वाजता बंद केले जायचे! मात्र आता नाईटला परवानगी दिली काय? असा प्रश्न आम्हाला पडला आहे. रात्री तीन ते चार वाजेपर्यंत शहरांमध्ये वर्दळ दिसती काही वेगळ्या विचाराचे लोक बस स्थानकावर फिरत असतात यांचे काय काम असते? हे कुठल्या तरी वेगळ्या भागात राहत असतात हेच खरे दरोडेखोर आहे' पोलिसांनी यांच्या गाडीचे कागदपत्र तपसली पाहिजेत बिगर नंबर प्लेटच्या गाड्यावर फिरणाऱ्यांची तपासणी करण्यात यावी अशी मागणी आ. जगताप यांनी केली आहे.

### तडजोड करणारी पोलिसांची गँग तयार झालीय

पोलीस स्टेशनच्या प्रमुखांच्या भोवती जे कर्मचारी गोळा झाले आहे ते फक्त अवैद्य धंद्याशी संपर्क असणारी लोक आहे. यांचे पुरावे आमच्याकडे आहेत. पोलीस स्टेशनमध्ये नेमलेले अधिकारी व कर्मचारी नागरिकांच्या संरक्षणासाठी आहे की लोकांना लुटण्यासाठी आहे! हा प्रश्न जनतेच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. कापड बाजारातील दुकान खाली करण्याकरता लोक येतात त्याची तोडजोड करण्याचे काम पोलीस स्टेशनमध्ये होते. तडजोड करणारी गँग पोलिसांची तयार झाली आहे. यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. जिल्ह्यामध्ये व शहरांमध्ये हे काय चालले आहे, या पोलिसांवर कोणाचा धाक आहे की नाही, हे सुद्धा तपासणीची वेळ आपल्यावर आली आहे. घडलेल्या घटनांचा तपास पूर्ण होत नसेल तर पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे ते न स्वीकारता दिवसभर कलेक्शन करण्यात पोलीस व्यस्त आहे, या घटना शासनाच्या निदर्शनास आणून द्याव्या लागतील असा इशारा आमदार संग्राम जगताप यांनी दिला आहे.

## भिमाबाई निक्रड यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - मांडवे येथील रहिवासी भिमाबाई तुकाराम निक्रड (वय ९२) यांचे २३ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर सांडवे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रामदास, तुळशीराम निक्रड यांच्या त्या मातोश्री होत.





तपोवन रोडवरील मेन ८ इंची लाईनला खालील सर्व भागामधील अतंर्गत सर्व कॉलनीच्या लाईन जोडण्याचा याव्या व पिण्याच्या पाण्याचा टाईम किमान २ तास वाढवून मिळावा, या मागणीसाठी माजी नगरसेविका शारदाताई ढवण यांच्या नेतृत्वाखाली मनपा आयुक्त व माजी खासदार डॉ. सुजय विखे यांना निवेदन देण्यात आले.

## समींद्राबाई गावखरे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - चास, ता. नगर येथील रहिवाशी श्रीमती समींद्राबाई गावखरे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने राहत्या घरी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात ५ मुले, १ मुलगी, सून, जावई, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. त्यांच्यावर चास येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्या जुन्या पिढीतील शेतकरी कै. विठ्ठलराव गावखरे यांच्या पत्नी तर राधाबाई काळे महिला महाविद्यालय अहिल्यानगर येथील प्रा. बाळासाहेब गावखरे यांच्या मातोश्री होत्या.

## विठ्ठलराव झेंडे पाटील यांचे निधन

श्रीगोंदा - चिखली ता. श्रीगोंदा येथील विठ्ठलराव भैयासाहेब झेंडे पाटील यांचे (वय ८५) निधन झाले. ते एसटी महामंडळ अहिल्यानगर डेपो येथे वाहतूक नियंत्रक म्हणून काम पहिले. ते सेवानिवृत्त झाले होते.



त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली, जावई, सुन, नातवंड, ४ भाऊ, पुतणे असा परिवार आहे. ह. भ. प. नारायण झेंडे सर यांचे ते वडील, माजी सरपंच रामेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अजिंक्य झेंडे यांचे ते चुलते होत.

# पिण्याच्या पाण्याची वेळ किमान २ तास वाढवा अन्यथा आंदोलन

## नागरिकांचे मनपा आयुक्त व डॉ. सुजय विखे यांना निवेदन

नगर - तपोवन रोडवरील मेन ८ इंची लाईनला खालील सर्व भागामधील अतंर्गत सर्व कॉलनीच्या लाईन जोडण्याचा याव्या व पिण्याच्या पाण्याचा टाईम किमान २ तास वाढवून मिळावा, या मागणीसाठी माजी नगरसेविका शारदाताई ढवण यांच्या नेतृत्वाखाली अभयनगर, तपोवन हडको, ढवणवस्ती, सावेडी, अहिल्यानगर भागातील नागरीकांच्यावतीने मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले. अनिल ढवण आरसुळे अनिकेत, ॲड. सुनील भागवत, कलापुरे सुधाकर, मीना कराळे, सुरेखा चव्हाण, प्रियंका मेरुगु, रंजना शेंगाळ, प्रीतम भांगरे, राणी पाटील, आश्विनी चव्हाण, लावरे प्रियंका, मेघा आंबेकर, ज्ञानेश्वरी तळेकर, वर्षा खोजे, आशा डोंगरे, दीप्ती जगताप, श्रद्धा पंडित, जयश्री सोनवणे, संगीता उगले, संध्या जगताप, योगिता आंधळे, राठोड सविता, ससाने चारुशीला व परिसरातील नागरिक, महिला उपस्थित होत्या.

अभयनगर, तपोवन हडको, ढवणवस्ती या ढवणवस्ती या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोकवस्ती झाल्या कारणाने या सर्व ठिकाणी वारंवार नागरिकांची पिण्याच्या पाण्याच्या नळ कनेक्शनसाठी मागणी होत आहे. या परिसरातील नागरीक मनपा हद्दीत अनेक वर्षापासून वास्तव्य करत असून, सर्व नागरीक पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे. अनेक वेळा मनपा कर्मचाऱ्यांशी संपर्क केला असता उडवाउडवीची उत्तरे देत आहे. प्रशासनास योग्य त्या सूचना देऊन लवकरात लवकर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

यावेळी बोलतांना शारदाताई ढवण म्हणाले की, तपोवन हडकोमध्ये लोकवस्ती वाढत चालली असून, या भागात पिण्याच्या पाण्यासाठी नागरीकांचे हाल होत असून पिण्याच्या पाण्याच्या नळ कनेक्शनसाठी नागरिकांची मागणी होत आहे. यासंदर्भात माजी खा.सुजय विखे व मनपाचे आयुक्त यशवंत डांगे, पाणीपुरवठा अभियंता परिमल निकम निवेदन देण्यात आले. अनेक वर्षांपासून ही मागणी करण्यात येत आहे. अनेक वेळा मनपा आयुक्तांना निवेदन ही देण्यात आले. परंतु आपर्यंत काम मार्गी लागले नाही. लवकरात लवकर पाण्याचा प्रश्न मार्गी लागावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

यावेळी या भागातील नागरीक म्हणाले की, डॉ. सुजय विखे पाटील यांना भेटुन निवदेन दिले असून, त्यांनी यावेळी आश्वासन दिले की, ८ दिवसात पाण्याचा प्रश्न सुटेल, तशा सुचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. आम्ही मनपा हद्दीत रहातो की, एखाद्या गाव, वस्तीत राहतो, अशा प्रकारच्या असुविधांचा सामना आम्ही गेली १० वर्ष झाली करतोय. आता अपेक्षा आहे की डॉ. सुजय विखे व आयुक्त यांनी आश्वासन दिले असून, ८ दिवसात पाण्याचा प्रश्न सुटेल आणि हा प्रश्न सुटला नाही, तर तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात कविता तयार केल्याच्या निषेधार्थ दिल्लीगेट वेस येथे कुणाल कामराचा प्रतिकात्मक पुतळा दहन

नगर - महाराष्ट्रातील जनतेने २०२४ साली कोण गद्दार व कोण खुद्दार आहे, हे दाखवुन दिलेले आहे. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा कोणाकडे गेला आहे, हे जनतेने ठरवलेले आहे. गायक कुणाल कामरा यानी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात आक्षेपार्ह कवितेच्या माध्यमातून जे अपशब्द वापरले ते जनतेला आवडले नाही. त्यांचा निषेध म्हणून अहिल्यानगर शिवसेनेच्यावतीने कुणाल कामराचा पुतळा दहन करुन निषेध व्यक्त केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात अपशब्द बोलणाऱ्यांना जसाच तसे उत्तर दिले जाईल, असे प्रतिपादन शहरप्रमुख सचिन जाधव यांनी केले.




उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात अपशब्द वापरुन आक्षेपार्ह कविता तयार करणाऱ्या कुणाल कामरा याचा अहिल्यानगर शिवसेनेच्या वतीने प्रतिकात्मक पुतळ्यास जोडे मारुन दिल्लीगेट वेस येथे दहन करण्यात आले.

एकनाथ शिंदे यांच्या विरोधात अपशब्द वापरुन आक्षेपार्ह कविता तयार करणाऱ्या कुणाल कामरा याचा प्रतिकात्मक पुतळ्यास जोडे मारुन दिल्लीगेट वेस येथे दहन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, शहर प्रमुख सचिन जाधव, संपर्क प्रमुख दिलीप सातपुते, संभाजी कदम, संजय शेंडगे, गणेश कवडे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, दत्ता कावरे, प्रशांत गायकवाड, संतोष गेनप्पा, दिपक खैरे, काका शेळके, संदिप दातरंगे, प्रविण भोसले, अण्णा घोलप, अरुण झेंडे, अभिजित अष्टेकर, रमेश खेडकर, सलोनी शिंदे, सुनिता बहुले, सागर थोरात, अभि दहिहंडे, पोपट पाथरे, अक्षय भिंगारे, दामोदर भालसिंग आदिंसह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा प्रमुख अनिल शिंदे म्हणाले, एकनाथ शिंदे यांच्या विरोधात आक्षेपार्ह कविता तयार केले आहे. उपमुख्यमंत्री शिंदे हे महाराष्ट्रातील सर्वसामान्यांचे नेते आहे. मुख्यमंत्री असतांना त्यांनी अनेक लोक कल्याणकारी कार्य केले असून, त्यांच्या विरोधात असे कविता तयार करणे योग्य नाही. कुणाल कामरा यांचा शिवसेना स्टाईलने बंदोबस्त करुन महाराष्ट्रात त्याला फिरु देणार नाही. उपमुख्यमंत्री यांचा असा प्रकारे अपमान करणे विरोधकांना शोभणारे नाही, असे त्यांनी यावेळी सांगितले.

संभाजी कदम म्हणाले की, महाराष्ट्राचे नेतृत्व करणारे एकनाथ शिंदे यांच्या विरोधात आक्षेपार्ह कविता तयार करणारे कुणाल कामरा याने माफी मागावी. तुम्ही कॉमेडी अवश्य करा, पण त्याद्वारे कुणी अपमानित करण्याचे काम करत असेल तर हे सहन केले जाणार नाही, असे म्हणाले,

दिलीप सातपुते म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या विरोधात कुणाल कामरा याने हीन दर्जाची कविता केली. कुणाल कामराचा महाराष्ट्रात कुठेही कार्यक्रम होऊ दिला जाणार नाही. कामरा यास जिथे दिसेल तिथे काळे फासले जाईल, असे सांगितले.



हनुमान चालिसा पाठ

मंगळवार दि. २५/०३/२०२५
रात्री ८.३० ते १०.३०

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**शशिकांत गाडे (परिवार)**, यशांजली बंगला, हनुमान मंदिराजवळ, गोविंदपुरा, योगीराज गाडे मो. ९६८९८९६९८२.

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एमआयडीसी, अहिल्यानगर**
**क्रांतीवीर प्रतिष्ठान ट्रस्ट**, प्रोफेसर चौक, रमेश हिवाळे, मो. ९८८१६४४५४९, दिपक आडेप, मो. ९१३०९२२९२२

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर, नवीपेठ**
**समझोता तरुण मंडळ**, अभिषेक लॉजच्या जवळ, कानडे गल्ली, माळीवाडा

**श्री संकटमोचन हनुमान सत्संग मंडळ, अहिल्यानगर**
**श्री अन्नपूर्णा केटरर्स**, पांजरापोळ, दौंड रोड, अहिल्यानगर

# कलमा, नमाज, जकात, रोजा व हज हे इस्लामचे पाच मूलस्तंभ, तर आदर्श माणूस, कुटुंब व समाज निर्मिती हा रोजाचा मूळ उद्देश

**डॉ. रफिक सय्यद यांचे मार्गदर्शन**


जामा मस्जिद श्रीगोंदा येथे हिंदू-मुस्लिम यांच्या संयुक्तिक रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – रोजा म्हणजे पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत अन्न पाणी सोडणे नव्हे, रोजा डोळ्यांचा, जीब्हेचा, कानांचा, हातापायांचा सुद्धा आहे. आदर्श माणूस, आदर्श कुटुंब व आदर्श समाज निर्मिती हाच रोजाचा मूळ उद्देश आहे. रोजदार माणसाचे बोलणे, ऐकणे, पहाणे, वागणे आणि देवाण-घेवाण आदर्शवत असली पाहिजे. इंद्रियावर ताबा असायला हवा अन्यथा रोजा ठेवून जो खोटे बोलतो खोटे वागणे सोडत नाही त्याच्या निव्वळ उपासमारीची अल्लाह ला काडी मात्र गरज नसल्याचे व हेच प्रेषितांना अपेक्षित असल्याचे डॉ. रफिक सय्यद यांनी रोजा इफ्तार कार्यक्रमा दरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले.

जामा मस्जिद श्रीगोंदा येथे हिंदू-मुस्लिम यांच्या संयुक्तिक रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. इस्लाम व रोजा याविषयी मार्गदर्शन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ॲड.संभाजी बोरुडे उपस्थित होते.

कलमा, नमाज, जकात, रोजा आणि हज हे इस्लामचे मूळ स्तंभ असल्याचे सांगून डॉ. सय्यद पुढे म्हणाले रमजान या पवित्र महिन्यात रोजे अदा केले जातात. सूर्य उगवण्याच्या दीड तास अगोदर पासून रोजाची सुरुवात होऊन सूर्यास्तानंतर इफ्तार ने याची सांगता होते. दरम्यानच्या काळात परमेश्वराचे नामस्मरण, इबादत केली जाते. केवळ उपाशी रहाणे म्हणजे रोजा नव्हे. तर रोजेदारावर अनेक बंधने असतात. त्यांचे तंतोतंत पालन होणे आवश्यक असते तरच रोजा पूर्ण होतो. रोजा असताना रोजेदाराने आपले डोळे, कान, हात, पाय, जीव्हा आदींवर देखील नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वाईट बोलणे, वाईट ऐकणे, हाताने, पायाने कोणाला त्रास देणे असे प्रकार घडल्यास त्याला रोजा म्हणता येणार नाही. आपल्यापासून इतरांना त्रास होईल असे कृत्य आपल्याकडून होता कामा नये याचीही पुरेपूर काळजी घ्यावी लागते. पवित्र ग्रंथ कुराणचा दाखला देत त्यांनी म्हटले आहे की जीवनाचे सार्थक करा ज्यांच्यात वाद आहेत ते मिटवा. भावा-भावात असलेले मतभेद मिटवा. त्यांना जोडण्याचे काम करा. घोटाळे बेइमानी करू नका, परोपकार करा, चांगले कर्म करा ते तुमच्या बरोबर येणार आहेत. या शिकवणी नुसार पालन केले तर तुमच्या रोजाचे व जीवनाचे सार्थक होईल व या पवित्र महिन्यात आचरणात आणलेल्या प्रत्येक चांगल्या सवयीचे तुम्ही आदी व्हाल. ज्यामुळे तुम्हास कायम चांगले वागण्याची सवय लागेल. डॉक्टर नाही होता आले, इंजिनिअर नाही होता आले, वकील नाही होता आले तरी चालेल किमान चांगले माणूस झालात तरी खूप असे सांगून त्यांनी मानवी जीवनाचा खरा अर्थ सांगितला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ॲड. बोरुडे यांनी आज प्रथम वेळेस या पवित्र ठिकाणी आल्याचा आनंद तर झाला आहेच, मुस्लिम समाजाच्या लोकांनी सर्व समाजातील लोकांना एकत्रित बोलावून प्रेषितांना अपेक्षित असा जीवन जगण्याचा मार्ग दाखवून या अमृततुल्य 'डोस' बरोबरच इतक्या प्रेमाने जवळ बसवून स्वतः घेत असलेल्या रोजाचा प्रसाद अर्थात आपल्या घासातील घास आम्हालाही दिला हा भाई चारा पाहून आपण भारावून गेलो आहोत. असे सांगत बोरुडे म्हणाले बाहेर ज्याप्रमाणे मुस्लिमांबद्दल गैरसमज पसरवून हे वाईट आहेत असे भासवण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र इथे आल्यानंतर वेगळीच पवित्रता आणि बंधुभाव व प्रेम पहायला मिळाले याचा मनस्वी आनंद झाल्याचे सांगून हे कार्यक्रम वारंवार व्हावेत त्यामुळे आपा-पसातील प्रेम आणखी वृध्दींगत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी अनेक हिंदू बांधवांनी पवित्र रमजान व रोजा निमित्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या व इफ्तार कार्यक्रमाची सांगता झाली. मुस्लिम बांधवांनी केलेल्या नेटक्या नियोजनाचे व प्रेमाने दिलेल्या इफ्तार पार्टीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सावेडी येथील 'चंदुकाका ज्वेल्स्' दालनात गुढीपाडव्यानिमित्त सोनेरी फायदा योजना

चंदुकाका ज्वेल्स

नगर – गुढीपाडव्यानिमित्त सावेडी स्थित चंदुकाका ज्वेल्स सुवर्णग्राहकांसाठी घेवून आले आहेत गुढीपाडवा सोनेरी फायदा योजना. याअंतर्गत भरपुर फायदा मिळणार आहे. एकतर फक्त १०% रक्कम भरून आपले सोने बुक करू शकतात. त्यानंतर बाजारात कितीही चढ उतार आले तरी त्याची तुम्हांला काहीही टेन्शन घेण्याची गरज राहिलेली नाही. कारण तुम्ही ज्या दिवशी सुवर्णखरेदी कराल त्या दिवशीचा सोन्याचा दर व बुकिंग केलेल्या दिवशीचा सोन्याचा दर यापैंकी जो दर कमी असेल त्या दरात आपण सोने खरेदी करू शकतात. शिवाय याहुनही अधिक म्हणजे तुम्ही खरेदी करत असलेल्या सोन्यावर तुम्हाला प्रतीग्रॅम ३३ रूपये सूट देखील मिळणार आहे. म्हणजे सुवर्णग्राहकांचा फक्त फायदाच नाही तर डबल फायदा.

सदर योजना ही २२ कॅरेट दागिन्यांवर लागू आहे. योजना ३० मार्च पर्यंतच चालु असल्याने अधिकाधिक सुवर्णग्राहकांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन संचालकांनी केले आहे.

चंदुकाका ज्वेल नेहमीच ग्राहकांच्या फायद्याच्या दृष्टीने नवनवीन योजनाचे आयोजन करीत असतो. प्रत्येकाला सुवर्णखरेदीवर ऑफरचा लाभ मिळावा हा या मागील उद्देश असतो.आमच्या येथे नेहमीच नविन आणि लेटेस्ट फॅशनने परिपुर्ण अलंकार हजर स्टॉकमध्ये उपलब्ध असतात. कुंदन, टेम्पल, कलकत्ती व स्टोन सेटींगमधील दागिन्यांचे अप्रतिम डिझाईन्सचा भव्य श्रेणी आपल्यासाठी उपलब्ध आहे.

खास आपल्या सुवर्ण ग्राहकांसाठी भविष्यातील फायद्याच्या सोने खरेदीसाठी सुवर्णसमृध्दी योजना आणली आहे. यामध्ये आपण आजच सहभागी होवून १० मासिक हप्ते भरा व योजना पुर्ण झाल्यावर दागिने खरेदी करतांना भरघोस फायद्यासह मजुरीवर देखील भरघोस सुट मिळवू शकतात. नुकतीचे लाँच केलेली लकी गोल्ड योजना ग्राहकांच्या पसंतीस र्उीरलेली आहे. या योजने अंतर्गत ११ हप्ते भरा व सोने खरेदी करतांना मजुरीमध्ये १००% सूट मिळवा. म्हणजेच सोने खरेदी करतांना आपणांस फक्त सोन्याचे मुल्य द्यावयाचे आहे. मजुरी लागणार नाही.

खास सुवर्णग्राहकांसाठी विविध डिझाईन्समध्ये बकुळीहार, राणीहार, शाहीहार, नेकलेस, ठुशी, ताशीवमाळ, पाटल्या, बांगड्या, टॉप्स तसेच टेम्पल ज्वेलरी मध्ये बिंदी, बाजुबंद, टॉप्स्, झुमका, काप, नेकलेस, अंगठी, चोकर, पाटल्या, बांगड्या, ब्रासलेट, पदक व गंठणची भव्य श्रृंखला.. आपणांस हजर स्टॉकमध्ये उपलब्ध आहे.

चांदीमधील फॅशन ज्वेलरी फॉर्मिंगमधील (१ ग्रॅम सोन्यामधील) फॅशन ज्वेलरी, चांदी व सोन्या मधील आकर्षक फ्रेमही उपलब्ध.

चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील सुवर्णखरेदी केलेल्या दागिन्यांची मोडतेवेळी कोणत्याही प्रकारची घट धरली जात नाही हे ज्वेल्स्चे विशेष वैशिष्ट्ये. या विविध योजनांमुळे ग्राहकांना अधिकाधिक फायदा मिळणार आहे. तरी आमच्या सर्व ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन संचालकांनी केले आहे.

# सहकारी संस्थेसाठी लवाद म्हणून माजी न्यायाधीश चंद्रचूड गोंगलेंची निवड



नगर – सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी बहुराज्यीय सहकारी संस्थांसाठी संघटनात्मक व कायदेशीर बाबी विषयी, आर्थिक व लेखाविषय इत्यादी बाबींसाठी लवाद (Arbitrator) म्हणून अहील्यानगर येथील माजी जिल्हा न्यायधीश चंद्रचूड द. गोंगले यांची २०२५ ते २०२८ या तीन वर्षासाठी निवड केलेली आहे.

चंद्रचूड द. गोंगले यांनी यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयातही प्रशासक म्हणून चांगले काम पाहिलेले आहे. तसेच महाराष्ट्र सेल टॅक्स ट्रिब्यूनल, मुंबई यावर न्यायिक सदस्य (Judicial Member), तसेच Maharashtra Real Estate Appellate Tribunal वर रजिस्ट्रार (प्रबंधक) म्हणून काम पाहिलेले आहे.

तसेच त्यांचे शालेय शिक्षण अहिल्यानगर येथील दादा चौधरी विद्यालय येथे, महाविद्यालयीन शिक्षण पेमराज सारडा कॉलेज येथे व कायद्याचे शिक्षण न्यू लॉ कॉलेज अहिल्यानगर येथे झाले. त्यांनी नगर जिल्हा न्यायालयात वकीली व्यवसाय केला व अहिल्यानगर जिल्हा वकील संघटनेचे सचिव म्हणूनही काम पाहिलेले आहे.

तसेच ते मुंबई उच्च न्यायलयाच्या लवाद समितीवरही कार्यरत आहेत.

# माता मृत्यू रोखण्यासाठी आरोग्य केंद्रांनी गरोदर मातांचे समुपदेशन करावे

**उपाययोजनांसाठी महानगरपालिकेत वैद्यकीय तज्ज्ञांच्या उपस्थितीत बैठक**


माता मृत्यू रोखण्यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार महानगरपालिकेत वैद्यकीय तज्ज्ञांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

नगर – महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सर्व आरोग्य केंद्रांनी त्यांच्या परिसरातील गरोदर मातांची माहिती घेऊन त्यांची संस्थेत नोंदणी करून घ्यावी, त्यांचे समुपदेशन करून सर्व तपासण्या वेळेत कराव्यात. माता मृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशा सूचना उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी आरोग्य विभागाला दिल्या. माता मृत्यू रोखण्यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार आरोग्य विभागाने वैद्यकीय अधिकारी स्तरावर बैठका घेतल्या. त्यानंतर आयुक्त स्तरावर बैठक पार पडली. यात आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली माता मृत्यू रोखण्यासाठी उपाययोजनाबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, स्त्री रोग संघटनेचे डॉ. अमित करडे, डॉ. वृषाली पाटील, आयएमएचे अध्यक्ष डॉ. सी. डी. शर्मा, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. गणेश मोहाळकर, डॉ. प्रवीण डुंगरवाल आदींसह महानगरपालिकेचे सर्व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

माता मृत्यू रोखण्यासाठी यशवंत डांगे यांनी प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व आरोग्य केंद्रांनी त्यांच्या परिसरातील गरोदर मातांची माहिती संकलित करावी. त्यांची भेट घेऊन संस्थेत त्यांची नोंदणी करून घ्यावी. त्यांचे योग्य समुपदेशन करावे. आवश्यक असलेल्या सर्व तपासण्या करून त्यांना वेळेत योग्य उपचार मिळतील, याची दक्षता घ्यावी, असे विजयकुमार मुंडे यांनी सांगितले.

शहरातील नागरिकांनीही त्यांच्या घरातील गरोदर महिला असल्यास महापालिकेच्या आरोग्य केंद्रात, बाळासाहेब देशपांडे रुग्णालयात संपर्क साधावा. वेळेत तपासण्या करून घ्याव्यात, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

दरम्यान, सोमवारी जागतिक क्षयरोग दिवस आहे. या निमित्ताने जुन्या महानगरपालिकेपासून जनजागृतीसाठी रॅली काढण्यात येणार आहे. जुनी महानगरपालिका, आशा टॉकीज, भिंगारवाला चौक, एम. जी. रोड, डाळमंडई, पारशा खुंट, धरती चौक ते बूथ हॉस्पिटलपर्यंत ही रॅली काढण्यात येणार आहे. सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, लॅब टेक्निशियन, आशा सेविकांनी यात सहभागी व्हावे, असे निर्देश यशवंत डांगे यांनी दिले आहेत.

# जनजागृतीपर उपक्रमात महापालिका राज्यात तिसऱ्या क्रमांकावर

**प्रशासक यशवंत डांगे; जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जनजागृती रॅली, अभियानात १०० दिवसात शहरात २०० हून अधिक शिबिरे**



जागतिक क्षय रोग दिनानिमित्त शहरातून प्रभात फेरी काढण्यात आली. यात महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह आशा सेविकांनी सहभाग घेतला.

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभरात क्षयरोग मुक्त भारत अभियान राबवण्यात आले. या निमित्ताने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने ७ डिसेंबर ते १७ मार्च या कालावधीत सुमारे दोनशेहून अधिक शिबिरे घेण्यात आली. यात शहरामध्ये २१० रुग्ण आढळले असून त्यांच्यावर मोफत उपचार सुरू करण्यात आले आहेत. क्षयरोग मुक्त अहिल्यानगर साठी लक्षणे असलेले रुग्ण वेळीच शोधून त्यांच्यावर उपचार करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. त्यासाठी हे जनजागृती अभियान राबविण्यात आले आहे. या उपक्रमात महानगरपालिका राज्यात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

जागतिक क्षय रोग दिनानिमित्त शहरातून प्रभात फेरी काढण्यात आली. यात महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह आशा सेविकांनी सहभाग घेतला. तसेच, प्रयत्न नर्सिंग होम, बूथ हॉस्पिटल, आनंदऋषीजी नर्सिंग कॉलेज असे चार नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यात सहभागी झाले होते. यशवंत डांगे यांच्या हस्ते या रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. जुनी महापालिका, आशा टॉकीज, माणिक चौक, भिंगारवाला चौक, तेलिखुंट, डाळमंडई, पारशाखुंट, बूथ हॉस्पिटल पर्यंत ही रॅली काढण्यात आली. यातून क्षय रोगाच्या लक्षणांबाबत जनजागृती करण्यात आली.

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून १०० दिवसाचे अभियान राबविण्यात आले. यात सुमारे २०० शिबिरे ७ डिसेंबर ते १७ मार्च या कालावधीत घेण्यात आले. त्यात २१० रुग्ण आढळले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तपासण्या, उपचार पूर्णपणे मोफत आहेत. नवीपेठ येथे महापालिकेचा क्षयरोग विभाग असून तेथे सर्व अत्याधुनिक तपासण्या मोफत करण्यात येत आहेत. प्रत्येक रुग्णाला सहा महिन्यात ६ हजार रुपये सहा महिन्यात शासनाकडून देण्यात येत आहेत.

क्षय रोगाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती आवश्यक आहे. त्यातून वेळीच रुग्ण शोधून त्यांच्यावर योग्य उपचार करता येतात. या उपक्रमात आरोग्य विभागाने चांगली मेहनत घेऊन काम केले आहे. त्यामुळेच महापालिकेला राज्यात पहिल्या तीन क्रमांकात स्थान मिळाले आहे. नागरिकांनीही लक्षणे आढळल्यास तत्काळ महानगरपालिकेच्या नवीपेठ येथील क्षयरोग विभागात संपर्क साधून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

दरम्यान, क्षयरोग जनजागृतीसाठी नवीन महापालिका कार्यालयात रांगोळी स्पर्धा तसेच, डॉ. विखे पाटील कॉलेज येथे पोस्टर व रिल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

क्षयरोग जनजागृतीपर या स्पर्धा २५ मार्च रोजी घेण्यात येणार असल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी सांगितले.

# राष्ट्रीय कार्यशाळेत अहिल्यानगरच्या डॉ.पाऊलबुधे फार्मसी विद्यार्थ्यांचे यश


वसंत टेकडी येथील डॉ. पाऊलबुधे फार्मसीचे विद्यार्थ्यानी राष्ट्रीय कार्यशाळेत सुयश मिळविले त्यांना प्रशस्तीपत्रक, बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. (छाया– विजय मते)

नगर – अहिल्यानगर येथील वसंत टेकडी जवळील डॉ. ना. ज. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय कार्यशाळेत सहभागी होऊन नेत्रदिपक सुयश मिळविले.

सोनई येथील मुळा एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह, बक्षीस देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.विनायक देशमुख, डॉ. विजय तांबे, प्राध्यापक घावटे, शिक्षक वृंद उपस्थित होते.

अहिल्यानगर सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. ना. ज. पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेत सहभागी होऊन त्यांनी तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस पटकावले. फार्मसी कॉलेजच्या बी फार्मसी द्वितीय वर्षातील रितिका वाघ व पुजा दारकुंडे या विद्यार्थ्यांनी नोवेल फाइटोसिमल कॉम्प्लेक्स ऑफ पॅनो ग्रीन एक्स्ट्राक्ट बुस्टिंग बायो एव्हेलेबी अवेलेबिलिटी ग्री थेरपीटिक एपीकेस ऑफ एक्स्टेक्स या विषयाचे पोस्टर प्रेझेंटेशन केले. प्राचार्या अनुराधा चव्हाण, प्रा.संयोगिता गायकवाड यांचे लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुद्धे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, खजिनदार रामकिसन देशमुख, सदस्य दादासाहेब भोईटे, संचालक साई पाऊलबुद्धे, प्रशासक डॉ. श्रद्धा पाऊलबुद्धे, बीएडच्या प्राचार्या डॉ.रेखाराणी खुराणा, फार्मसीचे प्राचार्य डॉ.श्याम पंगा, डी फार्मसीच्या प्राचार्या अनुराधा चव्हाण, डॉ.वेणू कोला आदींसह शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# आनंदधाम भक्त निवास येथे २८ मार्च रोजी रक्तदान शिबीर


नगर – आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३३ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त मानव सेवा केंद्र, धार्मिक परीक्षा बोर्ड आयोजित व अहमदनगर मर्चंटस् को.ऑप.बँक प्रायोजित रक्तदान शिबीर २८ मार्च रोजी भक्त निवास, आनंदधाम येथे सकाळी ९ ते ५ यावेळेत होणार आहे. आनंदऋषीजी ब्लड बँक (नगर व पुणे), जन कल्याण रक्तपेढी, बाळासाहेब देशपांडे रकतपेढी, सिव्हील हॉस्पिटल यांची टिम रक्त संकलनाचे काम पाहणार आहे.

उद्घाटन सकाळी ९ वाजता मर्चंटस् बँकेचे चेअरमन तथा जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धार्मिक परीक्षा बोर्डचे अध्यक्ष नेमीचंद चोपडा (पाली, राजस्थान) भूषविणार आहेत. यावेळी माजी.आ.अरूण जगताप, आ.संग्राम जगताप, गणेश भोसले, आरोग्य अधिकारी डॉ.सतीश राजूरकर, प्रकाश भागानगरे, मीनाताई चोपडा, शितलताई जगताप, बँकेचे व्हा.चेअरमन अमित मुथा व बँकेचे सर्व संचालक उपस्थित राहणार आहेत.

गुरुदेवांप्रती श्रध्दांजली अर्पण करताना रक्तदानाचे पवित्र कार्य करण्याची संधी यानिमित्ताने भाविकांना मिळत असते. तीन दशकांच्या रक्तदान महायज्ञात आतापर्यंत सुमारे ३१ हजार रक्त पिशव्यांचे संकलन झाले आहे. यात महिलांचाही उत्स्फूर्त सहभाग असतो. महिलांसाठी शिबिराच्या आधी दोन महिन्यांपूर्वी मोफत हिमोग्लोबीन तपासणी शिबिर घेवून त्यांना उपचार मार्गदर्शन केले जाते. यावर्षीही भाविकांनी उदंड प्रतिसाद देत रक्तदानाचा नवीन विक्रम स्थापित करावा, असे आवाहन धार्मिक परीक्षा बोर्डचे सचिव संतोष बोथरा, मानवसेवा केंद्राचे संयोजक डॉ.विजय भंडारी, धार्मिक परीक्षा बोर्डचे सह मानद मंत्री सागर गांधी व बँकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# 'महिला सशक्तीकरण'वर SHEnergy प्रेरक कार्यक्रम





१६ मार्च रोजी महिला दिनानिमित्त अर्हम पुरुषाकार मेडिटेशन, अर्हम गर्भसंस्कार साधना आणि न्यूट्रिशन ब्लीस यांच्या संयुक्त सहभागाने महीला सशक्तीकरण या विषयावर एक प्रेरक कार्यक्रम SHEnergy आयोजित करण्यात आला होता. केशर गुलाब मंगल कार्यालयामध्ये झालेल्या या कार्यक्रमांमध्ये दीडशेहून अधिक महिलांनी भाग घेतला होता.

कार्यक्रमाची सुरुवात विश्व कल्याणकारी नमस्कार महामंत्रानी झाली व त्यानंतर लगेचच उपस्थित महिलांना ऊर्जावान करण्यासाठी आहारतज्ञ, प्रमाणित योग प्रशिक्षक आणि मेडिटेशन ट्रेनर, Nutrition Bliss by Kalyani च्या मार्गदर्शिका कल्याणी चोरबेले यांनी समस्त महिला वर्गाला हसत-खेळत मार्गदर्शन केले.

महिलांचे जीवन अनेक टप्प्यांतून जात असते-शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक संघर्षांनी भरलेले. या सेमिनारमध्ये स्त्रीत्वाचा सन्मान, आरोग्य, योग, ध्यान आणि संतुलित आहाराचे महत्त्व, कुटुंबातील मूल्ये आणि जबाबदाऱ्या, तसेच स्वतःची ओळख आणि आत्मनिर्भरता यावर सखोल चर्चा झाली.

समाजाच्या चौकटींमध्ये राहून स्वतःसाठी वेळ काढणे, आपली मानसिकता विकसित करणे आणि नवीन पिढीला योग्य मार्गदर्शन देणे किती महत्त्वाचे आहे, हे यातून अधोरेखित केले. तुमच्या जीवनाचा केंद्रबिंदू फक्त इतरांसाठी नव्हे, तर स्वतःसाठीही असला पाहिजे! संदेशाने नव्या ऊर्जा आणि आत्मविश्वासाने भारीत महिलांना चित्रपट संगीतात रंगून आनंददायी वातावरणात उत्साही केले गेले. यानंतर अर्हम विज्या फाउंडेशनचे सर्वेसर्वा उपाध्याय प्रवीणऋषीजी महाराजांच्या दिव्य आवाजातील ध्वनिफीतद्वारे सर्व महिलांना स्वनिरीक्षणाच्या प्रक्रियेत मंत्रमुग्ध केले ज्यामध्ये उपाध्यायजीनी जीवनातील सर्व टप्प्यांना, घडामोडींना, सर्व बदलांना व स्वतःला आहे तसं स्वीकारण्याची प्रक्रिया करून भावविभोर केले. या भावनेला पुष्ट करण्यासाठी अर्हम पुरुषाकार मेडिटेशन ट्रेनर अनिता मुनोत यांनी अर्हम धून करवली त्यानंतर लगेचच अर्हम पुरुषाकार मेडिटेशन ट्रेनर व अहिल्यानगर सेंटर प्रमुख प्रिया बोरा यांनी ध्यानाचे महत्त्व महिलांना पटवून देत सांगितले की ध्यान म्हणजे मनाची विचारहीन अवस्था आहे जिथे गहन शांतीशिवाय दुसरे काहीही नाही. अर्हम पुरुषाकार मेडिटेशन मध्ये विनाशर्त अतिशय सहजतेने स्वध्यानात पोहोचवले जाते. आजच्या टेक्निकल व डिजिटल युगात साधनांची रेलचेल झाली पण व्यक्ती मानसिक व भावनिक रित्या खचत चाललेला आहे व या चुकीच्या भावनांमुळे शरीरात हार्मोन्स असंतुलित होतात व या असंतुलनाचे परिणाम वेगवेगळ्या आजारात होतात. नेमके याच तत्वावर अर्हम पुरुषाकार मेडिटेशन कार्य करते. यातील रंगमंत्र आकृती या थेरपींच्याद्वारे शरीरातील पंचतत्व आधारित वात-पित्त-कफ संतुलन करण्याबरोबर शारीरिक मानसिक व भावनिक संतुलनाला सुरुवात होते, याचा परिणाम व्यक्तीच्या स्वास्थ्य सुधाराबरोबर पारिवारिक-सामाजिक नाते व जीवन सुधारते. अशी ही जगातील एकमेव अद्भूत ध्यानपद्धती आहे ज्याचा उपयोग आजपर्यंत हजारो लोकांनी करून आपल्या जीवनात स्वास्थ्य व आनंदाचे स्त्रोत खुले केले आहेत .

सर्वात शेवटी बीज रूपातच संस्कार घडविणारी अर्हम गर्भसंस्कार साधनेच्या ट्रेनर डॉक्टर सौ. प्रीती फिरोदिया यांनी या संस्कारांचे महत्त्व पटवीत आलेल्या स्त्री वर्गाला सांगितले की अर्हम गर्भ संस्कार साधना मातृत्वाच्या असीम सामर्थ्याला साकार रूप देणारी शास्त्रोक्त पद्धत आहे अर्हम गर्भसंस्कार साधना संस्थेतर्फे माता पितां होण्यासाठी इच्छुक असणाऱ्या दांपत्यांना गर्भस्थ शिशूच्या आगमनापूर्वी शारीरिक व मानसिक दृष्टीने सुदृढ बनवून एका दिव्य संतती चे स्वागत ते संपूर्ण संगोपन, संरक्षण व सुखरूप प्रसूती व प्रसूती नंतर दोन वर्षांपर्यंत चे प्रभावी पालन पोषण यांचे मार्गदर्शन उपाध्याय प्रवर प्रवीणऋषी यांच्या मार्गदर्शना खाली दिले जाते. जैन आगम मधून घेतलेली ही पद्धत सर्व जाती, धर्म, देश यांच्या सीमा ओलांडून जगभर आजमावली जात आहे. प्रसूती दरम्यान येणाऱ्या अनेक समस्या जसे इझ, शुगर, thyroid, माने भोवती नाळेचे वेढे असणे, रक्तक्षिनता, या बरोबर Down 's syndrome, किडनी तयार न होणे, retina तयार न होणे अश्या अनेक वैद्यकीय दृष्टीने अशक्य अशा केसेस वर ही या साधनेद्वारे सुखरुप व सुदृढ बालकांना माता जन्म देऊ शकतात. अहिल्यानगरमध्ये २००९ पासून हे प्रशिक्षण देणारे जवळ जवळपास साठ शिक्षक आहेत. आतापर्यंत जवळ जवळ २००० बालके या साधनेच्या सुंदर अनुभूती तून जन्मलेली आहेत. डॉ. फिरोदिया यांनी उपस्थित महिलांना आव्हान केले की जास्तीत जास्त महिलांनी आपल्या संपर्कामध्ये असलेल्या भावी माता पितांना या वर्गाशी जोडावे व भावी संततीचे भविष्य सुरक्षित करावे. अशा अनमोल मार्गदर्शन नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# गृहिणी

## आरोग्य

### मानदुखीवर उपाय

कधीकधी आपण मानेच्या दुखण्यासह सकाळी उठतो. याला चुकीची उशी वापरणे हे एक कारण असू शकते. अशा परिस्थितीत आपण फक्त आपले पाय उचलून जर बोट ओढून आपले पाय एका घड्याळाच्या दिशेने किंवा घड्याळाच्या विरूद्ध दिशेने हलवले तर आराम मिळू शकेल.

## पाककला

### शाही खिचडी

**साहित्य** - ३ वाट्या दिल्ली राईस, दीड वाटी मुगाची डाळ, १ बटाट्याचे मध्यम काप, हिंग, हळद, १ वाटी मटार दाणे, २ कांदे, २ इंच आलं, तूप, १५-२० लसूण पाकळ्या, मिरच्या, दही, थोडे काजू, बदाम, बेदाणे, जिरे, मीठ, गरम मसाला आणि सुक्या मिरच्या.

**कृती** - खिचडी करण्याच्या आधी १ तास अगोदर डाळ व तांदूळ एकत्र करून धुवून ठेवावे. कांदे उभे पातळ चिरावे. पातेल्यात तूप तापवून काजू, बदाम, बेदाणे तळून घ्यावे. त्याच तुपात कांदा तळून घ्यावा. कांदा लालसर कुरकुरीत तळावा. आलं-लसणाची पेस्ट करावी. पातेल्यात तूप तापवून हिंग, जिरे, हळद, सुक्या मिरच्या आणि आलं-लसूण पेस्ट घालून हे सर्व जिन्नस परतावे. त्यात डाळ, तांदूळ, बटाटे, मटार दाणे टाकावेत. ते चांगले परतून तांदळाच्या दुप्पट पाणी घालावे. चवीनुसार त्यात मीठ, गरम मसाला घालून मंद आचेवर खिचडी शिजू द्यावी. खिचडी वाढताना ती गरमागरमच वाढावी.

## वास्तू

### घरात भांडणे होत असतील उपाय

जर एखाद्या घरात वास्तुदोषांमुळे वारंवार भांडणे होत असतील तर अशा घरात खास करून आजारी माणसाच्या खोलीत त्याच्या बिछान्याजवळ थोडेसे मीठ पाण्यात मिसळून काचेच्या बाऊलमध्ये ठेवावे लाभ होतो.

## सल्ला

पेढे उरल्यास कुस्करून दुधात घालून बासुंदी करावी.

## सौंदर्य

उडीद डाळीची पावडर बनवून त्यात थोडेसे गुलाबपाणी, ग्लिसरीन व बदाम रोगन मिसळून चेहऱ्यावर लावावे. यामुळे चेहरा उजळतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २५ मार्च २०२५

**पापमोचनी (स्मार्त) एकादशी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, श्रवण २७|५०, सूर्योदय ०६ वा. ३५ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे. बाहेरचे जेवण शक्यतो टाळावे.

**वृषभ** : योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील.

**मिथुन** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो.

**कर्क** : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रितीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**सिंह** : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. जुने मित्र व नातेवाईक भेटतील.

**कन्या** : आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या. घरातील वातावरण आनंददायी राहील. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**तूळ** : योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा.

**वृश्चिक** : आपल्याला कार्यालयामध्ये अथवा घरामध्ये आज थोडा मनस्ताप होण्याचा योग आहे. वाहने जपून चालवावीत.

**धनु** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. बाहेरचे पदार्थ, हॉटेलिंग वगैरे जपून करा. मागील उधारी वसुल होईल.

**मकर** : मागील काही दिवसांपासून जे आपण नियोजन केलेले आहे ते आज फळास येईल. उपकरणे जपून वापरा.

**कुंभ** : बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागतील. कुटुंबियांचा सहवास लाभेल.

**मीन** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### बॉयफ्रेंड


बंता : चुकी झाल्यावर माफी मागणाऱ्या माणसाला काय म्हणतात?
संता : समजदार
बंता : फारच सुंदर आणि चुक नसताना माफी मागणाऱ्याला काय म्हणतात?
संता : बॉयफ्रेंड

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* टाईम पर्सन ऑफ द इयर २०२१ ने कोणास सन्मानित करण्यात आले? - एलन मस्क

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१४० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१३९ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) शेवट; अखेर; अस्त २) भक्त किंवा सेवक यांचा समूह ३) लोकांची मोजणी; शिरगणती; जनगणना ४) एक प्रकारचे गवत ५) मदत करणारा ८) पलीकडची बाजू; पैलतीर ९) एक प्राणी; बोकड; बकरा ११) कौटुंबिक १२) चिंता; काळजी १४) भास्कर; रवि; सूर्य १५) वेशीवरचा पहारेकरी १७) विद्युत; दामिनी; बिजली १९) कमरेपासून मानेपर्यंतचा शरीराचा मागचा भाग २१) सोबती; मित्र

**उभे शब्द :-** १) अंगात घालावयाचे वस्त्र; सदरा; शर्ट वगैरे ४) अभियान ६) पिकात वाढणारे अनावश्यक गवत ७) भारताला लागून असलेला उत्तरेकडील एक देश ९) देवांचे शत्रू; राक्षस; दानव १०) सर्पाने टाकलेली त्वचा ११) पुरुषाचे एक वस्त्र; विजार; तुमान १३) पद्धत; चाल; रिवाज १६) योग्य; रास्त १८) पूर्वेकडील एक प्रगत देश २०) सत्त्व; परीक्षा; चाचणी २२) मेहनत; श्रम २३) सूत कातण्याचे चक्र

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जे हृदयात सतत सलत राहते, खटकत राहते त्याचे नाव पाप.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मांसाहारी लोकांपेक्षा शाकाहारी लोकांचे जीवनमान जास्त असते का?

शाकाहार आणि मांसाहार या दोन्ही सर्वमान्य आहारपद्धती असुनही त्यांत द्वंद सतत चालू असते उदा. दोघांत काय चांगलं, दीर्घ आयुर्मान कोणामुळे लाभतं, काय खाऊन सुदृढ शरीर बनते, शाकाहारी माणसे मांसाहारी माणसांपेक्षा कमी हिंस्त्र का असतात असे बालिश तर्क आणि वितर्क सतत सुरूच राहतात. मानववंश शास्त्रज्ञ मानतात की आदीमानवाने राहणे सुरू केलं झाडावरून. त्यामुळे त्याचा मूळ आहार वनस्पती आहेत यात तिळमात्र शंका नाही. पण मग जर शाकाहाराने मानवाचे पोट भरत होते तर मानवाने मांसाहार का सुरू केला? केवळ मजा किंवा कुतूहल म्हणून? शाकाहाराचा कंटाळा आला होता म्हणून? का आणखीन काही? ही कारणे शोधताना खूप आश्चर्यचकीत करणारा शोध समोर आला. मनुष्य मांसाहारी झाला कारण निसर्गाने त्याचा नाईलाज करून ठेवला होता म्हणून!

पुरातन इतिहासात बरेच प्रागेतीहासिक मानवी अवशेष सापडतात ज्यात जुना आदिम मानव बऱ्याच प्रमाणात शाकाहार करताना दिसतो. पण अचानक पंचवीस लाख वर्षांपूर्वी पृथ्वीवर वातावरणीय बदलाव झाले ज्यात वनस्पतींची वाढ सर्वत्र खुंटली आणि शाकाहार उपलब्ध नसल्याने मानव झाडावरून खाली उतरला आणि जमिनीवर भक्ष्य शोधू लागला. मानवाने प्राण्यांची शिकार आणि मांस भक्षण सुरू केले. आता याचे असे दूरगामी परिणाम झाले की प्राण्यांची शिकार करण्यासाठी मदत म्हणून मनुष्याने भाले, बाण, चाकू असे शस्त्र दगडांपासून बनवायला सुरुवात केली त्यात पुन्हा केवळ शाकाहार जर आरोग्यसंपन्न मनाला तर अगदी काटेकोर शाकाहार पाळणाऱ्या आर्थिकदृष्ट्या संपन्न (गुजरात, मारवाड प्रांतीय) वैश्य समाजात मधुमेह, लठ्ठपणा, हृदयविकार का सापडले असते आणि तेच साप, वटवाघूळ, मांजरी, कुत्री आणि सर्व प्रकारचे प्राणी खाऊनही सायनो पेनींसुला (चीन, तैवान, कोरिया, जपान) मध्ये कोरोना, बर्ड फ्ल्यू, सार्स सारख्या आजारांवर पुरून उरून सर्वात जास्त दीर्घायुषी लोकं का सापडावीत?


एक आजोबा दारू पीत, मासे, मटण, चिकन, भाज्या सगळं खाऊन ९४ वर्षे जगले आणि एक आजी आज ८० वर्षांची आहे स्वतःचे आणि त्यांचे ८८ वर्षीय आजोबांचे जेवण बनवते चिकन, मासे, भाज्या, भात करते. कधीकधी स्वतःच गोड गुळ तुपाची पान भाकर, खीर, शिरा आवडेल अशी करून खात असते. हे शाकाहार मांसाहाराचे दीर्घायुष्यचे द्वंद्व त्यांच्या पर्यंत कधी पोचलेच नाही. त्यामुळे दीर्घायुष्याबाबत शाकाहार आणि मांसाहार यांची तुलना करणे तर्कसंगत ठरणार नाही.

### उंदीर-मांजराचे युद्ध

एके ठिकाणी उंदीर आणि मांजरात तुंबळ युद्ध सुरु होते. गेले कित्येक दिवस रणकंदन चालले होते. या युद्धात प्रत्येक वेळी उंदरांचा पराभव होत होता. उंदरांचे अनेक खंदे योद्धे लढाईत वीरमरण पत्करीत होते. होता-होता अनेक योद्धे शहीद झाल्याने उंदरांचे सैन्य कमी होऊ लागले. तेव्हा याचा विचार करण्यासाठी उंदरांनी एक बैठक भरविली. युद्धात आपलाच पराभव सारखा का होत आहे, यावर विचार करता असे दिसून आले की, आपला सेनापती कोण, हेच उंदरांना न समजल्याने लढताना त्यांचा गोंधळ उडतो. तेव्हा चर्चेअंती असे ठरले की, जे सेनापती आहेत, त्यांनी आपल्या डोक्यावर गवताची मोळी बांधावी, म्हणजे इतर उंदरांना ते ओळखू येतील.

अशा प्रकारे डोक्यावर गवताची मोळी बांधून सेनापती व इतर उंदीर लढाईत उतरले. पुन्हा घनघोर लढाईला तोंड फुटले. उंदरा-मांजरात जोराची जुंपली. मांजरांची सेना उंदीर सेनेवर तुटून पडली. अखेर पुन्हा उंदरांचा पराभव झालाच. पराभव होताच उंदीरसेना सैरावैरा पळत आपापल्या बिळात लपून बसली. मांजरांनी त्यांचा पाठलाग केला. पण सेनापतींनी आपल्या डोक्यांवर गवताची मोळी बांधली असल्याने त्यांना लवकर बिळात शिरता न आल्याने पाठलागावरील मांजरांनी त्यांना गाठले आणि झडप घालून त्यांना खाऊन टाकले.

**तात्पर्य** : मोठेपणा प्राप्त झाला, तर कर्तव्ये आणि जबाबदारीही वाढते.



## रहमते दर्शन (भाग - १)

पैसे की कमी थी। मैंने बाहर से १२०० रु. उधार माँगे । जब शादी का कार्य सम्पन्न हो गया तो सब ख़र्चा निकालने के पश्चात मेरे पास अभी भी १२०० रु. बचे थे यानी महाराज जी ने बग़ैर किसी ख़र्चे के मेरी लड़की की शादी करा दी।

मेरे एक दोस्त की बेटी की शादी थी। वे भी ग़रीब आदमी थे। कहने लगे, महाराज जी की दया से तुम्हारी बेटी की शादी बिना ख़र्चे के हो गई। महाराज जी से प्रार्थना करो कि मेरी बेटी की शादी भी हो जाये। उन्होंने बाहर से ३००० रु. लिए। शादी ठीक-ठाक हो गई। जब पैसे वापिस करने गये तो जिनसे रुपये लिए थे वे बोले, मैं एक बार लेकर दोबारा से पैसे नहीं लेता। अभी तो तुम पैसे वापिस कर गये थे। इस प्रकार उसने भी महाराज जी की महिमा अपनी आँखों से देखी। वह इतना प्रभावित हुआ कि घर जाकर सत्संग करवाया और भंडारा किया।

### वे एक सच्चे मित्र थे

एक बार मैं साइकिल पर कहीं जा हरा था कि मेरी एक मोटर- साइकिल से टक्कर हो गई। मेरी साइकिल पूरी तरह से टूट कर चूरा-चूरा हो गई। मोटर साइकिल वाले का हाथ टूट गया और जूतों में ख़ून भर गया परन्तु महाराज दर्शनसिंह जी की अपार दया से मुझे सिर्फ एक नाख़ून पर मामूली सी चोट आई।

एक बार नामदान के पश्चात मेरे मित्र की पत्नी ने दिल्ली में त्रिलोकपुरी स्थित अपने चाचा के यहाँ जाने की इच्छा प्रकट की । जहाँ जाना था वह जगह सिर्फ उसकी पत्नी ने ही देख रखी थी। बस आई और उसकी पत्नी बस में आगे से चढ़ गई। वह पीछे कंडक्टर से पूछता ही रह गया कि गाड़ी बस अड्डे जायेगी अथवा नहीं। इतनी देर में बस चल पड़ी। वह दूसरी बस से गया। अपनी पत्नी की तलाश की, मगर वह नहीं मिली। वह वापिस कृपाल आश्रम में आ गया।

महाराज दर्शनसिंह जी के दरबार में पेश हुआ और ज़ोर से चिल्ला-चिल्ला कर कहने लगा, महाराज जी मेरी बहू खो गई है, दया करो। महाराज जी ने बड़े प्यार से उसे बुलाया और सांत्वना देते हुए कहा, उसे जहाँ पहुँचना था, वहीं पहुँच गई है। उसने कहा, महाराज जी, मैं तो उसका (उसके चाचा जी का) घर भी नहीं जानता। महाराज जी ने अपने ड्राइवर को बुलाकर कहा, गाड़ी निकालो और इन्हें इनके गन्तव्य स्थान पर पहुँचा दो । हम सब गाड़ी में बैठ गये। ड्राइवर ने हमें एक दम उस मकान के गेट पर पहुँचा कर गाड़ी रोक दी। वहाँ पहुँचने पर महाराज जी की गाड़ी को देखकर सब खुश हो गये और पूछने लगे कि यहाँ कैसे पहुँचे, तो बताया कि महाराज जी ने ही हमें भेजा है। हमारे यह पूछने पर कि वह (मित्र की पत्नी) वहाँ तक कैसे पहुँची, उसने बताया कि वो घंटा घर पर उतर कर रोने लगी तो एक बुढ़िया आई और पूछताछ करके उसक साथ दो लडके भेजो जो उसे वहाँ तक छोड गये।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

जन्म के बाद बच्चों को मां बाप से थपकियों के रूप में स्पर्श मिलता रहता है जिस से उनका शारीरिक और मानसिक विकास होता है। जिन बच्चों को मां बाप से थपकिया नहीं मिलती हैं उन का विकास अधूरा होता है। हाथ मिलाना, गले लगाना, माथे पर चूम लेना यह सब थपकिया हैं। प्यार से हैलो कहना, शाबास कहना, हल्की मुस्कान के साथ कुछ शब्द कहना, प्रशंसा करना, आगे बढ़ने के लिये प्रेरित करना यह भी थपकी ही माना जाएगा। बड़े होने पर हम कोई न कोई काम करते हैं, वकील, डाक्टर, इंजिनियर बनते हैं, संत बनते हैं, लोगों का सहयोग करते हैं ताकि हमारे को लोगों से सम्मान रूपी थपकी मिलती रहे। थपकी की इच्छा घर, परिवार, दफ्तर, कारखाने, क्लब, पार्टी तथा संस्थानो में सभी जगह रहती है। बड़ा होने पर जिनकी मानसिक स्थिति बच्चों जैसी है उन्हे जब कोई थपकी नहीं देता तो वह खुद दूसरों से पूछते रहते हैं मेरा सूट कैसा है, मेरे जूते कैसे हैं, मेरे बाल कैसे हैं, मेरा गीत कैसा था, मेरा मकान कैसा है।

### धर्म गलानी

वह अपने हर कार्य के प्रति लोगों से अच्छे शब्द सुनना चाहते हैं जो कि थपकी का कार्य करते हैं। वयस्क मानसिक स्थिति वाले व्यक्ति थपकी मिलने पर उसे खुशी-खुशी स्वीकार करते हैं। वयस्क व्यक्ति ईमानदारी से, लगन से, मेहनत से अपने कार्य में लगा रहता है ताकि उसे सब से प्रशंसा और सहयोग रूपी थपकी मिलती रहे। अच्छा भोजन बनाने पर माता का तत्काल धन्यवाद करना चाहिए, बच्चे ने क्लास टाप किया है तो उसे तुरंत शाबास मिलनी चाहिए, यदि किसी ने दफ्तर में अच्छा कार्य किया है तो अधिकारी को तुरंत कहना चाहिए हमें आप पर गर्व है। यह सब प्रभावशाली थपकिया सिद्ध होगी। भूखे को तत्काल भोजन मिले तो उसे तृप्ति होगी। जब थपकी की जरूरत हो तो उसे तुरंत थपकी मिले तो वह बहुत प्रभावशाली होती है। जिन कार्यों से हमें बचपन में थपकी मिलती थी हम प्राय वैसी ही थपकी की इच्छा रखते हैं। थपकी लेने के लिये नजदीक के लोगों, मां बाप, पति पत्नी, बास की रुचियों के अनुसार हमें कार्य करना पड़ता है। थपकी और चापलूसी में फर्क होता है। थपकी तब मिलती है जब हमारे कार्य और व्यवहार दूसरों को पसंद होता है। चापलूसी दूसरे को रिझाने के लिये करते हैं। वह अच्छा करे चाहे बुरा करे चापलूस उसकी हर बात में महिमा के गीत गाते रहते हैं। जो लोग कम बुद्धिवान हैं, अपने काम में एक्सपर्ट नहीं होते, वह चापलूसी पसंद करते हैं।

थपकी जितनी सूक्ष्म हो, जिस में शब्दों का प्रयोग कम से कम हो तथा हाव-भाव से प्रदर्शित हो तो वह अपना गहरा प्रभाव छोड़ती है। आज के युग में सभी थपकी के प्यासे हैं। इसलिए अपने आप को मन में सब से बड़ा समझो। जो भी व्यक्ति आप के प्रत्यक्ष सम्पर्क में

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

चार महिने I.U.I. उपचारपद्धती केल्यानंतर अखेर तिला गर्भधारणा झाली.

**रुग्णानुभव ११ :** सोनालीचा आत्तापर्यंत तीन ते चार वेळा गर्भपात झाला होता. वारंवार गर्भपात होतो म्हणून उपचार घेण्यासाठी आली. तिच्या रक्ताच्या तपासण्या केल्यावर त्यातील टॉर्च टेस्टचा रिपोर्ट पॉझिटीव्ह आला. टॉर्च इन्फेक्शन कमी होईपर्यंत सहा महिने गर्भधारणा होऊ देऊ नका, असे त्यांना सांगितले. परंतु सांगूनही ती वेळेच्या आतच गर्भवती झाली. आता पुन्हा हिचा गर्भपात होऊ शकतो याची घरच्यांना कल्पना दिली व गर्भपात होऊ नये म्हणून सर्व उपचार सुरू केले. सर्व प्रकारे रुग्णाची काळजी घेतली. तरी सहाव्या महिन्यामध्ये वरमुठ (mniotic Fluid) अचानक फुटन अंगावरचे पाणी गेले. सोनोग्राफीवरून बाळाचे वजन ६०० ग्रॅम असल्याचे समजले. सर्व डॉक्टरांनी तिचे ॲबॉर्शन करण्याचा सल्ला नातेवाइकांना दिला. परंतु ते गर्भपात करून घेण्यास तयार नव्हते. शेवटी त्यांना पुणे येथे मोठ्या हॉस्पिटलमध्ये जाण्याचा सल्ला दिला. ते लगेच पुण्याला गेले. परंतु तेथील डॉक्टरांनीसुद्धा 'बाळ एकदम कोरडे आहे. अशा अवस्थेमध्ये बाळ जगू शकणार नाही, म्हणून तुम्ही गर्भपात करून घ्या' हाच सल्ला दिला. ते ऐकून ते परत आमच्याकडे उपचार घेण्यास आले. मॅडम, काहीही करा, परंतु आमचे हे बाळ वाचवा'' असे ते सारखे म्हणत होते. मलाही बाळ वाचेल याबद्दल अजिबातच खात्री नव्हती. तशी त्यांना कल्पना देऊन तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करून घेतले व उपचार सरू केले. आहारामध्ये नारळाचे पाणी. गहरोप रस आयुर्वेदिक मासानुमासिक औषधे, मोड आलेली कडधान्ये, पालेभाज्या सुरू केल्या. मंत्रोपचाराम धील सर्व मंत्र दिवसातून एकदा म्हणण्यास सांगितले. ओम्कार गुंजन, ध्यान, दीर्घ श्वसन करावयास सांगून तिचे मन आनंदी व सकारात्मक विचारसणीत ठेवण्याचा प्रयत्न केला. दर पंधरा दिवसांनी आम्ही तिची सोनोग्राफी करून घेत होतो. बाळाची वाढ चांगली होत होती.

### गर्भवतींसाठी आरोग्यवर्धक पाककृती

३) प्रवाळ, कपर्दिक, शंखभस्म हे दूधातून घ्यावे. शतावरीकल्प दूधातून घ्यावे.

४) व्हिटॅमिन ई मिळण्यासाठी गव्हांकूर रस आठ वडाभर रोज १ ग्लास घ्यावा.

६) सर्दी, खोकला, घसा दुखणे : सर्दी, खोकला, ताप, घसा दुखत असेल, तर खालील पद्धतीने आयुर्वेदिक चहा करून घ्यावा.

१) २ कप पाण्यात सात ते आठ तुळशीची पाने, ७-८ गवतीचहाचे कापलेले तुकडे, १ इंच आल्याचा तुकडा व थोडा गूळ घालून १ कप होईपर्यंत आटवावे व गाळून गरम गरम प्यावे.

२) मधातून सीतोपलादी चूर्णाचे चाटण करावे.

३) अडुळशाचा काढा प्यावा. एवढे करूनही बरे न वाटल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार करावा.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

[redacted]

# अर्थजगत



# ‘ट्रम्प टेरिफ’चा फटका कोणाला?

शेअर बाजारात सध्या मंदीचे वातावरण आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढील महिन्यात २ एप्रिलपासून भारतासह जगातील अनेक देशांवर परस्पर कर ('रेसिप्रोकल टॅरिफ') लागू करण्याची घोषणा केली आहे. बाजारातील तज्ज्ञ हे समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत की असे झाल्यास कोणत्या भारतीय कंपन्यांचे नुकसान होईल आणि कोणत्या शेअर्सना त्याचा फायदा होऊ शकतो? जागतिक रेटिंग एजन्सी मूडीजने याबाबत सविस्तर अहवाल सादर केला आहे. मूडीजच्या अहवालानुसार, ऑटो, स्टील, केमिकल आणि आयटी क्षेत्रांना ट्रम्प यांच्या टॅरिफचा सर्वाधिक फटका बसू शकतो. विशेषतः भारतीय ऑटोमोबाईल कंपन्यांसाठी ही वाईट बातमी असू शकते.

टाटा मोटर्स आणि संवर्धन मदरसन यांसारख्या कंपन्यांसाठी ही चिंतेची बाब आहे. मूडीजचे म्हणणे आहे की २ एप्रिलपासून लागू होणाऱ्या परस्पर शुल्काचा या कंपन्यांच्या नफ्यावर परिणाम होऊ शकतो. भारताच्या एकूण वाहन निर्यातीपैकी ३% यूएसला जाते आणि ऑटो पार्ट सप्लायर्सना देखील या शुल्काचा फटका बसेल.

**टाटा मोटर्सवर परिणाम**

टाटा मोटर्सची उपकंपनी जॅग्वर लँडरोव्हरला या दराचा मोठा फटका बसू शकतो. यूएसमध्ये विकल्या जाणाऱ्या सर्व जग्वार लँड रोव्हर कार युरोपियन युनियन किंवा ब्रिटनमध्ये बनवल्या जातात आणि त्यांच्यावरील वाढीव शुल्कामुळे कंपनीला किंमती वाढवणे कठीण होऊ शकते. यामुळे अमेरिकेतील जग्वार लँड रोव्हर कारची मागणी कमी होऊ शकते, जी टाटा मोटर्ससाठी धक्कादायक असेल. तथापि, जागतिक ब्रोकरेज फर्म वद्दइउ ने दरम्यानच्या काळात टाटा मोटर्सच्या स्टॉकचे रेटिंग होल्ड वरून खरेदी पर्यंत वाढवले आणि सध्याच्या पातळीपासून २९ टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे.

**समवर्धन मदरसनवर परिणाम ह्र**

दुसरीकडे, समवर्धन मदरसनच्या कमाईपैकी २०% कमाई उत्तर अमेरिकेतून येते, ज्यामध्ये मेक्सिकोमधील कमाई देखील समाविष्ट आहे. मूडीजचे म्हणणे आहे की, ट्रम्प यांच्या टॅरिफनंतर कंपनी वाढीव खर्च ग्राहकांवर टाकण्याचा प्रयत्न करेल, परंतु यामध्ये तिला कितपत यश मिळते हे पाहणे महत्वाचे असेल.

कोणत्या कंपन्यांना फायदा होईल?

आता प्रश्न असाही निर्माण होतो की या नवीन दराचा लाभ कोणत्या कंपन्यांना मिळू शकतो? मूडीजचे म्हणणे आहे की ट्रम्पच्या शुल्कामुळे भारतीय आयटी कंपन्यांचे, विशेषतः टीसीएस आणि इन्फोसिसचे कमीत कमी नुकसान होण्याची अपेक्षा आहे.

मूडीजने सांगितले की, ट्रम्प यांच्या टॅरिफचा आयटी कंपन्यांवर थेट परिणाम होणार नाही. पण अमेरिकेचे कठोर इमिग्रेशन धोरण आणि क्ष्इ व्हिसाच्या नियमांमधील बदल त्यांच्यासाठी नक्कीच आव्हान निर्माण करू शकतात. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी, आयटी कंपन्यांनी आधीच यूएसमध्ये ऑनसाइट नोकऱ्या वाढवून त्यांचे धोके काही प्रमाणात कमी करण्याचे धोरण स्वीकारले आहे. ढउड आणि खपर्षीू चा नफा उद्योगातील सर्वात मजबूत मानला जातो, ज्यामुळे त्यांना त्यांच्या वाढलेल्या खर्चाचे व्यवस्थापन सहज करता येते. दरम्यान, जर आपण मूल्यांकनाबद्दल बोललो तर, इन्फोसिस सध्या आयटी कंपन्यांमध्ये सर्वात आकर्षक किमतीवर व्यवहार करत आहे. त्याचे एक वर्षाचे फॉरवर्ड पीई गुणोत्तर सध्या टीसीएस आणि एचसीएल तंत्रज्ञानापेक्षा कमी आहे. खपर्षीू चे शेअर्स या वर्षात आतापर्यंत १६.२ टक्क्यांनी घसरले आहेत, तर ढउड आणि कउङ ढशलह मध्ये देखील १५% ते २०% ची घसरण झाली आहे.

भारतात इलेक्ट्रिक वाहनांची निर्मिती वेगाने वाढत आहे. या अगोदर इलेक्ट्रिक वाहनांची निर्मिती कमी प्रमाणात होत होती. आता वाहनांची संख्या वाढत असल्यामुळे कंपन्यांचा उत्पादन खर्च कमी होत आहे. अशा परिस्थितीत पुढील सहा महिन्यात देशात इलेक्ट्रिक कारचे आणि पेट्रोल कारचे दर समान होतील, असा दावा केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केला आहे. नवी दिल्लीत ३२ व्या कनवर्जन्स इंडिया एक्सपो, स्मार्ट मोबईलीटी इंडिया एक्सपो आणि १०व्या स्मार्ट सिटी इंडिया कार्यक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते.

# पेट्रोल कारच्या किमतीत इलेक्ट्रिक कार




सध्या इलेक्ट्रिक कारच्या किमती पेट्रोल कारपेक्षा जास्त आहेत. या कमी व्हाव्यात यासाठी केंद्र सरकार प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या अनुदान देत आहे. आता अनुदान देण्याचे प्रमाणही कमी होत असून लवकरच या कंपन्या अनुदानाशिवाय उत्पादन करतील असे या कंपन्यांनी सांगितले आहे. देशातील इलेक्ट्रिक वाहन कंपन्यांनी व या कंपन्यांना सुटे भाग पुरविणार्या कंपन्यांनी महाग आयातीऐवजी देशातच सुटे भाग कमी किमतीत तयार करावे अशी सरकारची इच्छा आहे. यासाठी संशोधन आणि विकासाला सरकार चालना देत आहे. त्यामुळे वाहतुकीचा खर्च कमी होण्याबरोबरच उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल.

रस्ते जागतिक दर्जाचे झाल्यानंतर त्यामुळे वाहतुकीचा खर्च कमी होऊन अर्थव्यवस्थेला आणि नागरिकांना मदत होते. जर भारताला विकसित व्हॉयचे असेल तर भारतातील रस्त्याचा दर्जा वाढविण्याची गरज आहे. त्या दृष्टिकोनातून सरकारचे प्रयत्न चालू आहेत. त्याचबरोबर हरित ऊर्जा जास्तीत जास्त निर्माण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

**हरित ऊर्जा निर्मितीचा वाटा ४२ टक्के**

देशात सध्या एकंदर वीजनिर्मितीच्या क्षेत्रात हरित ऊर्जा निर्मितीचा वाटा ४२ टक्के इतका आहे. केंद्र सरकार पर्यायी इंधन आणि जैव इंधन निर्मितीला प्रोत्साहन देत आहे. भविष्यात देशातील काही शहरांमधील प्रवासाचा वेळ अगदी कमी करण्याच्या दृष्टीने अनेक नवीन रस्ते प्रकल्प सुरू होत असून, त्याद्वारे दिल्ली, डेहराडून, दिल्ली, जयपूर तसच चेन्नई, बंगळुरु या शहरांमधील अंतर केवळ २ तासात पार करता येईल. दिल्ली आणि मुंबई दरम्यानचा प्रवास केवळ १२ तासात करता येईल, असंही गडकरी यांनी यावेळी सांगितले.

# विंडफॉल टॅक्सला कायमचा ब्रेक!




संसदेने नुकतेच तेल खाणी नियमन व विकास विधेयक मंजूर केले आहे. यामुळे या क्षेत्रात गुंतवणूकदारासाठी स्थिर धोरण राहणार आहे. अशा अवस्थेत येथून पुढे केंद्र सरकार विंडफॉल टॅक्स लावू शकणार नाही. ही माहिती केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दिली. ते म्हणाले की, नवा कायदा तेल उत्खनन क्षेत्रासंदर्भात दीर्घ पल्ल्याचे धोरण असावे यासाठी निर्माण करण्यात आला आहे. भारताला विकसित व्हायचे असेल तर ऊर्जा सुरक्षितता आवश्यक आहे. त्यामुळे या क्षेत्रात संशोधन, विकास, उत्खनन होणे गरजेचे आहे. यासाठी गुंतवणुकीकरिता पोषक परिस्थिती निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून हा कायदा तयार करण्यात आला आहे.

या अगोदर रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर जागतिक खनिज तेल बाजारात बरीच अस्थिरता निर्माण झाली होती. जागतिक पातळीवर खनिज तेलाचे दर वाढले होते. तर देशात खनिज तेल निर्माण करणार्या कंपन्यांना जास्त नफा होत होता. या नफ्यावर कर करण्यासाठी केंद्र सरकारने एक जुलै २०२२ रोजी विंडफॉल टॅक्स लावला होता. त्यावेळी पेट्रोल निर्यातीवर प्रति लिटर सहा रुपये आणि विमान इंधन निर्यातीवर प्रति लिटर १३ रुपये आयात निर्यात शुल्क लावण्यात आले होते.

देशांतर्गत क्रूड उत्पादनावर प्रति बॅरल २३,२५० रुपयाचे विंडफॉल टॅक्स लावण्यात आला होता. त्यानंतर प्रत्येक पंधरा दिवसाला जागतिक पातळीवर तेलाच्या किमती पाहून या दरात बदल केला जात होता. ३० महिने हा कर आकारल्यानंतर जागतिक बाजारातील आणि देशातील खनिज तेलाचे दर समान झाले. त्यानंतर डिसेंबर महिन्यात टॅक्स ही पद्धत रद्द करण्यात आली होती. देशातील आणि परदेशातील पेट्रोलियम कंपन्यांबरोबर चर्चा करून नवीन कायदा तयार करण्यात आला आहे. भारताला आगामी काळात ऊर्जा सुरक्षितता निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खनिज तेलाची आवश्यकता आहे. देशातच खनिज तेलाची जास्तीत जास्त प्रमाणात उत्पादन व्हावे यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. या नव्या कायद्यामुळे परदेशातील कंपन्या भारतामध्ये या क्षेत्रात गुंतवणूक करून खनिज तेलाचे उत्खनन आणि तेल शुद्धीकरण करण्यासाठी पुढाकार घेतील अशी अपेक्षा आहे.

# दागिने निर्यातीला फटका

व्यापार युद्धामुळे फेब्रुवारी महिन्यात भारताची दागिने निर्यात २३ टक्क्यांनी कमी होऊन २,४२२ दशलक्ष डॉलर म्हणजे २१,०८५ कोटी रुपये इतकी झाली आहे. मंदी आणि व्यापार युद्धामुळे चीन, अमेरिका इत्यादी देशातून मागणी कमी झाल्यामुळे दागिने निर्यातीवर परिणाम झाला असल्याचे दागिने निर्यातदार प्रोत्साहन परिषदेने म्हटले आहे.



गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यामध्ये ३,१६६ दशलक्ष डॉलर म्हणजे २६,२६८ कोटी रुपयांची निर्यात झाली होती. एप्रिल ते फेब्रुवारी या कालावधीत दागिने निर्यात १३ टक्क्यांनी कमी होऊन २५,७३२ दशलक्ष डॉलर इतकी झाली आहे. गेल्या वर्षी या कालावधीत २९,७२४ दशलक्ष डॉलरच्या दागिन्यांची निर्यात झाली होती.

हिऱ्याच्या किमतीत १५ टक्क्यांनी घट झाल्यामुळे मूल्यात दागिन्यांची निर्यात कमी झाली असल्याचेही सांगण्यात आले. या परिस्थितीतही दागिने निर्यात वाढावी यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. या संबंधात आमच्या काही मागणी आम्ही सरकारकडे सादर केल्या असल्याचे या संघटनेने म्हटले आहे.



# जमीन व्यवहारांत उसळी

कोरोनानंतर भारतामध्ये रिअल इस्टेट क्षेत्र वेगाने वाढत आहे. अशा परिस्थितीत विकसक जमीन अधिग्रहीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. २०२२ ते २४ या कालावधीत भारतात विकसकांनी ९० हजार कोटी रुपये मोजून ६ हजार एकर जमीन खरेदी केली आहे. ही माहिती जेएलएल इंडिया या संस्थेने जारी केली आहे.

विकासकांनी २०२२ मध्ये १,६०३ एकर जमीन खरेदी केली. यासाठी १८,११२ कोटी रुपये मोजले. २०२३ मध्ये ३२,२०३ कोटी रुपये मोजून १,९४७ एकर जमीन खरेदी केली. २०२४ मध्ये विकसकांनी २,३३५ एकर जमीन ३९,७४२ कोटी रुपयांना विकत घेतली. त्यामध्ये केवळ विकसकांनी केलेल्या थेट व्यवहाराचा समावेश आहे. विकसकांनी जमीन मालकाबरोबर केलेल्या संयुक्त विकास प्रकल्पाचा या आकडेवारीत समावेश नाही.

२०२४ मध्ये जमीन खरेदीच्या व्यवहारात विकसन जास्तच आक्रमक झाल्याचे दिसून येते. विकसकांनी या वर्षात २३ शहरांमध्ये १३४ व्यवहार करून २,३३५ एकर जमीन खरेदी केली. या अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, खरेदी केलेल्या ८१ टक्के जमिनीवर निवासी घरासाठी बांधकाम होणार आहे.

मोठ्या शहरात जास्त व्यवहार

मोठ्या शहरात जमिनीचे जास्त व्यवहार झाले. या शहरांमध्ये बंगळुरू, पुणे, चेन्नई, दिल्ली, एनसीआर, हैदराबाद, कोलकत्ता, मुंबई, पुणे यांचा समावेश आहे. एकूण झालेल्या व्यवहारातील ७२ टक्के व्यवहार या मोठ्या शहरात झाले आहेत. तर छोट्या शहरात एकूण व्यवहारापैकी २८ टक्के व्यवहार झाले असून जमिनीचे क्षेत्रफळ ६६२ एकर आहे. आता छोट्या शहरातील व्यवहार वाढण्याची शक्यता आहे. नागपूर, वाराणसी, इंदूर, वृंदावन, लुधियाना या शहरांमध्ये जमिनीचे जास्त व्यवहार झाले.



# करबचतीची शेवटची संधी

वित्त वर्ष २०२४-२५ संपण्यास आता काहीच दिवस उरले आहेत, आणि नवीन वित्त वर्ष २०२५-२६ सुरु होण्यास केवळ १० दिवस बाकी आहेत. अशा परिस्थितीत, जे लोक जुन्या कर प्रणालीची निवड करत आहेत, त्यांच्यासाठी कर बचतीसाठी ही शेवटची संधी आहे. वित्त मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, वित्त वर्ष २०२३-२४ मध्ये ७२% करदात्यांनी नवीन कर प्रणाली स्वीकारली, आणि भविष्यात ही संख्या आणखी वाढू शकते. तरीही, अनेक करदाते जुन्या कर प्रणालीद्वारे करसवलतीचे फायदे घेणे पसंत करतात. जुन्या कर प्रणालीअंतर्गत करसवलतीचा लाभ घ्यायचा विचार करत असाल, तर ही तुमच्यासाठी शेवटची संधी असू शकते. योग्य गुंतवणुकीद्वारे तुम्ही कर भार कमी करू शकता.

तुम्हाला उत्पन्न कर वाचवायचा असेल, तर कलम ८०सी अंतर्गत विविध गुंतवणूक योजनांमध्ये गुंतवणूक करून ₹१.५ लाखांपर्यंत सूट मिळवता येऊ शकते. राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली आणि ईपीएफ हे निवृत्तीनंतरची गुंतवणूक म्हणून चांगले पर्याय आहेत. जोखीममुक्त गुंतवणुकीसाठी सुकन्या समृद्धी योजना आणि वरिष्ठ नागरिक बचत योजना सर्वोत्तम पर्याय ठरू शकतात.

जर तुम्ही नवीन कर बचतीसाठी गुंतवणूक करण्याचा विचार करत असाल, तर आधी तुमच्या विद्यमान गुंतवणुकींची तपासणी करा. ईपीएफ आणि गृहकर्जाचा हप्ता हे आधीच कर बचतीमध्ये समाविष्ट असतात. त्यामुळे, नवीन गुंतवणूक करण्यापूर्वी तुम्ही आधीच कलम ८० सी अंतर्गत मर्यादा पूर्ण केली आहे का, याची खात्री करा. तुम्ही २०२४ मध्ये नोकरी बदलली असेल, तर फॉर्म १२ बी भरावा लागेल. हा फॉर्म नवीन नियोक्त्याला तुमच्या मागील पगार आणि कर कपातीची माहिती देतो, ज्यामुळे टीडीएस योग्यप्रकारे वजा केला जातो. कलम ८०डी अंतर्गत, करदाते आपल्या पालकांसाठी (६० वर्षे किंवा त्यावरील) केलेल्या वैद्यकीय खर्चावर ₹५०,००० पर्यंत करसवलतीचा दावा करू शकतात. त्यामुळे, जर तुमच्या पालकांकडे आरोग्य विमा नसेल, तर त्यांच्या वैद्यकीय खर्चाचे बिल जतन करा आणि कर सवलतीचा लाभ घ्या.

ईएलएसस ही कर बचत योजना असून, ३ वर्षांचा लॉक-इन कालावधी असतो. परंतु, ही योजना शेअर बाजाराशी निगडीत असल्याने परताव्याची खात्री नसते. त्यामुळे गुंतवणुकीपूर्वी स्वतःच्या आर्थिक उद्दिष्टांचा विचार करावा.

**गुंतवणुकीची अंतिम तारीख** : ३१ मार्चपूर्वी गुंतवणूक पूर्ण करणे आवश्यक आहे. शेवटच्या क्षणी तांत्रिक अडचणी आल्यास कर सवलतीचा लाभ मिळू शकणार नाही. त्यामुळे, वेळेत गुंतवणूक करून कर बचतीचा फायदा घ्या.

# प्रत्यक्ष कर संकलनाची भरारी

दुसऱ्या आणि तिसर्या तिमाहीत विकासदर काही प्रमाणात मंदावला असला तरी आगामी काळ आशादायक असल्याचे वातावरण आहे. आगाऊ कर भरण्यात भरीव वाढ झाल्यामुळे १६ मार्चपर्यंत झालेले प्रत्यक्ष कर संकलन १३ टक्क्यांनी वाढून २१.२६ लाख कोटी रुपये इतके झाले आहे. यावर्षी आगाऊ कर भरण्याच्या चार टप्प्यात सरकारला १०.४४ लाख कोटी रुपये मिळाले आहेत. गेल्या वर्षी ही रक्कम ९.११ लाख कोटी रुपये होती. त्यामध्ये १४.६२ टक्क्यांची वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षासाठी आगाऊ कर भरण्याच्या शेवटच्या टप्प्याची शेवटची तारीख १५ मार्च २०२५ होती.

कंपनी कर वर्गातील आगाऊ कर भरणा १२.५४ टक्क्यांनी वाढून ७.५७ लाख कोटी रुपये झाला आहे. तर बिगर कंपनी वर्गातील आगाऊ कर भरणा २०.४७ टक्क्यांनी वाढून २.८७ लाख कोटी रुपये झाला आहे. ज्या करदात्याची कर देता १०,००० रुपयापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे, अशा व्यक्तींनी आगाऊ कर भरणा करणे अपेक्षित आहे. यामध्ये पगारी व्यक्तीचाही समावेश आहे. आगाऊ कर भरणा म्हणजे ॲडव्हान्स टॅक्स १५ जून, १५ सप्टेंबर, १५ डिसेंबर, आणि १५ मार्चपूर्वी भरणे अपेक्षित असते.




प्रत्यक्ष कर मंडळाने जारी केलेल्या माहितीनुसार वैयक्तिक प्राप्तिकर दात्यांकडून झालेले कर संकलन १७ टक्क्यांनी वाढून ११.०१ लाख कोटी रुपये झाले आहे. मात्र कंपनी कर संकलन केवळ सात टक्क्यांनी वाढून ९.१७ लाख कोटी रुपये झाले आहे. म्हणजे कंपन्यांच्या घसरलेल्या नफ्याचा कर संकलनावर काही प्रमाणात परिणाम झाला आहे.

शेअर बाजार निर्देशांक घसरले असले तरी रोखे विनिमय कराच्या माध्यमातून जमा झालेला कर ५६ टक्क्यांनी वाढून ५३,०९५ कोटी रुपये इतका झाला आहे. या कालावधीत करदात्यांना ४.६८ लाख कोटी रुपयाचा परतावा देण्यात आला. गेल्या वर्षी ही रक्कम ३.४७ लाख कोटी रुपये होती. १६ मार्चपर्यंत ढोबळ प्रत्यक्ष कर संकलन १६ टक्क्यांनी वाढून २५.८६ लाख कोटी रुपये इतके झाले आहे. यावर्षी प्रत्यक्ष कर संकलनातून सरकारला १२.५७ लाख कोटी रुपये अपेक्षित आहेत. अर्थसंकल्पात ११.८७ लाख कोटी रुपयांची अपेक्षा करण्यात आली होती. त्यानंतर परिस्थिती सुधारल्यामुळे यात वाढ करण्यात आली आहे.

# सामाजिक सुरक्षा, धार्मिक सुरक्षा व आर्थिक विकासाबरोबरच शैक्षणिक विकास हे उद्दिष्ट ठेवून 'जैन महामंडळा'ची स्थापना

### ललित गांधी यांचे प्रतिपादन



श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवाशी जैन कॉन्फरन्स (चतुर्थ झोन) यांच्या वतीने ललित गांधी यांचा सत्कार जैन समाज बांधवांच्या वतीने करण्यात आला.

नगर – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने ऑक्टोबर २०२४ मध्ये जैन समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. सामाजिक सुरक्षा, धार्मिक सुरक्षा व आर्थिक विकासाबरोबरच शैक्षणिक विकास हे उद्दिष्ट ठेवून महामंडळ निर्माण केले आहे. महामंडळाने जैन समाजाच्या विकासासाठी फार मोठ्या प्रमाणात निधी निर्माण केला आहे. विहारांमध्ये सुरक्षा मिळावी. जेथे विहाराची सोय नाही तेथे विहार निर्माण व्हावे. महिला बचत गटांसाठी बिनव्याजी कर्ज सुविधा, गृह कर्ज, विधवा महिलांना पेन्शन व्यवस्था, प्राचीन ग्रंथांचे पुनर्लेखन व संरक्षण, समाज भवन निर्माण उपासना स्थानक निर्माण यासाठी मोठ्या प्रमाणात निधी निर्माण झाला आहे. या सर्व योजना जैन समाजापर्यंत पोहोचविणे हे उद्दिष्ट ठेवून ग्रामीण व शहरी भागात योजनांच्या माहिती देण्यासाठी दौरा सुरू आहे. अहिल्यानगर हे मिनी राजस्थान आहे. येथे सुबत्ता असून देखील समन्वयाच्या अभावामुळे महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपेक्षा कमी योजनांचा लाभ येथे मिळत आहे. आत्तापर्यंत महासंगामार्फत दहा वर्षांमध्ये सातशे कोटी रुपये विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळाली आहे. तसेच साडेतीनशे कोटी रुपये परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळाले आहेत. तसेच उद्योग व्यवसायासाठी कर्ज स्वरूपात बाराशे कोटी रुपये देण्यात आले आहेत. स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ असलेले महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.या महामंडळाचा अध्यक्ष म्हणून राज्यमंत्री पदाचा दर्जा दिला असल्याने जैन समाजाचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडविण्यासाठी अधिकार प्राप्त झाला आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या जैन समाजाच्या आर्थिक विकास महामंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा अल्पसंख्यांक राज्य आयोगाचे सदस्य ललित गांधी यांनी केले आहे.

श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवाशी जैन कॉन्फरन्स (चतुर्थ झोन) यांच्या वतीने ललित गांधी यांचा सत्कार जैन समाज बांधवांच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी धर्मगुरू राजाभाऊ कोठारी अध्यक्षतेखाली जैन समाजाची बैठक झाली. यावेळी भाजपाचे तथा नवी दिल्ली येथील ऑल इंडिया जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा, उद्योगपती रमेश फिरोदिया, किशोर मुनोत, अँड नरेश गुगळे, राष्ट्रीय उपाध्यक्ष बाबुशेठ लोढा, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, राजेंद्र बलदोटा, संतोष गाधी, पोपट लोढा, संजय कोठारी, बाळु भंडारी, संतोष गुगळे, रोषन चोरडिया, सुदर्शन डुंगरवाल, पीयूष लुंकड, महेश गुगळे, पवन बोगवत, निखिल नहार, सुवेंद्र गांधी, उमेश बोरा, गणेश झवर, डॉ.आशीष भंडारी, मनिष लोढा, किशोर गांधी, प्रशांत मुथा, प्रशांत गांधी, शिरीष बोरा, सुरज अगरवाल आदी उपस्थित होते.

वसंत लोढा म्हणाले, जैन समाज हा आर्थिक दृष्ट्या सक्षम असला तरी २५% जैन समाज हा दुर्बल घटक आहे. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत आर्थिक विकास महामंडळाचा लाभ मिळाला पाहिजे. यासाठी ललित गांधी यांचे मोठे योगदान आहे. छोटे छोटे उद्योग व्यवसाय, वस्तीगृह निर्माण करणे, वाचनालय उभे करणे, विधवा महिलांना पेन्शन सुविधा, तसेच व्यवसायासाठी बिनव्याजी कर्ज सुविधा यासारख्या संधी सरकारच्या पाठबळामुळे मिळत आहेत. पुढील महिन्यांमध्ये जैन समाजासाठी आर्थिक विकास महामंडळाची माहिती देण्यासाठी जिल्ह्यातील दहा हजार जैन समाज बांधवांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील वेगवेगळ्या संघटना व शहरातील जैन समाज संघटना यासाठी प्रयत्न करणार आहे.

राजाभाऊ कोठारी म्हणाले, भारतातच आर्थिक व्यवसायाचा कणा जैन समाज आहे. अनेक संकटांना तोंड देत जैन समाज देशासाठी योगदान देत आहे. लँड व लव जिहाद चे राक्षस अवतीभवती फिरत आहेत. राज्य व देश पातळीवर आवाज उठवण्याचे कार्य ललित गांधी करीत आहेत. तसेच आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी व योजनांची माहिती देण्यासाठी ते मार्गदर्शन करीत आहेत.

अॅड. नरेश गुगळे म्हणाले, अल्पसंख्यांक समाजाच्या संपत्तीवर मोठ्या प्रमाणावर ताबे मारण्याचे गैर कृत्य होत आहे. काही लोकांकडून जैन समाजाला टार्गेट केले जाते. यासाठी गुजरात राज्यात प्रिवेंशन अॅक्ट तयार केला आहे. तसेच आसाममध्ये काही विशेष कायदे करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातही याप्रमाणे कठोर कायदे तयार करून अल्पसंख्याकांच्या संपत्तीवर ताबे मारणाऱ्यांना कठोर कारवाई करण्यात यावी, असे सांगितले.

सूत्रसंचालन राजेंद्र बलदोटा यांनी केले. संतोष गांधी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी जैन समाजाचे शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.



## जैन महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचे अहिल्यानगरमध्ये स्वागत

जैन अल्पसंख्यांक विकास आर्थिक महामंडळाचे राज्य मंत्र्यांचा दर्जा असलेले अध्यक्ष ललित गांधी अहिल्यानगरमध्ये रेल्वे स्थानकावर स्वागत करण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या जैन प्रकोष्ठचे प्रदेश सचिव आणि मध्य रेल्वे मुबईच्या सल्लागार समितीचे सदस्य सुदर्शन डुंगरवाल त्यांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बडीसाजन ओसवाल युवक संघाचे अध्यक्ष रुपेश पारख, धनेश कोठारी, संदेश मुनोत, राहुल मुथा आदी उपस्थित होते.

# जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घ्यावा

### ललित गांधी यांचे आवाहन

नगर – जैन समाज बांधवांनी जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन जैन अल्पसंख्याक आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांनी राहुरी येथे आयोजित कार्यक्रमात केले.

यावेळी चंदनमल सुराणा, आशिष मुथा, आनंद देसरडा, अभय मुथा, दिनेश बोरा, प्रशांत नहार, हेमंत मुथा, संजय बोगवात, राहुल चुत्तर उपस्थित होते.

ललित गांधी म्हणाले, जैन समाजातील युवकांनी या योजनांची माहिती करून घेत योजनांच्या लाभातून आपला विकास साधावा. जैन आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची विस्तृत माहिती करून घेत त्याची समाजात अधिक प्रमाणात प्रचार, प्रसार करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# अहिल्यानगर महापालिकेतील बेफिकीरीकडे खा. निलेश लंके यांनी वेधले लक्ष

## आयुक्तांशी पत्रव्यवहार जन्म, मृत्यू प्रमाणपत्र विभागातील कर्मचाऱ्यांचा बेफिकीरपणा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या जन्म व मृत्यू प्रमाणपत्र कार्यालयातील नागरिकांना होणारा प्रचंड त्रास हा अत्यंत गंभीर आणि असहाय्य झाला असून या कार्यालयातील दिरंगाई, बेफिकीरपणा आणि कर्मचाऱ्यांच्या उध्दट वर्तनात त्वरीत सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशा मागणीचे पत्र खा. नीलेश लंके यांनी महापालिकेच्या आयुक्तांना दिले आहे.

या पत्रामध्ये खा. लंके यांनी नमुद केले आहे की, नगर शहरात मोठ्या प्रमाणावर जन्म, मृत्यूची नोंद होत असल्याने शहरासोबतच ग्रामीण भाग आणि इतर तालुक्यांतूनही हजारो नागरीक प्रमाणपत्रासाठी या कार्यालयात येत असतात. मात्र त्यांना वेळेवर सेवा मिळत नाही. कर्मचाऱ्यांकडून उध्दट वर्तन केले जाते. नागरिकांना अनेकदा फेऱ्या माराव्या लागतात. या कार्यालयातील ही परिस्थिती अतिशय गंभीर असून प्रशासनाने तातडीने सुधारणा करणे आवश्यक असल्याचे खा. लंके यांनी या पत्रात नमुद केले आहे.



### प्रमाणपत्र तातडीने द्यावे

जन्म व मृत्यू प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे. अर्जदारांना ठरावीक कालमर्यादेत प्रमाणपत्र मिळेल याची हमी घेण्यात यावी. अनावश्यक दिरंगाई केल्यास सबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. कर्मचाऱ्यांचे वर्तन सुधारावे. कर्मचारी जनतेशी नम्रपणे आणि सहानुभूतीने वागतील याची जबाबदारी आयुक्तांची आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याने उध्दट वर्तन केल्यास त्याच्यावर निलंबासह कठोर कारवाई करण्यात यावी, असे खा. लंके यांनी या पत्रात म्हटले आहे.

### कार्यप्रणाली सुधारा

कार्यालयात होणारी गर्दी आणि नागरिकांचा वेळ वाया जाणे हे टाळण्यासाठी अतिरिक्त खिडक्या सुरू करा, कर्मचारी संख्या वाढवा. नागरिकांना सतत महापालिकेत चकरा मारू लागू नयेत यासाठी ऑनलाईन अर्ज व प्रमाणपत्र वितरण व्यवस्था अधिक प्रभावी करा. नागरिकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी तक्रार कक्ष सुरू करून ठरावीक कालावधीत तक्रारींची जबाबदारी निश्चित करा अशी सुचना खा. लंके यांनी केली आहे.

### आरोग्य अधिकारी जबाबदारी टाळतात

आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क करण्यात आला असता ते जबाबदारी घेण्याऐवजी टाळतांना दिसून येतात. माहीती सुविधा केंद्र दुपारी चार वाजता बंद करतात. त्याची वेळ चार ऐवजी सायंकाळी पाच अशी करण्यात यावी. जेणेकरून नागरीकांना मागे जावे लागणार नाही, अशी सुचनाही खा. लंके यांनी केली आहे.

### तर कारवाई करण्याची शिफारस

महापालिकेच्या कार्यशैलीत तात्काळ सुधारणा न झाल्यास अधिकाऱ्यांवर प्रशासकीय पातवळीवर कारवाई करण्याची शिफारस करण्यास मला भाग पाडले जाईल. नागरिकांची सेवा तुमची जबाबदारी आहे आणि ती वेळेवर व तत्परतेने पार पाडली गेली पाहिजे.




प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सावेडी प्राथमिक विभाग येथे पाककला स्पर्धेप्रसंगी विजेत्या स्पर्धाकासमवेत सुरेश क्षीरसागर, सौ. धनश्री गुंफेकर, भगवान जाधव आदी. (छाया – उदय जोशी)

# श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत पाककृती स्पर्धेचे आयोजन

नगर – प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सावेडी प्राथमिक विभाग येथे २२ मार्च रोजी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. योजनेअंतर्गत केंद्रशासनातर्फे सदर वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर केले असल्याने या विषयाला अनुसरून तृणधान्ये व फोर्टीफाईड तांदळाचे महत्व विषद करणाऱ्या विविध पाककृतींचा समावेश करून मातापालकांनी करून स्पर्धेस प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी व प्राथमिक विभाग शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर व प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनी दीपप्रज्वलन करून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा देऊन केले. यावेळी शालेय पोषण आहार प्रमुख भगवान जाधव उपस्थित होते.

यावेळी सुमारे २० पालकांनी स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवला. नाचणीचा केक, ज्वारीचा खिचडा, तृणधान्ये भेळ, थालीपीठ, ज्वारीचे मुटके, चकली, मिश्रधान्यांचे वडे, सप्तधान्य लाडू, इडली, अप्पे अशा विविध पदार्थांची रेलचेल यावेळी दिसून आली. माता पालकांमधून प्रथम क्रमांक सौ. संपदा अमित घायाळ (तृणधान्य बिस्कीट), द्वितीय क्रमांक विभागून सौ. शीतल रवींद्र धसे (गव्हाच्या कोंड्याचे मुटके) व सौ.मनिषा प्रकाश गवळी (ज्वारीच्या पिठाचे बॉल) व तृतीय क्रमांक सौ. सविता विनायक सावेडकर (मिश्रपीठांचे थालीपीठ) यांनी पटकावला. तसेच प्रशालेतील माता पालक असणाऱ्या शिक्षिका श्रीमती अश्विनी जाधव यांनी तृणधान्ये व कडधान्ये यांचा वापर करून तयार केलेल्या भेळीने सर्वांची मने जिंकले. या सर्वच यशस्वी स्पर्धकांचे सुरेश क्षीरसागर, सौ. धनश्री गुंफेकर व सर्व शिक्षकांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे नियोजन व परीक्षण प्रशालेच्या सेमी इंग्रजी शिक्षक कल्पना दारकुंडे, प्राची देशमुख व अंजली देशपांडे यांनी केले. सुत्रसंचालन सौ. सुप्रिया डबीर यांनी केले.

# क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार देशासाठी दिशादर्शक

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; सारसनगर या उपनगराचे सावित्रीबाई फुलेनगर नामकरण



सावित्रीबाई फुलेनगर कमानीचे काम जगताप परिवाराने स्वखर्चाने पूर्ण केल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांचा सकल माळी समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, प्रा. माणिकराव विधाते आदी पदाधिकारी व कार्यकर्ते.

नगर – सारसनगर या उपनगराला सावित्रीबाई फुलेनगर नामकरण करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुलेनगर भव्य दिव्य आणि सुंदर कमानीचे काम पूर्णत्वास आल्याने या उपनगराला एक चांगले देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे. सारसनगर या उपनगराचा उल्लेख सर्वांनी सावित्रीबाई फुलेनगर असा करावा. सकल माळी समाजाचे कार्य कौतुकास्पद आहे. महाराष्ट्राच्या भूमीत होऊन गेलेले थोर राष्ट्रपुरुष यांनी समाजाला दिशा दर्शक असे कार्य केले आहे. आज सावित्रीबाई फुलेनगर हे नामकरण झाल्याने पुढच्या पिढी पर्यंत त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे जाणार आहे. क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार देशासाठी दिशा दर्शक आहेत, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.

सावित्रीबाई फुलेनगर कमानीचे काम जगताप परिवाराने स्वखर्चाने पूर्ण केल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांचा सकल माळी समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, प्रा. माणिकराव विधाते, अनिल बोरूडे, सचिव राजेंद्र पडोळे, विश्वस्त डॉ.रणजीत सत्रे, विनोद पुंड, अर्जुन बोरूडे, ज्ञानेश्वर रासकर, सुरेश आंबेकर, प्रकाश इवळे, अॅड. राहूल रासकर, कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे, अमोल भांबरकर, नारायण इवळे, अशोक कानडे, पंडीतराव खरपुडे, चंद्रकांत पुंड, अमित खामकर, दिपक खेडकर, डॉ. सुदर्शन गोरे, जालिंदर बोरूडे, अशोक आगरकर, बाळासाहेब गायकवाड, संजय कानडे, सुधाकर कानडे, रामदास कानडे, अभिषेक चिपाडे, मच्छिंद्र बनकर, भानुदास बनकर, भाऊसाहेब कोल्हे, संजय झोडगे, गणेश कोल्हे, आनंद पुंड, राजेंद्र एकाडे, संतोष हजारे, वसंत आगरकर, गजानन ससाणे, रमेश चिपाडे, प्रकाश शिंदे, सुदाम बोरूडे, अशोक हिंगे, सुभाष गोंधळे, निळकंठ विधाते, प्रा. दरेकर तात्या, संभाजी चौधरी, लवेश गोंधळे, संतोष गोंधळे, अरूण गाडळकर, गणेश औसरकर, सागर इवळे, अरूण जाधव, सोमनाथ गाडळकर, संजय ताजणे, बाळासाहेब सांगळे, ब्रिजेश ताठे, चंदू गोरे, शरद दातरंगे, निखिल ताठे, यशवंत गारडे, देविदास खामकर, राजु खरपुडे, प्रसाद शिंदे, गिरीश रासकर, किरण बोरूडे, रामदास फुले, रेणुका पुंड, रेखा विधाते, कल्याणी गाडळकर, अश्विनी दळवी, महासंघाचे जिल्हाध्यक्ष भुषण भुजबळ, उपाध्यक्ष मनोज भुजबळ, सचिव गणेश धाडगे, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, रोहिदास हराळे, संदिप दळवी, तालुका अध्यक्ष भगवान हजारे आदि पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते.

प्रास्ताविकात किशोर डागवाले म्हणाले, सकल माळी समाजाच्या वतीने सारसनगर या उपनगरला सावित्रीबाई फुलेनगर हे नामकरण करण्यासाठी चा ठराव महापालिकेत करण्यात आला होता परंतु त्याचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित होते. समाजाच्या वतीने आ. संग्राम जगताप यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी कोणत्त्याही प्रकारचा निधी उपलब्ध नसतांना जगताप परिवाराने सावित्रीबाई फुलेनगर कमानीचे काम पूर्णत्वास नेले. या मुळे सर्व समाजाला आनंद झालेला आहे आणि समजाची मागणी पूर्ण केल्याबद्दल आ. संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला आहे.

प्रा. माणिक विधाते म्हणाले आ. संग्राम जगताप यांच्या संकल्पनेतून माळीवाडा वेस येथे महात्मा ज्योतिबा फुले व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा चे काम लवकरच सुरु होणार आहे.

कार्यक्रमाचे प्रसंगी बाळासाहेब भुजबळ यांनी स्वागत केले व म्हणाले आ. संग्राम जगताप यांचा सत्कार प्राथमिक स्वरूपात करण्यात आला आहे. सावित्रीबाई फुलेनगर कमानीच्या उद्घाटन प्रसंगी सकल माळी समाजाच्या वतीने माजी आमदार अरुण जगताप, आ. संग्राम जगताप व जगताप परिवार यांचा भव्य दिव्य सत्कार समाज बाधवांच्या वतीने करण्यात येणार आहे.

या प्रसंगी सकल माळी समाजाचे पदधिकारी व समाज बांधव उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रकाश इवळे यांनी केले. अॅड. राहूल रासकर यांनी आभार मानले.

# कोहिनूर आर्ट गॅलरीमुळे कलाकारांना नवी उर्मी मिळत आहे

### ज्येष्ठ चित्रकार वसंत विटणकर यांचे प्रतिपादन



सावेडी येथील कोहिनूर मॉल मधील 'कलाविष्कार' आर्ट गॅलरीत पुण्याचे चित्रकार रामकृष्ण कांबळे यांच्या गाजलेल्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना ज्येष्ठ चित्रकार वसंत वीटणकर.

नगर – कलाकाराला प्रोत्साहन दिल्यास त्यांची कला अधिक बहरत जाते. याच भावनेने कोहिनूर मॉल मध्ये कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी कलाविष्कार आर्ट गॅलरी सुरु करून गांधी परिवाराने उत्कृष्ट काम केले आहे. कोहिनूरच्या कलाविष्कार गॅलरी कलाकारांमध्ये नवी उर्मी निर्माण करत आहे, अशा शब्दात ज्येष्ठ चित्रकार वसंत वीटणकर यांनी गॅलरी उपक्रमाचे कौतुक केले.

सावेडी येथील आर्ट गॅलरीत पुण्याचे चित्रकार रामकृष्ण कांबळे यांच्या गाजलेल्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन वसंत वीटणकर यांच्या हस्ते झाले. यावेळी शिल्पचित्रकार प्रमोद कांबळे, मॉलचे संचालक अश्विन गांधी व श्वेता गांधी, यशवंत आंबेकर आदी उपस्थित होते. हे प्रदर्शन सर्वांसाठी ३० मार्च पर्यंत खुले आहे.

यावेळी रामकृष्ण कांबळे म्हणाले, माझ्या चित्रांचे जहांगीर आर्ट गॅलरी, राजा वर्मा आर्ट गॅलरीमध्येही माझ्या चित्रांचे प्रदर्शन झाले. पण माझ्या जन्मभूमीत नगरमधील कोहिनूर आर्ट गॅलरीत झालेले हे प्रदर्शन आनंदायी आहे. कलाकारासाठी एखादी रचना निर्माण करणे सोपे नसते. रक्त आटवून तो ही कला साकारतो. एखादे मुल जन्माला यावे तशी कलाकृती जन्माला येत असते. त्यामुळे चीत समजण्यासाठी जास्तीत जास्त चित्र पहात रहा.

आभार मानताना संचालिका श्वेता गांधी म्हणाल्या, कोहिनूर मधील कलाविष्कार आर्ट गॅलरी ही कलाकारांना त्यांची कला नागरिकांपर्यंत पोचवण्यासाठीच निर्माण करण्यात आली आहे. कलाकार्नाच्या या हक्काच्या व्यासपीठाचा कलाकारांनी लाभ घ्यावा. सर्व नागरिकांनी या चित्र प्रदर्शनाला भेट देऊन चांगल्या कलाकृतींचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन केले.

यशवंत आंबेकर यांनी प्रास्ताविक करून सूत्रसंचालन केले तर दीप्ती गुंदेचा यांनी आभार मानले.



## डॉ. दीपक हरके यांना नॅशनल अचीव्हर अवॉर्ड प्रदान

जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ दीपक हरके यांना भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी दिल्ली येथील राजवाडा पैलेसमध्ये अभिनेत्री महिमा चौधरी यांच्या हस्ते डॉ. दीपक हरके यांना नॅशनल अचीव्हर अवॉर्ड प्रदान करण्यात आला. ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके हे १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय आहेत. तसेच त्यांनी विविध विश्वविक्रम हे भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार करण्यासाठी केले आहेत. यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे बी के त्रिवेणी दीदी, बी के रजनी दीदी व बी के विकास भाई, दिल्ली उपस्थित होते.



राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३३ व्या पुण्यस्मृती दिना निमित्त कॅन्सर तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

# आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांचे वरदान लाभल्याने हॉस्पिटलच्या माध्यमातून हजारो रुग्णांची सेवा घडते

## उद्योजक निलेश मुथा यांचे प्रतिपादन

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात रुग्णांची सेवा केली जाते. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा घडावी. हे आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे स्वप्न होते. गोरगरीब आणि गरजू रुग्णांची तपासणी करुन सवलतीच्या दरात यशस्वीपणे शस्त्रक्रिया करून हजारो रुग्णांना दिलासा दिला जातो. आनंदऋषीजी म.सा.यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर्स, नर्सेस, स्टाफ व जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य अहोरात्र परिश्रम घेत आहेत, असे प्रतिपादन उद्योजक निलेश मुथा यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३३ व्या पुण्यस्मृती दिना निमित्त कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मनोज मुथा, निलेश मुथा, आयुष मुथा, यश मुथा, तुषार बोगावात, राहुल गुगळे, संध्या मुथा, मंगल चोपडा, महावीर भोजनालयचे मिलापचंद पटवा, अमित पटवा, रवी शेलोत, साक्षी मुथा, संदेश कटारिया, हर्षद मुथा, मनीष बोरुडे, महेंद्र राऊत आदींसह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य डॉ.वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, अनिल मेहेर, सुभाष मुनोत, डॉ.आशिष भंडारी तसेच शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.अनिकेत शिंदे, डॉ.लिला बलसारा, डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.रविराज गवळी, डॉ.आर.एन.पांडे, डॉ.रवींद्र मुथा, डॉ.मितेश कटारिया, डॉ.भक्ती फालके, डॉ.निखीता कटारिया, डॉ.मुकुंद उंडे, डॉ.सारिका झरेकर आदी उपस्थित होते.

साक्षी मुथा म्हणाल्या, आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य सर्वदूर पसरले आहे. अल्पदरात व मोफत दिली जाणारी रुग्णसेवा कौतुकास्पद आहे. जास्तीत जास्त रुग्णांना आरोग्य सेवेचा लाभ मिळावा यासाठी जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य निस्वार्थपणे कार्य करीत आहे.

डॉ.आशिष भंडारी यांनी स्वागत केले. अनिल मेहेर यांनी आभार मानले. कॅन्सर तपासणी शिबिरात १११ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# बूथ हॉस्पिटलमधील मोफत सर्वरोग निदान शिबिरास प्रतिसाद

नगर – पंडित अमरनाथ शास्त्रीय गायक, संगीतकार इंदौर घराना यांच्या १०१ व्या जयंतीचे औचित्य साधुन इव्हॅन्जलिन बूथ हॉस्पिटल, जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर, पाटिल हॉस्पिटल अहिल्यानगर, सिव्हिल हॉस्पिटल, समता फाउंडेशन एच. व्ही. देसाई. नेत्र रुग्णालय पुणे, संपूर्ण सुरक्षा केंद्र जिल्हा रुग्णालय हिंद लॅब अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने बूथ हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्व रोग निदान आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



बूथ हॉस्पिटलमधील मोफत सर्वरोग निदान शिबिरास प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन अनूप चावला, बूथ हॉस्पिटल प्रशासक मेजर देवदान कळकुंबे तज्ञ डॉक्टर्स यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले

दि. सालव्हेशन आर्मी इव्हॅन्जलिन बूथ हॉस्पिटल, (सिव्हील हॉस्पिटल), पाटिल हॉस्पिटल समता फाऊंडेशनचे एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय पुणे येथील नेत्र तज्ञ सॅम्युएल धांदे, रूबी हॉल पुणे येथील डॉ.हेमंत केमकर (हेड, नेक मॅक्सीओ फेशियल कॅन्सर सर्जन) नेत्र तज्ञ डॉ. सैमुएल धांदे, सतीश अहिरे नेत्र विभाग, जिल्हा रुग्णालय, डॉ. वेदांत लड्डा, त्वचारोग तज्ञ, स्त्री रोग तज्ञ डॉ. कीर्ती सोलट यांनी विशेष उपस्थिती दर्शवली.

बूथ हॉस्पिटल प्रशासनाच्या सोशल वर्कर, सी. एस. आर. डी समाजकार्याचे विद्यार्थी, कार्यकर्ते यांनी अहिल्यानगर व यांनी शहरात, उपनगरात तसेच ग्रामीण भागात जाऊन मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या अनुषंगाने जनजागृती केल्यामुळे आरोग्य तपासणी शिबिरात प्रतिसाद मिळाला.

समता फाउंडेशन व एच व्ही देसाई नेत्र रुग्णालय पुणे, यांनी शिबिरार्थींची नेत्र तपासणी करताना, शिबिरार्थींची एच. वि. देसाई हॉस्पिटल मार्फत पुणे येथे मोफत नेत्र शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे..

बूथ हॉस्पिटल, सिव्हिल हॉस्पिटलमार्फत पाटिल हॉस्पिटल मार्फत यांच्या ३०० हून अधिक रुग्णांची आरोग्य व रक्तगट तपासणी हिमोग्लोबिन तसेच मधुमेह, थायरॉइड तपासणी केली. डॉ.ज्योत्स्ना भराडीया (मधुमेह तज्ञ), डॉ. अनिल जाधव (एम. डी. मेडीसिन) डॉ. सोमेश्वर गायकवाड़ (एम. डी. मेडीसिन), डॉक्टर शेहनाज आयुब (बालरोग तज्ञ) यांनी शिबीरार्थींची आरोग्य तपासणी केली.

बूथ हॉस्पिटलचे दंत चिकित्सक डॉ. ममता कांबळे, डॉ. सौरभ ओहळ अस्थिरोग तज्ञ, सर्जन डॉ. राहुल कांडेकर, व त्वचारोग तज्ञ वेदांत लड्डा, आहार तज्ञ सौ. शीतल शिंदे यांनी रुग्णांची आरोग्य तपासणी व मार्गदर्शन केले.

शिबिर यशस्वी करण्याच्या दृष्टिकोनातून इव्हॅन्जलिन बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर देवदान कळकुंबे, मेजर ज्योती कळकुंबे, कॅप्टन डेनिसन परमार, कॅप्टन सुरज वंजारे, ब्रदर प्रवीण साबळे ब्रदर अमित पठारे, अभिषेक चावला, संदीप साळवे, गोरक्ष जाधव यांचे सहकार्य लाभले. शिबीर प्रसंगी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे आरोग्य मित्र उपस्तित होते. अनेक रुग्णांनी या मोफत शिबीराचा लाभ घेतला.

बूथ हॉस्पिटलच्या नर्सिंग स्कूलच्या प्राचार्य मल्लिका साबळे व स्टाफ यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी मोफत सर्व रोग निदान शिबिरास सहकार्य केले.

या शिबिरासाठी जिल्हा रुग्णालयाचे पॅथॉलॉजिस्ट डॉ.महामुनी, जिल्हा रुग्णालय औषध निर्माण विभागाचे सहकार्य लाभले.



विनायकराजं प्रतिष्ठाणतर्फे रंगपंचमी निमित्त आयोजित होळी फेस्ट कार्यक्रमात पुणे व मुंबई येथील DJ SWAGGY व DJ VAGGY व नगर येथील DJ-HAPPY यांनी नगरकरांना गाणांच्या तालावर ४–५ तास थिरकवत ठेवले. सेलेब्रिटी पुजा सिंग यांनी सुत्रसंचालन केले. यासाठी राहुल लोढा, पवन पारिक, सागर मुळे, वैभव आव्हाड, महेश साठे, रोहन उमाप, शिरीष भांबरे, अनिल लगड, निखील मोयल, सनी जगधने, संग्राम केदार, रोहन उमाप, सुमित लिपने आणि फाऊनडेशनचा सर्व सदस्य यांनी प्रयत्न केले. विनय व विपुल वाखुरे पाटिल यांनी आभार मानले.

# कृषी विभाग कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी संतोष सुरवसे तर व्हा. चेअरमनपदी अल्ताफ शेख

नगर – अहिल्यानगर कृषी कर्मचारी सह. पतसंस्थेच्या चेअरमनपदी संतोष सुरवसे, व्हाईस चेअरमनपदी अल्ताफ शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संचालक मंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली.



नूतन चेअरमन संतोष सुरवसे, व्हा. चेअरमन अल्ताफ शेख यांचा संस्थेतर्फे सन्मान करण्यात आला. (छाया–समीर मन्यार)

नूतनचेअरमनसंतोष सुरवसे यांच्या नावाची सूचना अनिलकुमार शेजुळ यांनी केली. त्यास अनुमोदन संजय सोनवणे यांनी दिले. व्हाईस चेअरमन अल्ताफ शेख यांच्या नावाची सूचना किरण घोडके यांनी केली. त्यास अनुमोदन गंगाराम ढोले यांनी दिले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून व्ही. के. मुटकुळे यांनी काम पाहिले.

नूतन चेअरमन व्हाईस चेअरमन यांचा संस्थेच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी माजी व्हाईस चेअरमन संजय सोनवणे, मोतीराम रहाणे, विजय सोमवंशी, गणेश जगदाळे, अनिलकुमार शेजुळ, जयश्री कुटे, कविता मदने, राजेश तुंभारे, सुकदेव जमधडे, गोरक्षनाथ पठाडे, नितीन चौरे, कैलास बुंदले, सार्थक दहिवळे आदींसह सर्व सभासद उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली प्लॉट मिळकत विद्यमान मालक **बापु धोंडीभाऊ पुजारी रा. अल्कुटी रोड, पुनेवाडी फाटा, पारनेर, अहमदनगर व मिनाज अबीद पठाण रा. शिरीन बंगलो, प्लॉट नं. २०, भाभा नगर, दादासाहेब सभागृह जवळ, नाशिक** यांच्या मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट**

**१. मिळकतीचे वर्णन :**– तुकडी अहदमनगर पोट तुकडी व तालुका पारनेर मे. दुय्यम निबंधक पारनेर यांचे हद्दीतील व अहमदनगर जिल्हा परिषद यांचे तालुका पारनेर पंचायत समितीचे कार्यक्षेत्रातील गांव **सुपा** येथील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

**सर्व्हे नं. ६३८ मधील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे** –

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | क्षेत्रफळ चौ.फू. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | ५५२ | ५९४१.७३ | रस्ता | प्लॉट नं. २२ व रस्ता | गट नं. ६३९ | गट नं. ६३९ व रस्ता |
| २ | २५१.६३ | २७०८.५५ | प्लॉट नं. ३ व ॲमिनिटी प्लॉट | रस्ता व प्लॉट नं. ३ | रस्ता | रस्ता व ॲमिनिटी प्लॉट |
| ३ | २३३.७५ | २५१६.०९ | गट नं. ६३७ | रस्ता | प्लॉट नं. २ व रस्ता | ॲमिनिटी व प्लॉट नं. २ |
| ४ | १५३.७५ | १६५४.९७ | गट नं. ६३७ | प्लॉट नं. ९ व गट नं. ६३७ | रस्ता व प्लॉट नं. ५ | रस्ता व प्लॉट नं. ५ |
| ५ | १७२.५ | १८५६.७९ | प्लॉट नं. ४ व रस्ता | प्लॉट नं. ८ व ९ | रस्ता व प्लॉट नं. ६ | रस्ता व प्लॉट नं. ४ |
| ८ | १७२.५ | १८५६.७९ | प्लॉट नं. ९ व प्लॉट नं. ४ | रस्ता व प्लॉट नं. ९ | प्लॉट नं. ७ व रस्ता | प्लॉट नं. ६, ७ व ५ |
| ९ | २०२.५ | २१७९.७१ | गट नं. ६३७ | रस्ता व गट नं. ६३७ | प्लॉट नं. ८ व रस्ता | प्लॉट नं. ५, ४ व ८ |
| १० | २३६.६३ | २५४७.०९ | रस्ता व ओपन स्पेस | प्लॉट नं. ११ व ओपन स्पेस | रस्ता | रस्ता |
| ११ | २३६.६३ | २५४७.०९ | ओपन स्पेस व प्लॉट नं. १० | रस्ता व ओपन स्पेस | रस्ता | प्लॉट नं. १० व रस्ता |
| १२ | २८० | ३०१३.९२ | गट नं. ६३७ | ओढा | प्लॉट नं. १३ व ओढा | रस्ता व प्लॉट नं. १३ |
| १३ | २०२.५ | २१७९.७१ | प्लॉट नं. १२ व रस्ता | ओढा व प्लॉट नं. १२ | प्लॉट नं. १४ व ओढा | रस्ता व प्लॉट नं. १४ |
| १४ | २४९.७५ | २६८८.३१ | प्लॉट नं. १३ व रस्ता | ओढा व प्लॉट नं. १३ | प्लॉट नं. १५ व ओढा | रस्ता व प्लॉट नं. १५ |
| १५ | २४०.६३ | २५९०.१४ | प्लॉट नं. १४ व रस्ता | ओढा व प्लॉट नं. १४ | रस्ता व ओढा | रस्ता |
| १६ | २३६.३७ | २५४४.२९ | प्लॉट नं. १७ व रस्ता | रस्ता व ओढा | गट नं. ६३९ ओढा | प्लॉट नं. १७ व गट नं. ६३९ |
| १७ | २१९.५ | २३६२.७० | प्लॉट नं. १८ व रस्ता | रस्ता व प्लॉट नं. १६ | गट नं. ६३९ व प्लॉट नं. १६ | प्लॉट नं. १८ व गट नं. ६३९ |
| १८ | २२५.३८ | २४२५.९९ | रस्ता | गट नं. ६३९ व प्लॉट नं. १७ | रस्ता व प्लॉट नं. १७ | रस्ता व गट नं. ६३९ |
| २० | २१३.५ | २२९८.११ | रस्ता व प्लॉट नं. २१ | प्लॉट नं. १८ व गट नं ६३९ | रस्ता व प्लॉट नं. १९ | प्लॉट नं. २१ व गट नं. ६३९ |
| २१ | २१३.५ | २२९८.११ | रस्ता व प्लॉट नं. २२ | रस्ता व प्लॉट नं. २० | गट नं. ६३९ व प्लॉट नं. २० | प्लॉट नं. २२ व गट नं. ६३९ |
| ॲमिनिटी प्लॉट | ८४६.५७ | – | गट नं. ६३७ | प्लॉट नं. २, ३ व गट नं. ६३७ | रस्ता व प्लॉट नं. २ | नगर–पुणे हाईयवे व लेआऊट रस्ता |
| ओपन स्पेस | ८४०.०० | – | रस्ता व गट नं. ६३७ | प्लॉट नं. १०, ११ व रस्ता | रस्ता व गट नं. ६३७ | रस्ता व प्लॉट नं. १० |
| ही संपुर्ण प्लॉट, ॲमिनीटी प्लॉट व ओपन स्पेस मिळकतीबाबत | | | | | | |

दि.२४/०३/२०२५.
अहिल्यानगर

**अॅड.सिध्देश प्रमोद मेहेर**
४, गोवर्धन अपार्टमेंट, माळीवाडा, अहिल्यानगर.
मो. नं. ९३७३३६३५३६

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीन विद्यमान मालक **१.शिवाजी बाबाजी मोरे, २. संगिता शिवाजी मोरे, ३. स्वरुप शिवाजी मोरे, सर्व रा. पाईपलाईन रोड, साईदिप नगर, सावेडी रोड, सावेडी, अ. नगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच व्यवहारापोटी विसार म्हणुन आमचे आशिला कडुन रक्कम देखील घेतलेली आहे व लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे. तसेच सदर जमीन ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याचे विश्वास व भरोसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीनीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

जिल्हा अहमदनगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे खोसपुरी** येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत – .

| गट नं. | एकुण क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| ८४/३ | ३ हे २८ आर | १ रु. ९४ पै. |
| | खराबा ० हे ७२ आर | |
| | ४ हे ०० आर | |

**यापैकी विद्यमान मालक नं. १ यांच्या संपूर्ण मालकीची ० हे. ४८ आर + पोट खराबा ० हे. १२ आर, विद्यमान मालक नं. २ यांच्या संपूर्ण मालकीची १ हे. ४० आर + पोट खराबा ० हे. ३० आर, विद्यमान मालक नं. ३ यांच्या संपूर्ण मालकीची १ हे. ४० आर + पोट खराबा ० हे. ३० आर अशी एकुण ४ हे. ० ० आर ही संपूर्ण शेतजमीन मिळकत.**

**यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे** –
पूर्वेस : गट नं. ४६ दक्षिणेस : गट नं. ३६०
पश्चिमेस : जेऊर रस्ता उत्तरेस : गट नं. ८४ पैकी

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि.२४/०३/२०२५.
अहमदनगर.

**अॅड. झेड. एम. आलम**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
गोविंदपुरा, अहमदनगर मो.नं. ९८९०९१०४४०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठे करार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता. २४/०३/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे सावेडी येथील खालील वर्णनाची मिळकत –

**सर्व्हे नंबर ४०/७ मधील प्लॉट नं. १ चे एकुण क्षेत्र ५०५.७५ चौ. मी. यावर बांधलेल्या इमारतीचे नांव – ''कृष्णतारा अपार्टमेंट'' यापैकी स्टील्ट फर्स्ट फ्लोअरमधील फ्लॅट नं. ४ चे एकुण बिल्टअप क्षेत्र ७७.७३८ चौ. मीटर ही लाईट मिटरसह आहे त्या परिस्थितीत संपुर्ण मिळकत लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना कायमखुष व कायमस्वरुपी खरेदी देण्याचे ठरले आहे.**

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – ओपन टु स्काय दक्षिणेस – ओपन टु स्काय
पश्चिमेस – स्टेअरकेस व ओपन टु स्काय उत्तरेस – ओपन टु स्काय

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**
**अतुल सुर्यकांत जैन**
रा. रेणाविकर नगर, सावेडी,
अहिल्यानगर.

**अॅड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९


# मोहंमद हसनेन याचा रमजानचा उपवास

नगर – सोनानगर सावेडी येथील रहिवासी मोहंमद हसनेन नाझीम शेख (वय ४) याने रमजान महिन्याचा पहिला उपवास केला. त्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



बारा इमाम मस्जीद ट्रस्टचे अध्यक्ष नुर मोहंमद शेख शफी यांचा तो नातू असून त्यांनी देखील त्याचे कौतुक केले आहे. दिवसभर अन्न, पाणी वर्ज्य करुन भर उन्हाळ्यात हा उपवास केल्याने त्याचे अभिनंदन होत आहे.

# चैत्रीय उत्तर वाहिनी नर्मदा परिक्रमेचे आयोजन

नगर – हिंदू धर्मातील अध्यात्मिक दृष्ट्या महत्व असलेल्या चैत्रीय उत्तर वाहिनी नर्मदा परिक्रमेचे आयोजन १७ ते २० एप्रिल दरम्यान करण्यात आल्याची माहिती नंदकुमार पोळ यांनी दिली आहे.

उत्तर वाहिनी नर्मदा परिक्रमा ही गुजरात मधील तिलकवाडा ते रामपुरा किंवा रामपुरा ते तिलकवाडा अशी करता येते. सदर परिक्रमेचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण नर्मदा परिक्रमा केल्यानंतर जे पुण्यफल प्राप्त होते तेच पुण्यफल ही चैत्र महिन्यातील एकदिवसीय उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा केल्यानंतर मिळते. ही परिक्रमा तिलकवाडा येथून उत्तरतटावरून सुरु होते. या परिक्रमेत दोन्ही तट मिळून २१ किमी चालावे लागते. ज्यांना चालणे शक्य नाही त्यांना गाडीची सोय उपलब्ध आहे. या यात्रेत प्रसिद्ध स्टॅचू ऑफ युनिटी, नीलकंठ धाम, कुबेर भंडारी मंदिर, गरुडेश्वर मंदिर, शुलपाणेश्वर मंदिर, जंगल सफारी हे प्रसिद्ध ठिकाणे सुद्धा दाखवण्यात येणार आहेत. ही यात्रा पूर्ण एसी गाडीने आणि राहण्याची सोय सुद्धा ए सी शेअरिंग रूम मध्ये आहे. माहितीसाठी अभिजीत पोळ ९४२२२ २७९०६, नंदकुमार पोळ ७८७५५०००५६ संपर्क साधावा.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीच्या व्यवहाराची आमचे अशिलाबरोबर बोलणी चालु आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असुन** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातुन जाहिर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक – २४/०३/२०२५

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन** – जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील, मौजे **सावेडी** येथील खालील वर्णनाची मिळकत –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ९७/३ब | ५अ | १४०.०० चौ मी |

हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील असलेले लोडबेअरिंग मधील तळमजल्याचे बांधकाम क्षेत्र ७५०.०० चौ फुट हि आहे त्या स्थितीतील संपुर्ण मिळकत.

**यांसी चतुःसीमा** –
पुर्वेस – रस्ता दक्षिणेस – प्लॉट नंबर ५ब
पश्चिमेस – प्लॉट नंबर ४ उत्तरेस – रस्ता

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक–**
**सौ. भावना महेश केवलरामानी**
रा. साई आयकॉन, मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर

**अॅड. सौ. सुषमा प्रविण बडवे**
नोटरी पब्लीक (भारत सरकार)
मो.नं. ९४२२०८९१०१
पत्ता – स्वयंमसिध्द अपार्टमेंट, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# मोबाईलमुळे भावी पिढी विकलांग होणार याचा गांभीर्याने विचार करा : राहुल गिरी



भगवान महावीर व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना राहुल गिरी. त्यातील विविध क्षणचित्रे, समवेत उपस्थित जैन बांधव.

नगर – आज इयत्ता पहिली–दुसरीमधील मुले मोबाईल वापरतात ही अभिमानाची वा कौतुकाची बाब नाही तर मोबाईलमुळे आपली भावी पिढी विकलांग होणार, हे वास्तव ध्यानी घेऊन गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन युवा वक्ते राहुल गिरी (बीड) यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्य स्मृतीदिन व १२५ व्या जन्मोत्सवानिमित्त जैन सोशल फेडरेशनने प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू केलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प भविष्यावर बोलू काही या विषयावर गुंफताना आनंदधाममध्ये ते बोलत होते.

सौ.मनिषा लोढा यांच्या हस्ते वक्त्यांचा सपत्निक सन्मान करण्यात आला. सरोजताई कटारिया यांनी सूत्रसंचालन केले.

श्री. गिरी पुढे म्हणाले, मोबाईलचा वापर केवळ अभ्यासाकरिता करणारी मुलं डॉक्टर, उच्चपदस्थ अधिकारी होवू शकतात मात्र तासन् तास मोबाईलवर टाइपपास करणारी मुलं आपलं भविष्य अंधःकारमय करत आहेत. मोबाईलमुळे भावनिकता संपत चालली आहे. पूर्वी न बोलता संवाद व्हायचे आता बोलण्यासाठी हाती मोबाईल असूनही संवाद हरवत चालले. मोबाईलला अभिमान वाटेल अशी पिढी निर्माण होणे गरजेचे आहे. स्पर्धा परिक्षांमध्ये सुयश मिळवण्यासाठी मोबाईलचा अवश्य वापर करावा. आत्महत्या कशी करावी? हे पाहू नये. फेसबुकला मिळालेल्या लाईक्सवर आपल्या आयुष्याचे मोजमाप करायचे नसते. व्हॉटसअपच्या स्टेटस् ने आपले स्टेटस् वाढत नाही. आई–वडिलांची मान उंचावेल, असे स्वतःचे स्टेटस् निर्माण करावे. उद्याच्या पिढीचे भविष्य घडवण्यासाठी सकारात्मक विचार महत्त्वाचा ठरेल.

ज्ञानेश्वरांसारखं वयाच्या १८ व्या वर्षी कर्तृत्व सिध्द करण्याचं कळलं तर आपल्या पिढीचं भविष्य योग्य मार्गाने जातयं, असे समजावे. मुलांसाठी महागडे मोबाईल खरेदी करताना भगवान महावीर आणि २४ तीर्थंकरांचे जीवन चरित्र अवश्य खरेदी करून मुलांच्या हाती देत या चरित्राच्या वाचण्यामधून जीवन समजून घेण्याचा प्रयत्न कर, असे अवश्य सांगा. तीर्थंकरांनी आपलं जीवन विश्व कल्याणासाठीच घालवले.

## भगवान महावीर व्याख्यानमाला – पुष्प दुसरे

क्रांतीकारक भगतसिंग, भगवान महावीर, छत्रपती शिवाजी, छत्रपती संभाजी, स्वामी विवेकानंद असे महापुरूष भारतातच जन्म घेतात, हे जगाने पाहिले आहे म्हणून आजही जग भारताकडे आशेने पहाते आहे. देशासाठी शहीद होण्याचा विचार भगतसिंगांनी देशवासियांना दिला. स्वराज्य रक्षणासाठी औरंगजेबाला शरण न गेलेल्या छत्रपती संभाजींनी देशासाठी बलिदान कसे द्यावे? हे शिकवलं.

स्त्री–पुरूषांकडे भाऊ आणि बहिणीच्या पवित्र नात्याने पहावं, हे स्वामी विवेकानंदांनी शिकागोच्या धर्मपरिषदेत दाखवून दिलं. आईच्या डोळ्यातील स्वप्नांची सत्यकृती म्हणजेच शिवबांचे स्वराज्य होय. ज्यांना शिवबांचे स्वराज्य कळलं त्यांनाच शिवाजी कळले. प्रभू श्रीराम आणि भगवान श्रीकृष्ण यांचे आदर्श समोर ठेवून आपल्या आजवरच्या पिढ्यांवर सुसंस्कार केले गेले. संस्कार जीवंत राहिला तरच भविष्य जीवंत रहाते. भविष्य संस्कारावरच अवलंबून असते.

भारतीय संस्कृतीचे वैभव, सृजनशीलता, परंपरा आपल्या भावी पिढीने अभिमानाने जपली पाहिजे. आपल्या अवती–भवतीचे लोक आपल्याला काय कमावले? असे विचारतात पण आई खाल्लेस का हे विचारते. आई नावाची शिदोरी सोबत घेऊन जगणं ज्याला जमलं त्यानंच आयुष्य कमावलं. जन्मदात्या पित्याला तुम्ही काय कमावलं? असं म्हणणारी पिढी निर्माण झाली आहे. फिल्म सिटीतील अभिनेत्रींच्या सुंदरतेकडे आकर्षित होण्यापेक्षा आपल्या जन्मदात्या आई सारखी सुंदर स्त्री जगात कोणतीच असू शकत नाही, हे मनी ठसवावे.

आजच्या पिढीला छोटी संकटही सहन होत नाहीत. संकटांच्या छाताडावर पाय देऊन उभे रहाण्याची भारतीय परंपरा आहे, हे या पिढीला सांगा. शिक्षणाने डॉक्टर–इंजिनियर नव्हे तर माणूस घडला पाहिजे. शाळेची पायरीही न ओलांडणारे धरणीमातेची काळजी घेतात. आपलेपणाने जीव लावतात. सृष्टीत कोणतेही प्रदूषण होऊ देत नाहीत. जाती–धर्मात भांडणे चुकीचे आहे. आपल्या महापुरूषांनी जाती–धर्मात भांडणे केली नाहीत. आपली सनातन परंपरा एकतेची असून माणूस निर्माण करणारी आहे. संपत्तीसाठी सख्या भावाचे नाते तोडणाऱ्या भावाने प्रभू श्रीरामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून भरताने राज्यकारभार पाहिला, हे ध्यानी घ्यावे.

विज्ञानाने भरपूर प्रगती केली पण माणसातला माणूस जीवंत राहिला का? याचे चिंतन करण्याची वेळ आली आहे. डॉक्टरांनी प्रामाणिकपणे रूग्णसेवा, शिक्षकांनी प्रामाणिकपणे ज्ञानदानाची सेवा अशी प्रत्येकाने प्रामाणिकपणे सेवा केल्यास ती देशसेवाच घडेल, असे श्री. गिरी यांनी सांगितले.

या युवा वक्त्याच्या व्याख्यानास विचाराने तरूण असलेले शहरासह उपनगरातील ज्येष्ठ स्त्री–पुरूष उपस्थित होते. संतोष गांधी यांनी आभार मानले.



भगवान महावीर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना लोककवी इंद्रजीत भालेराव. त्यातील विविध क्षणचित्रे समवेत उपस्थित जैन बांधव.

# आत्मचिंतनातून जीवनातील आनंदाची प्राप्ती

## इंद्रजीत भालेराव यांचे प्रतिपादन; भगवान महावीर व्याख्यानमाला – पुष्प तिसरे

नगर – जळगाव जिल्हातील असोदा येथील बहिणाबाई चौधरी यांनी निरक्षर असूनही केलेल्या कविता जीवनाचे वास्तव मांडत आत्मचिंतन करायला लावतात. या आत्मचिंतनातून जीवनातील आनंदाची प्राप्ती निश्चितच होते, असे लोककवी इंद्रजीत भालेराव (परभणी) यांनी सांगितले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्यस्मृतीदिन व १२५ व्या जन्मोत्सवानिमित्त जैन सोशल फेडरेशनने प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू केलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प अरे माणसा माणसा या विषयावर गुंफताना आनंदधाममध्ये ते बोलत होते.

सौ.मनिषा लोढा आणि मनसुखलाल पिपाडा यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे व शिशू संगोपन संस्थेचे व्हा.चेअरमन दशरथ खोसे उपस्थित होते.

सरोजताई कटारिया यांनी सूत्रसंचालन केले.

श्री. भालेराव पुढे म्हणाले, खानदेशी बोली भाषेत बहिणाबाईंनी जीवनाचे सार टिपताना गाव आणि शेती जीवनातील संस्कृती कवितेमधून मांडली आहे. त्यांच्या स्मरणार्थ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नामकरण कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे करण्यात आले. पाठ्यपुस्तकांमध्ये त्यांच्या कवितांना स्थान मिळाले आहे. आचार्य अत्रे यांनी मराठा दैनिकात रविवारच्या पुरवणीत बहिणाबाईंची एक कविता छापत सर्वच्या सर्व ५२ कविता छापल्या. या कविता वाचकांना इतक्या आवडल्या की, दैनिकाचा डीडपट खप वाढला.

पं.महादेवशास्त्री जोशी (गोवा) यांनी स्वाभिमानी विधवा स्त्रीची कथा लिहिली असता व्यंकटेश माडगूळकरांनी त्या कथेची पटकथा लिहिली. त्यावरून निर्माण झालेल्या मानिनी चित्रपटामध्ये बहिणाबाईंच्या ७ कविता आशा भोसले यांनी तर अरे संसार संसार ही एक कविता सुमन कल्याणपूर यांनी गायिली. ती खुप गाजली.

वेद, उपनिषद, गीता यांनाही मन कळले नाही. समर्थ रामदासस्वामींनी मनावर २०५ श्लोक लिहिले. बहिणाबाईंनी मन वढाय वढाय उभ्या पिकातलं ढोर... या एकाच कवितेमधून मनाचा परिपूर्ण परिचय करून दिला. त्यांनी नेमकेपणाने मनाचा आकार, स्वभाव व गती सांगितली. जीव देवानं धाडला जल्म म्हणे आला आला...या कवितेत माणसाच्या जन्माचे वास्तव मांडले. देव कुठे या कवितेत सदा जगाच्या कारनी चंदनापरी घसला अरे सोतामाधी त्याला देव दिसला दिसला...असे सांगत देव म्हणजे काय? याचे चिंतन केले.

बहिणाबाई चौधरी या निरक्षर असूनही त्यांनी काव्यामधून केलेले चिंतन आजही प्रेरणादायी ठरले आहे, असे सांगताना इंद्रजीत भालेराव यांनी म्हणून दाखवलेल्या कवितांना उपस्थित रसिकांनी चांगलीच दाद दिली. शहरासह उपनगरातील ज्येष्ठ स्त्री–पुरूष उपस्थित होते. सपना कटारिया यांनी आभार मानले.

# विधानसभेत चर्चा होवूनही नगरमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल सुरूच; मुकुंदनगर भागात दीड लाखाचे गोमांस पोलिसांनी पकडले, तिघांवर गुन्हा दाखल

नगर – गोवंशीय जनावरांची होत असलेल्या कत्तलीबाबत आ.संग्राम जगताप यांनी विधानसभेत आवाज उठवला, त्यावर मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात २ गुन्हे दाखल होताच त्या आरोपींवर मोक्का लावण्याची घोषणा केलेली असतानाही नगर मध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल सुरूच असल्याचे समोर आले आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या पथकाने २३ मार्च रोजी सकाळी मुकुंदनगर भागात गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई केली. १ लाख ४१ हजार ५०० रुपये किमतीचे ७०० किलो गोमांस जप्त करण्यात आले आहे.

भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मूलगीर यांना माहिती मिळाली की, मुकुंदनगर येथील वाबळे कॉलनी शेजारील पार्किंगच्या पत्र्याच्या शेडमध्ये एक इसम गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सहायक निरीक्षक मूलगीर यांनी तपास पथकातील अधिकाऱ्यांना तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस पथकाने नमूद ठिकाणी छापा टाकला असता, सलोम मुसा शेख (रा. कोठला, घासगल्ली, अहिल्यानगर) हा गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करताना आढळला. त्याच्याकडे चौकशी केली असता, सदर गोमांस तोसिफ कुरेशी व इर्शाद कुरेशी (रा. नालबंद खुंट, मस्जिदमागे, अहिल्यानगर) यांचे असल्याचे सांगितले. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई सहायक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, पोलीस अंमलदार अजय गव्हाणे, पांडुरंग बारगजे, दिलीप झरेकर, इस्माईल पठाण, समीर शेख, प्रमोद लहारे यांनी केली आहे.



कोहिनूर मंगल कार्यालयात आयोजित मराठा समाजाच्या बैठकीत बोलताना डॉ.सर्जेराव निमसे.

# सरपंच संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी हत्याप्रकरण, १३ एप्रिलला नगर शहरातून जिल्हाव्यापी आक्रोश मोर्चा

## देशमुख हत्या प्रकरणी जनतेने दबाव निर्माण करावा : डॉ. सर्जेराव निमसे

नगर – मस्सा जोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या व सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी जनतेने दबाव निर्माण करावा तरच या प्रकरणी या कुटुंबियांना न्याय मिळेल, असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे यांनी केले.

शहरातील कोहिनूर मंगल कार्यालयात आयोजित मराठा समाजाच्या बैठकीत ते बोलत होते. संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्याय मिळण्यासाठी अहिल्यानगर येथे लवकरच सर्व जातीधर्मिय, सर्वपक्षीय महा जनआक्रोश मोर्चा काढला जाणार आहे. त्याच्या नियोजनासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला मोठा प्रतिसाद मिळाला. जिल्ह्याच्या विविध भागातून मराठा समाजासह विविध जाती धर्मातील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास प्रामुख्याने संजीव भोर पाटील, अॅड. अनुराधा येवले, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष स्वाती जाधव, माजी नगरसेवक दिलीप सातपुते, अनिल शिंदे, डॉ.दिलीप पवार, डॉ.अविनाश मोरे, राजूभाऊ शेटे, भरत मोरे, वैभव लाळगे, नितीन पठारे, टिळक भोस, गणेश निमसे, उद्धव माने, लालाभाई शेख, शाहीर मुकुंदा भोर, सुनील साळुंखे, विनय भगत, ज्ञानदेव पांडुळे, शिवश्री दारकुंडे, अनिल शेटे, देवेंद्र लांबे, प्रकाश निपुंगे, बाबा भांड, सोमनाथ शिंदे, संदीप काटे, पांडुरंग पवार आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.निमसे यांनी बीडमध्ये जो प्रकार सुरू आहे तो भयानक आहे. अनेक हत्या या जिल्ह्यात घडल्या आहेत. बीडसारख्या जिल्ह्यात एक विशिष्ट जात पाहून अधिकारी नेमले जातात. गुन्हे करणारे आणि त्यांना साथ देणाऱ्या, बेहिशोबी संपत्ती असणाऱ्या गुंड, या गुंडांचे पाठीराखे आणि भागीदार नेत्यांविरूध्द अजूनही ईडी का लावली जात नाही. आता जनतेनेच याविरूध्द उठाव करावा.

संजीव भोर यांनी मोर्चामागील भूमिका स्पष्ट करून कोपर्डी आंदोलनाप्रमाणेच हा महा जनआक्रोश मोर्चा जास्तीत यशस्वी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा असे आवाहन केले.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाते ज्या ज्या बाबी दडपल्या गेल्या आहेत त्या या मोर्चातून चव्हाट्यावर आणल्या जातील, हा मोर्चा राज्यात पुन्हा एकदा एक वेगळे उदाहरण घालून देईल असा आमचा प्रयत्न आहे असेही ते म्हणाले.

बैठकीत अॅड. अनुराधा येवले, भाऊसाहेब वाघ, गणेश निमसे, टिळक भोस, दिलीप सातपुते, भरत मोरे, राजूभाऊ शेटे, गोरख दळवी, शिवशाहीर मुकुंदा भोर, आबासाहेब सोनवणे, श्रीपाद दगडे, लालाभाई शेख, राजेंद्र कडिले, महेश घावटे आदींनी विचार व्यक्त केले.

एक कोअर कमिटी बनवून त्यात प्रत्येक तालुक्यातील प्रमुख दोन कार्यकर्त्यांचा समावेश केला जाईल. मोर्चाच्या प्रचार प्रसारासाठी प्रत्येक तालुक्यात बैठका घेतल्या जाणार आहेत असेही आयोजन कमिटीच्या वतीने यावेळी जाहीर करण्यात आले. प्रास्ताविक निलेश म्हसे पाटील यांनी मांडले.

# पोहायला गेलेल्या आरटीओ अधिकाऱ्याच्या सोन्याच्या दागिन्याची चोरी; गुन्हा दाखल

## तपोवन रोडवरील स्विमिंग पूलमधील घटना, आरोपीला काही तासांत पकडले



पोहायला गेलेल्या आरटीओ अधिकाऱ्याच्या सोन्याच्या चेनची चोरी करणाऱ्या आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

नगर – नगरच्या आरटीओ कार्यालयात सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याची पावणे दोन तोळ्याची सोन्याची चेन तपोवन रोडवरील स्विमिंग पूलच्या चेंजिंग रूम मधून २२ मार्चला सायंकाळी चोरीला गेली होती. याबाबत २३ मार्चला दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे हलवून केडगाव मधील एका आरोपीला पकडले आहे.

याबाबत ची माहिती अशी की, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक संकेत सुनिल मारवाडी (वय २९, रा. सिद्धी विशाल अपार्टमेंट, नवलेनगर, मूळ रा.गणेश नगर, ता.येवला, जि. नाशिक) हे २२ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता त्यांचे मित्रांसह एस डी स्पोर्टस क्लब स्विमिंग पुल तपोवनरोड येथे पोहण्याकरिता गेले होते. त्यांनी त्याचे कपडे व गळ्यातील सोन्याची चेन एका बॅगमध्ये चेंजिंग रुमध्ये काढून ठेवली होती. सदर सोन्याची चेन कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याबाबत त्यांनी २३ मार्चला दुपारी १.३० च्या सुमारास तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर तोफखाना पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या सुचनेप्रमाणे स.पो.नि. उज्वलसिंह राजपुत व गुन्हे शोध पथकाचे पोलीस अंमलदार यांनी तात्काळ स्विमिंग पुल येथे जावुन घटनेच्या वेळी पोहण्यासाठी आलेला संशईत मुलगा विवेक विजय वहाडणे (रा.अंबिकानगर, केडगांव,ता.जि अहिल्यानगर) याच्याकडे विचारपुस केली असता प्रथम त्याने गुन्ह्याबाबत कोणतीही माहिती दिली नाही, परंतु त्यास पोलीसी खाक्या दाखवताच त्याने गुन्हा केल्याची कबुली देवुन स्विमिंग पुलच्या लॉकर रूम मधुन हात चलाखी करून चोरलेली फिर्यादी यांची पावणे दोन तोळे वजनाची सोन्याची चैन राहत्या घरातील बुटामध्ये ठेवल्याचे सांगुन काढून दिल्याने ती गुन्ह्याच्या तपासकामी जप्त करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पो. नि.आनंद कोकरे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स.पो.नि.उज्वलसिह राजपुत, गुन्हे शोध पथकातील पो.हे.कॉ.सुनिल शिरसाट, सुनिल चव्हाण, योगेश चव्हाण, सुधीर खाडे, पो.कॉ.सतिष त्रिभुवन, सुजय हिवाळे, सतिष भवर, महेश पाखरे यांनी केली आहे.

# अहिल्यानगर शहरात १३ एप्रिलला माळी वधू–वर मेळाव्याचे आयोजन

नगर – विवाह संस्था टिकवून राहणे, शेतकरी कुटुंबातील मुलांचे विवाह जमविणे, फक्त शासकीय नोकरीतील मुलगा पाहिजे असा अट्टाहास सोडून उद्योग व्यवसाया काम करणारे, स्वयंरोजगार करणाऱ्या युवकांनाही वधू पित्याने व वधूने पसंती प्राधान्य क्रमाने विवाह केले जावे, यासाठी विशेष व्याख्यानासह माळी वधू–वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

१३ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात वधू–वर मेळावा होणार आहे. यात इच्छुक वधू–वर पालकांसह समाजबांधवांना सहभागी होण्याचे आवाहन अॅड. महेश शिंदे, पोपटराव बनकर, गणेश बनकर, स्वाती डोमकावळे यांनी केले आहे.

गेल्या वर्षभरात ३५ विवाह जमवण्याची किमया वधू–वर मेळाव्याच्या माध्यमातून पार पाडली आहे. हा सहावा वधू वर मेळावा आहे. प्रथम वधू–वर, घटस्फोटीत विधवा, विधूर अपत्य, विनाअपत्य, दिव्यांग, मतिमंद, आंतरजातीय अशा सर्वांसाठी माळी वधू–वर मेळाव्याचे आयोजन केले असून, वधूसाठी कायमस्वरूपी मोफत नोंदणी केली जाणार आहे. ५ एप्रिल पर्यंत आपले बायोडाटा, तीन प्रतीत फोटो, आधार कार्डसह अॅड.महेश शिंदे, पावन गणपती मंदिरा शेजारी, जुन्या कोर्टामागे टांगे गल्ली येथे नाव नोंदणी करावी, तर उशीरा आलेले बायोडाटा स्वीकारले जाणार नसल्याचे म्हटले आहे. अधिक माहितीसाठी ९००८७ २२३३० व ९९२१८१००९६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कारचालकाने महिलेचे दागिने लुटले

## कारमधून रस्त्यावर ढकलून देत केला पोबारा, नगरच्या बसस्थानकाबाहेरील घटना

नगर – शिक्रापूर हून नगरला येण्यासाठी खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कारमध्ये बसून प्रवास करत असलेल्या महिलेच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मिनीगंठण कारचालकाने हिसकावून घेतले, तिचा गळा दाबून आरडाओरडा केला तर जीवे ठार मारील अशी धमकी दिली आणि तिला कार मधून खाली रस्त्यावर ढकलून देत भरधाव वेगात कार घेवून पसार झाल्याची घटना स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकासमोर रस्त्यावर २३ मार्चला दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत अनुराधा सोमेश्वर जगदाळे (वय ४३, रा. लोणार गल्ली, सर्जेपुरा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या २० मार्चला त्यांच्या नातेवाईकांकडे निमगाव माळवाणी (ता.शिरूर, जि. पुणे) येथे गेल्या होत्या. तेथून २३ मार्चला सकाळी त्या नगरला येण्यासाठी निघाल्या, त्यावेळी त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना शिक्रापूर येथून एका खाजगी प्रवासी कार मध्ये बसवून दिले. त्या कारचालकाच्या शेजारील सीट वर बसलेल्या होत्या तर त्यांची पैसे, कपडे व मोबाईल ठेवलेली बॅग कारच्या पाठीमागील डिक्कीत ठेवली होती. शिक्रापूर ते नगर दरम्यान कारचालक रस्त्याने ठिकठिकाणी प्रवासी घेत होता. चास जवळ आल्यावर सर्व प्रवासी कार मधून उतरले. तेव्हा फिर्यादी व कारचालक असे दोघेच कार मध्ये राहिले होते. दुपारी १ च्या सुमारास कार नगर शहरात स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकासमोर स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकासमोर आली. त्यावेळी कारचालकाने कार थांबवून फिर्यादी यांच्या गळ्यातील मिनीगंठण हिसका मारून तोडले तसेच त्यांचा गळा दाबून आरडाओरडा केला तर जीवे ठार मारील अशी धमकी दिली. या प्रकाराने फिर्यादी घाबरून गेल्या. त्यांना काही कळायच्या आत कारचालकाने त्यांच्या बाजूचा दरवाजा उघडून त्यांना रस्त्यावर ढकलले आणि भरधाव वेगात कार घेवून तेथून पसार झाला. या नंतर जगदाळे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून अनोळखी कार चालकाविरुद्ध जबरीचोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# हातात कोयता घेवून दहशत करणारा पकडला

नगर – हातात कोयता घेवून सार्वजनिक ठिकाणी फिरत लोकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्याला तोफखाना पोलिसांनी पकडले आहे. नालेगावातील जय चायनीज दुकानासमोर २३ मार्चला दुपारी १.३० च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. अक्षय दत्तू पवार (वय २६, रा. नेती नाका, नगर) असे आरोपीचे नाव आहे.

अक्षय पवार हा हातात कोयता घेवून दहशत करत फिरत होता. कोणीतरी ही माहिती तोफखाना पोलिसांना कळविली. ही माहिती मिळताच शहरात गस्त घालणारे पो.कॉ.गोरख धाकतोडे व संजय करांडे यांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेत अक्षय पवार याला पकडले. त्याच्या ताब्यातून कोयता हस्तगत केला. या प्रकरणी पो.कॉ.गोरख धाकतोडे याच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अक्षय पवार विरुद्ध भारतीय हत्यार कायदा ४/२५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.




शहरातील पत्रकार चौकातील शहीद भगतसिंह उद्यानामध्ये सामुहिम श्रमदान करुन शहीद भगतसिंग यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# सामुहिक श्रमदान आणि चरित्र वाचनातून शहीद भगतसिंग यांना नगरमध्ये श्रद्धांजली

**शहीद दिवसानिमित्त पुतळा परिसराची युवान स्वयंसेवकांकडून साफसफाई**

नगर – मनपाचे दुर्लक्ष आणि सार्वजनिक उदासीनतेमुळे शहरातील पत्रकार चौकातील शहीद भगतसिंह उद्यानाची मागील काही महिन्यात दुरावस्था झाली आहे. कित्येक महिने झाडांना पाणी न मिळाल्यामुळे अनेक सुंदर झाडे जळून गेली अथवा सुकली आहेत. आज शहीद दिवस असुनही कोणताही सरकारी कार्यक्रम पुतळा परिसरात झाला नाही. रविवार सुट्टीचा दिवस असल्याने अधिकारी देखील तिथे फिरकले नाही.

युवान या स्वयंसेवी संस्थेच्या सेवाव्रतींनी श्रमदानातून पुतळा परिसराची साफसफाई केली तसेच खाजगी टँकर मागवून उद्यानबाहेरील पाण्याअभावी सुकेलेल्या झाडांना पाणी देखील दिले. पुतळ्याची स्वच्छता केल्यावर त्यास पुष्पाहार अर्पण करून सामुहिक अभिवादन करण्यात आले. इंकलाब झिंदाबाद आणि शहीद भगतसिंह, सुखदेव, राजगुरू अमर रहेच्या जयघोषाने यावेळी पुतळा परिसर दुमदुमून गेला. तिथल्याच मोठ्या झाडाखाली बसून शहीद भगतसिंगांचे विचार समजण्यासाठी त्यांच्या चरित्राचे सामुहिक वाचन देखील केले. यातून शहीद भगतसिंगाचे क्रांतिकारक विचार समजण्यास युवकांना मदत झाली. पूर्वी एल अँड टी कंपनीने पुतळा परिसर सुशोभीकरणाची जबाबदारी घेतली होती. अनेक वर्ष त्यांनी ती चांगली पार देखील पाडली परंतू दुरावस्थेची कारणे विचारली असता कराराची मुदत संपल्याचे समजले. मनपाने प्रस्ताव दिल्यास उद्यानाची नियमित साफसफाई आणि झाडांना पाणी देण्यास विनामोबदला युवान स्वयंसेवक तयार असल्याचे संस्थेचे संस्थापक संदिप कुसळकर यांनी सांगितले.

# शहिददिनी विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४ ची केली 'होळी'



विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४ ची नगर शहरात शहीद दिनी होळी करण्यात आली.

नगर – भारतीय कम्युनिस्ट पक्ष, डाव्या प्रागतिक पक्ष व संघटनांच्या वतीने २३ मार्च रोजी व्यक्ति आणि संघटनांचे घटनात्मक अधिकार संपूर्णपणे नष्ट करणारे, लोकशाहीविरोधी असलेले महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा अधिनियम २०२४ विधेयकाची होळी करण्यात आली. शहरातील पत्रकार चौक येथील शहीद भगतसिंह उद्यानात शहीद दिनीच्या पार्श्वभूमीवर सदर विधेयक मागे घेण्याची मागणी करत त्याची होळी करण्यात आली. प्रारंभी भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना अभिवादन करुन इन्कालब जिंदाबादच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या.

या आंदोलनात भाकपचे राज्य सेक्रेटरी कॉ. अ‍ॅड.सुभाष लांडे, बन्सी सातपुते, सुधीर टोकेकर, स्मिता पानसरे, महेबुब सय्यद, अशोक सब्बन, अजित कुऱ्हाडे, आनंद गोलवड, आबीद खान, बापू चंदनशिवे, संध्या मेढे, युनूस तांबटकर, श्याम शिंदे आदी सहभागी झाले होते.

प्रस्तावित विधेयक हे लोकशाही विरोधी असून, अशा प्रकारचे विधेयक पब्लिक सेफ्टी बील म्हणून १९१८ साली ब्रिटिश सरकारने आणले होते. शहीद भगतसिंग, बटुकेश्वर दत्त यांनी त्यावेळी असेम्ब्लीत मनुष्यहानी होणार नाही, सभागृहात आवाज होऊन लक्ष वेधण्यासाठी बॉम्ब टाकून आवाज केला होता व विरोध दर्शविला होता. त्या वेळी ते बील रद्द करण्यात आले होते. तशाच प्रकारचे विधेयक महाराष्ट्र सरकारने आणलेले आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या घटनात्मक अधिकारावर दूरगामी परिणाम होणार आहेत. सत्तेला विरोध करणाऱ्या राजकीय पक्ष, व्यक्ती, संघटनांच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जाईल. अर्बन नक्षलच्या नावाखाली श्रमिक, कामगार, कर्मचारी, शेतकरी यांच्या चळवळींना मोडून काढण्यासाठी वापर केला जाणार आहे. सरकारचा उद्देश विरोधकांचा आवाज दाबण्याचा असल्याचा आरोप भाकपच्या वतीने करण्यात येणार आहे. अशा जनविरोधी, घटनाविरोधी विधेयकाला सर्व स्तरातून विरोध व्हायला हवा व हे विधेयक कुठल्याही परिस्थितीत मंजूर होणार नाही, या साठी राज्यातील सर्व लोकशाहीवादी पक्ष, संघटनांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे प्रतिपादन कॉ. अ‍ॅड. सुभाष लांडे यांनी केले.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने २३ मार्च ते १४ एप्रिल केंद्र व राज्य शासनाच्या जनविरोधी धोरणाविरोधात बेरोजगारी, महागाई, सर्व सामान्यांच्या प्रश्नांसाठी, लोकशाही, समाजवाद, राज्य घटना जनजागृती देशव्यापी मोहीम सुरू झाली आहे.

या मोहिमेचा प्रारंभ शहरात शहीद दिनापासून सुरु करण्यात आला आहे.

# प्रत्येकातील ईश्वरीवासाची अनुभूती सेवा कार्यातून प्रकट होते

**मुरली जाजू यांचे प्रतिपादन; सत्यसाई जन्मशताब्दी वर्षात संस्कारक्षम उपक्रमाचे नियोजन**




सत्यसाईबाबा जन्मशताब्दी वर्षात विविध संस्कारक्षम उपक्रमांचे नियोजन सभेला राष्ट्रीय अध्यात्मिक प्रमुख श्री मुरलीभैय्या जाजू व प्रांताध्यक्ष धर्मेश वैद्य, पद्मा दिवाकर, दिवाकर स्वामीनाथन आदी प्रभुतींनी मार्गदर्शन केले.

नगर – प्रत्येक व्यक्तीच्या अंतकरणात परमेश्वराचा वास असतो. या दिव्यात्मक स्वरुपाची प्रचिती त्यांनी केलेल्या मानवी कल्याण सेवा कार्यातून प्रकट होते, असे मत श्री. सत्यसाई सेवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यात्मिक प्रमुख व प्रभावी वक्ते मुरली जाजू यांनी व्यक्त केले.

अध्यात्मिक गुरु भगवान श्री सत्यसाईबाबा यांच्या जन्म शताब्दी वर्षात राबवावयाच्या विविध संस्कारक्षम उपक्रमांचे नियोजनची बैठक येथे झाली. त्यात त्यांचे मुख्य प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शन उपस्थितांना लाभले. सत्यसाईबाबा हे नेहमी मी माझ्या भक्तांवरुन ओळखतो असे सांगायचे त्यांनी आपल्या भक्तांना दिव्यात्मक स्वरुपांनो असे संबोधिले. पर्यायाने त्यांनी भक्तांची नैतिक जबाबदारीचे अधिष्ठान वाढविले. प्रत्येकातील दिव्यात्मक स्वरुपाचे दर्शन त्यांच्या समर्पित सेवाभावी वृत्तीतून प्रकट होते. यावर श्री.जाजू यांनी भर दिला. सत्यसाई संघटनेच्या ९ कलमी कार्यक्रमानुसार लहान मुलांना संस्कारित करणारे 'बालविकास वर्ग' आरोग्य सेवा, अध्यात्मिक सेवा, भजन, प्रशांती सेवा आदी मानवी कल्याण सेवा कार्यावर अधिक भर देण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. समितीचे राज्याध्यक्ष धर्मेश वैद्य यांनी ५५ वर्षांच्या नगर समितीच्या गौरवशाली परंपरेचा गौरव करुन नगर समितीने राज्यात समितीचे जाळे विस्तारीत केल्याचे आवर्जून सांगितले. राज्यस्तरीय अध्यात्मिक प्रमुख शाम जोशी, माहिती तंत्रज्ञान प्रमुख दिवाकर स्वामीनाथन, बाल विकास प्रमुख पद्मा दिवाकर, महिला सेवा प्रमुख कांचन वैद्य, सहसेवा प्रमुख दिलीप भामे, संभाजीनगर समितीचे जिल्हा प्रमुख विकास लोळगे आदी प्रभुतींची या प्रसंगी भाषणे झाली. त्यांनी जन्मशताब्दी वर्षातील विविध नियोजनाची माहिती दिली.

नगर समितीचे ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा.आर. जी.कुलकर्णी, प्रा.सौ.ज्योती कुलकर्णी, व सर्वश्री नंदलाल भालेराव, नरसिंग दुसा, शोभा दुसा, पद्मा बोगा, अमोल सप्तर्षी आदींनी या सभेचे आयोजन केले होते. निमंत्रक अशोक कुरापाटी यांनी भगवान बाबांच्या मानवी सेवा कार्याचे महत्व विषद केले.

याप्रसंगी शहरातील संस्कारक्षम उपक्रम राबविणारे उपक्रमशील शिक्षक, पालक, सेवाभावी कार्यकर्ते व साईभक्त उपस्थित होते. भगवान बाबांच्या आरतीने या बैठकीचा समारोप झाला.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची नवीन मराठी शाळा विश्रामबाग येथे अंतराळ वीर सुनीता विल्यम्स यांच्या परती निमित्ताने एक विशेष कार्यक्रम घेण्यात आला.

# सुनीता विल्यम्सच्या परतीचा नवीन मराठी शाळेत आनंदोत्सव

नगर – भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स या तब्बल ९ महिने आणि १४ दिवस अंतराळात राहिल्या नंतर आज यशस्वी रित्या पृथ्वीवर परतल्या. त्यांच्या आगमनाचे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची नवीन मराठी शाळा विश्रामबाग येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यासाठी एक विशेष माहिती कार्यक्रम घेण्यात आला.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची नवीन मराठी शाळा विश्रामबाग येथे अंतराळ वीर सुनीता विल्यम्स यांच्या परती निमित्ताने एक विशेष कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात प्रशालेतील इयत्ता पाचवी ते सातवी मधील विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी विद्यार्थ्यांना नासा, इस्रो या संस्थांची माहिती सांगण्यात आली.तसेच सुनीता विल्यम्स यांच्या जीवनाविषयी आणि त्यांच्या आजवरचा प्रवास कसा राहिला याबाबत माहिती देण्यात आली. तसेच क्रू फ्लाईट टेस्ट मिशन, ड्रॅगन कॅप्सुल, स्पेस स्टेशन, तेथील वातावरण, अंतराळात अंतराळवीर काय करताय, त्यांच्या पुढील आव्हाने, स्पेस वॉक यांची माहिती देण्यात आली. ड्रॅगन कॅप्सुल कशा रीतीने फ्लोरिडा च्या समुद्रात उतरली, तिचा वेग यांचे व्हिडिओ दाखविण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षक जितेंद्र निकम, अश्विनी कोल्हे यांनी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

या प्रसंगी संस्थेच्या सल्लागार मंडळ सदय भूषण भंडारी, मुख्याध्यापिका वनिता गोत्राळ, वैभव मदने, शौकत शेख, संगीता भंडारी, अश्विनी कोल्हे, योगिता कासार, रवि चांदेकर, दीपक कराळे, जयश्री वाघ, ऋतिक देसाई, कविता जोशी आदी उपस्थित होते.

# औद्योगिक वसाहतीमुळे १० हजार भूमिपुत्रांना रोजगार निर्मिती होईल : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील



नगर तालुक्याच्या वतीने पालकमंत्री, विधान परिषदेचे सभापती व महायुतीचे नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. (छाया – लहू दळवी)

नगर – जिल्ह्यातील जनतेने महायुतीला मोठा कौल दिला असून १० आमदार निवडून आले आहे. त्यामुळे जनतेची अपेक्षा देखील वाढली आहे. आता आपली जबाबदारी देखील वाढली असून मोठे काम करावे लागणार आहे. नगर जिल्ह्यात ३ एमआयडीसी मंजूर झाल्या असून औद्योगिक वातावरण निर्माण करायचे आहे. किमान जिल्ह्यातील १० हजार भूमिपुत्रांना रोजगार निर्माण होईल. लवकरच उद्योजकांशी बैठकीचे आयोजन केले जाणार आहे. एमआयडीसी भागामध्ये खंडणीबहाद्दरांचा उद्रेक झाला असून त्यांचा बंदोबस्त करणार. जिल्ह्यातील पाणी प्रश्न देखील तेवढाच महत्त्वाचा आहे. जिल्ह्याचा विकास आपणच करू शकतो. बाहेरच्या पुढाऱ्यांनी आपले प्रश्न सोडवले नाही! भांडणे लावून स्वतःची पोळी भाजून घेण्याचे काम केले आहे. अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला साकळाई पाणी योजना मंजूर केली आहे. आता आपल्या जिल्ह्याच्या हक्काचे पाणी मिळणार आहे. ६५ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, त्यामुळे दुष्काळी भागातील पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडविला जाणार आहे. नगर जिल्ह्याचे पर्यटन वाढवण्यासाठी पुढाकार घेतला असून राजमाता अहिल्याबाई यांचे स्मारक उभे राहणार आहे. जनतेने टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्याचे काम केले जाणार आहे. आमदार, मंत्रीपद हे शोभेचे पद नसून जबाबदारीची जाण असणारे पद आहे. आमदार शिवाजीराव कर्डिले यांना मंत्रीपदाची इच्छा आहे, आणि त्यांना माझी सहमती देखील आहे. त्यांनी जिल्ह्यातील सर्व आमदारांना एकत्रित करून त्यांचा सत्कार केला व चांगले काम करण्यासाठी ऊर्जा व प्रेरणा देण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

नगर तालुक्याच्यावतीने पालकमंत्री, विधान परिषदेचे सभापती व महायुतीचे नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार सोहळा झाला. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, आ.शिवाजीराव कर्डिले, आ.संग्राम जगताप, आ.मोनिकाताई राजळे, आ.काशिनाथ दाते, आ.विठ्ठलराव लंघे, आ.विक्रम पाचपुते, आ.अमोल खताळ, माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील, भाजपचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले, बाबुशेठ टायरवाले, नितीन दिनकर, अभय आगरकर, अनिल शिंदे, विनायक देशमुख, अशोक सावंत, सुनील साळवे, शहाजीराजे भोसले आदींसह नागरिक उपस्थित होते.

विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे म्हणाले की, जीवनामध्ये वावरत असताना 'श्रद्धा आणि सबुरी' ठेवावी लागते. विधानसभा निवडणुकीमध्ये आपल्या जिल्ह्यात सर्वात मोठे बहुमत मिळाले आहे. पालकमंत्री यांच्या माध्यमातून मागील अडीच वर्षांमध्ये लोकभिमुख विकास कामे झाले असल्यामुळेच महायुतीचे आमदार मोठ्या संख्येने निवडून आले आहेत. आ. कर्डिले यापूर्वी राज्यमंत्री झाले होते आता कॅबिनेट मंत्री करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. माझी निष्ठा आणि देवाभाऊंची पुण्याई यामुळेच मी सभापती पदावर पोचलो आहे. शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम केले जाणार असल्याचे ते म्हणाले.

आ.शिवाजीराव कर्डिले म्हणाले की, जिल्ह्यातील महायुतीचे आमदार, पालकमंत्री व विधान परिषदेचे सभापती यांचा सत्कार सोहळा नगर तालुक्याच्या वतीने झाला आहे. विकासाची कामे पूर्ण करायची असेल तर सत्तेशिवाय होत नाही. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी गेल्या अडीच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केली असल्यामुळेच मोठ्या संख्येने आमदार निवडून आले आहे. आता जनतेच्या अपेक्षा देखील वाढले आहेत. शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न गंभीर असून तो सोडवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. जलसंपदा खाते पूर्वी पुण्याकडे असायचे त्यामुळे आपल्या जिल्ह्यावर अन्याय होत होता! मात्र आता आपल्या जिल्ह्यामध्येच असल्यामुळे पाणी योजना पूर्ण होतील. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिलेला साकळाई पाणी योजनेचा शब्द पूर्ण केला आहे. जिरायत भागाला न्याय देण्याचे काम झाले पाहिजे. सुजय विखे पाटील माजी खासदार झाले असले तरी आता त्यांना आपल्याला राज्यसभेवर पाठवावे लागणार आहे. मंत्रीपदाची संधी मला दिली नसली तरी माझ्या मतदारसंघातील विकासाचे कामे मार्गी लावावीत. सभापती प्रा. राम शिंदे यांनी जिल्ह्याच्या विकास कामासाठी पुढाकार घ्यावा. राहुरी तालुक्यातील वावरथ जांभळी पुलाचे काम मार्गी लागावे यासाठी प्रयत्न करणार आहे. लोकांची अपेक्षा मोठी आहे. पुढील काही महिन्यात जिल्हा परिषद महापालिका नगरपालिका निवडणुका होणार असून आपण महायुती म्हणून संघटित राहिलो तर यश हमखास मिळणार आहे असे ते म्हणाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील जनतेने १० आमदार आणि एक सभापती असे अभूतपूर्व यश मिळाले आहे. मागच्या निवडणुकीत 'मी आजी होतो मात्र हे माजी होते' आता हे आजी झालेत आणि मी माजी झालोय आता मी एकटा माजी आहे तरी मला आजी करा अजून ४ वर्षे बाकी आहे. तोपर्यंत लोक विसरून जातील माझा भाषणापुरता उपयोग करून घेऊ नका! अहिल्यानगर जिल्ह्याचा विकास व्हावा यासाठी एमआयडीसी साखळाई पाणी योजना घोडच्या प्रकल्पातून २ टीएमसी पाणी आरक्षित केले आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत आजी असणाऱ्या पेक्षा मी ५० टक्के काम जास्त करीत आहे असे मत सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले.

जनतेने टाकलेल्या विश्वासाला सार्थ ठरवीत विकास कामाच्या माध्यमातून जिल्ह्यालापुढे घेऊन जावे लागणार आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून विकासाची कामे पूर्ण केली जातील असे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.

यावेळी मोनिकाताई राजळे म्हणाल्या की, मंजूर महाविद्यालय हे शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदार संघात व्हावे यासाठी सर्व आमदारांनी सहकार्य करावे. तसेच आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, साकळाई पाणी योजनेमध्ये पारनेर विधानसभा मतदारसंघातील गावांचा समावेश करण्यासाठी सर्वांनी मदत करावी. यावेळी विक्रम पाचपुते, विठ्ठल लंघे, अमोल खताळ आदींची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षय कर्डिले यांनी तर स्वागत दिलीप भालसिंग यांनी केले.

# शहराच्या विकासासाठी अभियंत्यांनी योगदान द्यावे

**प्रा. आरतीभूषण चौधरी यांचे प्रतिपादन**




दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्रातर्फे शाश्वत विकासासाठी जागतिक अभियांत्रिकी दिवस आयोजित करण्यात आला होता.

नगर – दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्रातर्फे २० मार्च रोजी शाश्वत विकासासाठी जागतिक अभियांत्रिकी दिवस आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त क्रॉम्प्टन ग्रीव्हज लिमिटेडचे माजी चीफ डिझाइन इंजिनियर, प्रा. आरतीभूषण चौधरी यांचे 'शाश्वत विकास उद्दिष्टे पुढे नेण्यासाठी अभियंत्यांची शक्ती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रा. आरतीभूषण चौधरी यांनी शाश्वत विकास ही संकल्पना स्पष्ट करताना संगितले की, शाश्वत विकास हा मानवी विकासाचा एक दृष्टीकोन आहे ज्याचा उद्देश भविष्यातील पिढ्यांच्या त्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमान गरजा पूर्ण करणे आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने २०१५ साली शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे निश्चित केली, जी पुढील पंधरा वर्षात, म्हणजे २०३० सालापर्यंत पूर्ण करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. या उद्दिष्टांनुसार आर्थिक, सामाजिक व तंत्रज्ञानाच्या विकासाद्वारे, पर्यावरणास कमीत कमी हानी पोहचवून विकास करणे व तो समाजाच्या सर्व स्तरावर पोहचवणे, जागतिक शांतता व स्थैर्य व सर्वांगीण विकासाद्वारे गरीबी निर्मूलन करणे, स्त्री–पुरुष भेदभावरहित समाज निर्माण करणे यांचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने ठरवलेली शास्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अभियंत्यांचे योगदान अतिशय महत्वाचे असून त्यासाठी त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, जेणेकरून उत्पादकता वाढीस चालना मिळेल, व उत्पादने मुबलक व स्वस्त दरात उपलब्ध होऊन सर्वांपर्यंत पोहचण्यास मदत होईल. उत्पादनातील तूट कमी करण्यावर, तसेच कार्यक्षमता वाढवण्यावर अभियंत्यांनी भर द्यावा असे आवाहन त्यांनी केले. वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातील जीवनमानावर मर्यादा येत असून नवीन संकल्पनांद्वारे शहरातील विकास कामे लवकर कशी होतील यावर अभियंत्यांनी संशोधन करावे असे आवाहन त्यांनी केले.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, अहिल्यानगर केंद्राचे अध्यक्ष भारतभूषण भागवत यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. मानद सचिव डॉ. दीपक विधाते यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

व्याख्यानाला विविध स्तरातील नागरिक उपस्थित होते. ज्यामध्ये अविनाश कुलकर्णी, अभय राजे, डॉ. अतुल अत्रे, रामनाथ वायकर, हरिश्चंद्र थिगळे, दादासाहेब करंजुले, बाबासाहेब खरबस, प्रदीप तांडळे, सचिन डागा, उदित हिरे, सतीश कांबळे, विश्वनाथ अडवडे, दिनेश येवले आदींचा समावेश आहे.

**महाराष्ट्र शासन**
**रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर**
पत्ता :– बांधकाम भवन, नगर– औरंगाबाद रोड, अहिल्यानगर
ई–मेल पत्ता :– egsahmednagar.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक ०२४१–२४२२९३८

**ई–निविदा सुचना क्रं. २० सन २०२४–२०२५**

कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम मजुर सहकारी संस्था वर्ग अ असल्यास निविदेमध्ये भाग घेवू शकेल. खालील कामांकरिता ब – १ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु. लाखात) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|
| १ | मौजे मिरी येथे पांढरी पुल रोड ते के. एन. गवळी रस्ता भराव खडीकरण करणे ग्रामा १७७ ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर. (लेखाशिर्ष :– ३०५४ सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना) | रु. १४.९१ लक्ष | मजुर सहकारी संस्था मर्या. वर्ग अ |
| २ | मौजे शेवगाव येथील शेवगाव गेवराई रोड ते श्री. पार्थ पब्लिक स्कूल ग्रा.मा. ७० रस्ता मजबुतीकरण करणे. ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर. | रु. १७.०० लक्ष | मजुर सहकारी संस्था मर्या. वर्ग अ |

| | | |
|---|---|---|
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | :– | दिनांक : २५/०३/२०२५ ते दिनांक ०१/०४/२०२५ |
| निविदापूर्व बैठक | :– | निरंक |
| ई–निविदा उघडणे | :– | दिनांक : ०२/०४/२०२५ |

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1.www.mahapwd.com 2. Mahatenders.gov.in
(सदर निविदे सूचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र.लेखा/निविदा/ ११६१ / सन २०२५
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,
रो.ह.यो. (कार्य). विभाग,
अहिल्यानगर दिनांक : १९/०३/२०२५ जिमाका/नगर/जाहि/२६३/२०२४–२५

**कार्यकारी अभियंता,**
रो.ह.यो. (कार्य) विभाग,
अहिल्यानगर

## कारागीर पाहिजे

FOR NEW OUTLET
पावभाजी, ज्युस, चायनीजसाठी अनुभवी व उत्कृष्ट टेस्ट देणारे कारागीर पाहिजे. (अहिल्यानगर)
9102485656

## किराणा दुकान

कामासाठी मुले/महिला
हेल्पर पाहिजे
8329880640

## हॉस्पिटलसाठी महिला मल्टिपर्पोज स्टाफ पाहिजे

नर्सिंग असल्यास प्राधान्य.
रिसेप्शनसाठी मुलगी पाहिजे
अर्ज या व्हॉटसॲप नंबरवर करावा
8600575020
सकाळी ९ ते दुपारी ५ वाजेपर्यंत मेसेज किंवा कॉल करा.

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater

SHOW TIMING - 21 MAR - 24 MAR 2025

द डिप्लोमैट 08.45AM | 01.45PM 07.45PM | 10.30PM
आरडी 11.15AM
छावा 08.15AM | 09.45AM 11.15AM | 12.45PM 03.45PM | 06.45PM 09.45PM
सैराट 04.30PM | 07.00PM 10.15PM
घातक 04.10 PM
गाव बोलावतो 02.00PM

टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow
Cinélife MINIPLEX
नगर कॉलेज जवळ, जूडिओच्या वरती, अ.नगर
9881300400, 0241-2346000

## खास नागपुरचे

अती थंडावा देणारे एअर कुलर
- कमर्शियल
- हॉटेल
- मंगलकार्यालय
- घरगुती

DUREX, Namdhari, RAM COOLERS
गिरीराज इलेक्ट्रॉनिक्स
पुणे गल्ली, आसरा स्टेशनर्स समोर, अ.नगर.
9665849777/8208349164

## टि.व्हि. सेंटर चौकात, सावेडी येथे रोडटच १५० स्के.फु. गाळा भाड्याने देणे

9420036958

## गाळा भाड्याने देणे आहे

महालक्ष्मी चेंबर (अपार्टमेंट) बेसमेंट, शॉप नं. ३, २०० स्क्वे.फूट ऑफिससाठी उपयुक्त फर्निचर आहे.
मोरया मंगल कार्यालयासमोर, सावेडी, अहिल्यानगर
7720007727

## ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत

विग्नेन इंडिया कंपनीच्या अहमदनगर ब्रँचमध्ये ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत.
शिक्षण : १२ वी ते पदवीधर
9604609130

## इलेक्ट्रॉनिक्सच्या दुकानात कामासाठी पाहिजेत

- मॅनेजर : २ जागा
- टेम्पो ड्रायव्हर : २ जागा
- हेल्पर : २ जागा

एमआयडीसी,अ.नगर
9881040050
7972934279

## सर्जेपुरा चौकात त्वरित दुकान विकणे

9890324598

## त्वरित पाहिजेत

घरकाम व हॉस्पिटल मधील कामासाठी वॉचमन पाहिजेत
सिस्टर/ब्रदर (ANM,GNM) ४ जागा
आकर्षक पगार (राहण्यासाठी घर) प्रत्यक्ष येऊन भेटावे
सावी हॉस्पिटल अँड मॅटर्निटी होम
मार्केटयार्ड मागे, सारसनगर, अ.नगर
9405253837

## पाहिजेत

सेल्समन : २ जागा
किडसवेअर दुकानात कामासाठी
: संपर्क :
खुशबू-बेबी स्टोअर
सावेडीरोड, अहिल्यानगर
8888181787

## हॉस्पिटलसाठी महिला मल्टिपर्पोज स्टाफ पाहिजे

नर्सिंग असल्यास प्राधान्य.
रिसेप्शनसाठी मुलगी पाहिजे
अर्ज या व्हॉटसॲप नंबरवर करावा
8600575020
सकाळी ९ ते दुपारी ५ वाजेपर्यंत मेसेज किंवा कॉल करा.

सदैव प्रकाशत राहील..
तुमच्या कर्तृत्वाचा ठसा..
नेहमीच बहरत राहील..
तुमच्या नेतृत्वाचा वसा..



मा.आ.श्री. अरुणकाका जगताप
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

* शुभेच्छुक *
ॲड. आर. टी. शर्मा
हिरालाल पेजमल शर्मा
शर्मा परिवार

## लोन.. लोन.. लोन..

15 करोड पर्यंत लोन..
कमर्शियल/रेसीडेंशियल/शाळा/कॉलेज/इंडस्ट्रीयल/हॉटेल/हॉस्पिटल ओपन प्लॉट व सर्व प्रॉपर्टीवर लोन मिळेल
ROI- 9.50%, Term loan 15 year-CC/OD
सन फायनान्स
अहिल्यानगर
8888826151

॥ ओम शांती ॥

## विकणे आहे

**रतडगांव, ता.जि.अहिल्यानगर हद्दीतील गट नं.३४७ हे. २ आर ३६**

वर नमूद शेतजमीन, अध्यात्मिक विश्वसेवा समिती, पत्ता-३, सोनाली अपार्टमेंट, बालिकाश्रम रोड, भुतकरवाडी चौक, अहिल्यानगर या न्यासाच्या मालकीची विकणे आहे. मिळकत्त विक्रीसाठी मे.सह.धर्मदाय आयुक्त सो, पुणे यांचेकडील विक्री परवानगीसाठीचा अर्ज क्र.७/२०२२ दाखल अर्जातील आदेशानुसार इच्छूक खरेदीदाराकडून निविदा मागविणेसाठीची सविस्तर जाहीर नोटीस दै.प्रभात, सकाळ व नवा मराठाच्या दिनांक ११/०३/२०२५ च्या आवृत्तीत प्रसिध्द झालेली आहे, ती पहावी.

इच्छूक खरेदीदारांनी माहितीसाठी मिळकतीच्या पाहणीसाठी, निविदा फॉर्मसाठी सचिव - श्री. किशोरभाई यांच्याशी न्यास पत्त्यावर किंवा मो - ९२२६२२७००२ वर संपर्क साधावा.

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख १०/०४/२०२५

सचिव
किशोरभाई
अध्यात्मिक विश्वसेवा समिती, अहिल्यानगर

## टेलरिंग कारागीर पाहिजेत

सावेडी येथील प्रसिध्द लेडीज बुटिक येथे लेडीज टेलरिंग कामासाठी
ब्लाऊज स्पेशालिस्ट कारागीर पाहिजेत
कटिंग मास्टर पुरुष-जागा १
टेलर - जागा ३
9850038392

## त्वरा करा ! त्वरा करा ! त्वरा करा !

शिक्षिका भरणे आहे
वर्ग १ ली ते ४ थी व ५ वी ते १० वी
SNB कोचिंग क्लासेस
गणेश चौक, बोल्हेगावरोड, अहिल्यानगर
8080618226

## JOB OPENINGS AT MEHER ENGLISH SCHOOL, MEHERABAD

APPLICATIONS ARE INVITED FOR THE POST OF :

1. KINDERGARTEN TEACHER
   - Montessori trained teacher with strong communication skills in English.
   - Passionate about early childhood education and child development.
   - Creative and engaging teaching methods.
   - Patience and a nurturing approach towards young learners.
   - Ability to create a positive and interactive classroom environment.
2. SPORTS TEACHER
   - Graduate in Physical Education with expertise in Cricket or Handball.
   - Strong coaching and training skills.
   - Ability to organize sports events and extracurricular activities
   - Good communication and leadership skills.
   - Passion for promoting fitness and teamwork among students.

Applications by desirous candidates should be addressed to

THE PRINCIPAL,
Meher English School, Meherabad,
Arangaon-414006
Email - meherarangaon@gmail.com
Contact No-0241-2995254 (Please call during working hrs : 8.45AM to 12.30PM)

## बाळ आजारी आहे का?

- ते वारंवार आजारी असणे
- नेहमी सर्दी, खोकला
- वारंवार होणारा बाल दमा
- वारंवार जुलाब होणे
- प्रतिकारशक्ती कमी असणे
- वजन, उंची कमी

या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर



*सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
संपर्क : मो. ९५११११०४४४
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds
अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर


टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

दिनांक : 21 मार्च ते 28 मार्च 2025

CHHAAVA 07:30 AM | 09:30 AM | 10:30 AM 03:00 PM | 07:00 PM | 10:00 PM 10:30 PM
THE DIPLOMAT 09:00 AM | 11:45 AM 04:30 PM | 09:45 PM
SAIRAT (Marathi) 02:30 PM
Hardik shubhech chaa (Marathi) 0130P M
SNOW WHITE (HIN) 12:45 PM | 06:00 PM 08:15 PM
GAAV BOLAVATO (Marathi) 07:15 PM
R D (Marathi) 02:30 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001






# संकटकाळी मदतीस ठामपणे उभा राहणारे "एकमेव व्यक्तिमत्व"

मा.आ.श्री.
अरुणकाका जगताप
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक - रामचंद्र गेणुजी दिघे (आण्णा) | अजय रामचंद्र दिघे | विजय रामचंद्र दिघे | विक्रांत मच्छिंद्र दिघे | धनवान मच्छिंद्र दिघे

जय अजय दिघे
आकाश अजय दिघे


KAKA
वाढदिवस अभिष्टचिंतन
वाढदिवस आपला आमच्या
मनात लिहीला आहे
प्रत्येक दिन आपणास शुभेच्छा देत आहोत...
मा.आमदार
श्री. अरुणकाका जगताप
आपणांस
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
अंबादास (लिंबाशेठ) नागरगोजे । गहिणीनाथशेठ नागरगोजे
अंबिका उद्योग समुह अहिल्यानगर